REGISTERED No, N 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.....०१०६
दुसरे खेपेस.....०१

वऱ्हाडसमाचार.

Mofnssil ... ... 2 (With postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy 2

Advertisementsas
below 10 lines .....2 Rs
Per line over 10 .....3 as
Repetitions Per line „ 2

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 4 APRIL 1904 NO 13

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ४ माह एप्रिल सन १९०४ इ० अंक १३

बक्षीस

(१०० शंभर रुपये)

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं तारिख २२ फेब्रुवारी १९०४ रोजीं रात्रीं आपचे घरीं चोरी होऊन अंदाजा रुपये १७३२-८ आणे किंमतीचा माल चोरीस गेला आहे त्यापैकीं कांहीं वस्तूंच्या खाणखुणा येणें प्रमाणें:—

(१) गोफकडें सोन्याचें १०। तोळे
(२) चौधरी कडें सोन्याचें १२॥ तोळे
(३) तांदळीपोत जिन्नामध्यें चार पुतळ्या आहेत. ४ तोळे
(४) तांदळीपोत-मधोमध पदक असून बाजूला एक एक मोहर अकबरी ६ तोळे
(५) पाटल्या जोड १ वजन ७। तोळे
(६) मोत्याची बुगडी
(७) नथ (सोन्याच्या पाटलीला सुट्याचे मोतीं लाविलेली)
(८) बाक्यांचा जोड (धागऱ्या सुद्धां) अंदाज ४० तोळे
(९) बाक्यांचा जोड साधा.
(१०) शिकंदरी शिक्याचे रुपये २५
(११) एकेरीगोल गोफाचा करदोडा वजन २० तोळे.
(१२) गोफाच्या कोपरवाळ्या वजन ४० तोळे
(१३) पीतांबर (येवल्याचा) १२ वर्षाचा जुना. किंमत ११० रुपये इत्यादि इत्यादि.

सदर्हु वर्णनावरून जर कोणी आमच्या घरीं झालेल्या चोरीचा बरोबर पत्ता लावून देईल तर त्याच्या मेहनताना बद्दल त्याला १०० रुपये बक्षीस देऊं. जर कोणी गुप्त रितीनें आमच्या वस्तु परत आणून देईल तर त्याला त्या वस्तूंच्या मानानें योग्य बक्षीस देईन त्यांच्यापाशी कोणतीही विचारपूस आडी करणार नाहीं किंवा त्यांच्या नांवाचा उल्लेखही कोठें करणार नाहीं कळावें. तारीख २९ मार्च १९०४ इसवी.

सही
बाबन वल्लद परशराम
पाटील राहणार वारुळें
तालुका आकोट.

नोटीस

बेशमी कृष्णा वल्लद भगू वानखेडे माळी राहणार शेलगांव ता० मलकापूर पोष्ट— नांदुरा यांस:—

मी खालीं करणार या लेखानें कळवितों कीं, माझी बहीण नामें चिमी हिचें लग्न तुमच्याशीं झाल्यास आज सुमारें १० वर्षे झालीं. चिमी ही शाहणी होऊन चार वर्षे झालीं. ती तुमच्याच घरीं राहिली. आज १०—१२ महिने झाले तिला मी आपल्या घरीं आणिलें आहे. ती तुमचे घरीं नांदण्यास तयार आहे पण तिला जनरितीप्रमाणें तुमच्या कडून संसाराचें सुख मिळेल अशी मुळींच आशा नाहीं. सबब तुह्मी तिला फारकती देऊन दुसरा घरठाव करण्यास मोकळे करावें. हें उत्तम. अशी फारकती ही नोटीस पोचल्यापासून आठ दिवसांत द्यावी. असें न केल्यास हीच नोटीस फारकती समजून मी तिचा गंधर्व लावून देईन. मग तुमचा तिजवर कांहीं एक हक्क राहणार नाहीं. कळावें तारीख ३० मार्च सन १९०४ इ.

(सही) भिकू वल्लद नारायण राहणार
नांदोरा दस्तुर खुद्द

नोटीस.

बेशमी—— जानकाई मर्द रामजी कराळे राहणार मनसगांव हल्लीं वस्ती शिलोडी ता० व पोष्ट खामगांव होत:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो ऐसाजे:—— तुह्मी माझ्या साक्षांत चुलती आहांत; आपले भ्रतार रामजी बुवा यांस मरून चार महिनें होत आले. तुह्मी मौजे मनसगांव येथील रुयाडीचे शेतांतील हिस्सा आणि मौजे डांगरखेड येथील शेत सर्व्हे नंबर २१ मधील हिस्सा व तुमचें मनसगांवचें राहतें घर ही स्थावर वडिलोपार्जित जिनगी तुह्मी विकणार आहांत असें ऐकतों ह्मणून कळवितों कीं वरील जिनगी विकण्याचा, गहाण ठेवण्याचा अगर बक्षीस देण्याचा वगैरे हक्क तुह्मांस नाहीं. फक्त तुह्मी आपल्या हयातीपर्यंत त्यांचा उपभोग घ्यावा. असें न करितां या संबंधीं कांहीं विक्री, बक्षीस, गहाणादि व्यवहार कराल तर तो सर्व बातल समजला जाईल. ह्मणून ही नोटीस दिली असे. कळावें तारीख ३१ मार्च १९०४ इ.

सहीची निशाणी
विठू वल्लद कुकाजी पाटील राहणार मनसगांव पोस्ट शेगांव याचे हातची रेघ.

जाहिरात

सर्व लोकांस या जाहीर लेखानें कळविण्यांत येते कीं, माझी चुलती नामें जानकाई मर्द रामजी कराळे ही मौजे मनसगांव येथील राहतें घर, व रुयाड्याच्या शेतांतील हिस्सा, आणि डांगरखेड येथील शेत सर्व्हे नंबर २१ मधील हिस्सा विकणार आहे. तिला ही जिनगी विकण्याचा, बक्षीस देण्याचा, किंवा गहाण ठेवण्याचा बिलकुल अधिकार नाहीं. सबब जो कोणी तिजशीं वरील जिनगी संबंधानें व्यवहार करील तो फसेल. त्याची जबाबदारी वरील इस्टेटीवर नाहीं. कळावें, तारीख ३१ मार्च १९०४इ.

सहीचीं निशाणी
विठू वल्लद कुकाजी पाटील राहणार मनसगांव याचे हातची रेघ.

नोटीस

बेशमी बाळाजी वल्लद राघुजी तेली गाईकवाड राहणार देऊळगांव साकरशा जिल्हा बुलढाणें तालुके मेहेकर यांस:——

खालीं सही करणार इनकडून नोटीस पेण्यांत येते कीं तुमचे व माझे लग्न जाहल्यास सुमारे वीस वर्षे झालीं आणि मी वयांत आल्यास सुमारें ८।९ वर्षे झालीं तेव्हां पासून दोन तीन वर्षे आपलें घरीं राहिले परंतु संसाराचें सुख जें असावें तें तुमचेपाशीं नाहीं हल्लीं मी आपलें मवाचें घरीं ५।६ वर्षे आहे. मुंगळे गांवचे चार इसमांनीं एकवेळ व दुसरे वेळीं पातुरकर चार इसम व माझा भाऊ या सर्वांनीं मिळून तुमचे घरीं पोचविले असतांही तुह्मापासून संसाराचें सुख मुळींच मिळत नाहीं तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत मला आपलें घरीं घेऊन जावें आजपर्यंतचे खावटीचे पैसे द्यावे आणि संसाराचें सुख द्यावें. तसें मुदतींत न केल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क कोणतेच तऱ्हेनें राहणार नाहीं. कळावें, तारीख २९।३।०४

सही
रुखमाई मर्द बाळाजी तेली
गाइकवाड राहणार देऊळगांव
साकरशा हल्लीं वस्ती मुंगळ.
दस्तुर— लक्ष्मण महादु तेली
राहणार मुंगळ.

नोटीशीचें उत्तर

बेशमी सावित्री मर्द भिवसन बाकोडे राहणार उमरी महमदाबाद प्रगणें अंजनगांव इजला:——

खालीं सही करणार याजकडून नोटीसीचा जबाब देण्यांत येतो कीं तुमची नोटीस वतनदार प्रेसमध्यें आलेली पावली मी तुजला बाळगण्यास तयार असून तुजला नेण्याकरितां दोन चार वेळ आलों परंतु तू आली नाहींस तरी अद्यापि येणें असल्यास आठ दिवसांत निघून यावें मजला जे रुपये १५० दीडशे मागितले ते मी देण्यास कबूल नाहीं कारण मी जर तुजला बाळगविले नसते तर तुझें ह्मणणें रास्त होतें परंतु तसें नसून काहीं तरी मजला भीती घालावी असें तुजला वाटल्यावरून रुपये मागितले मी बाळगण्यास तयार आहे मी फारकत देण्यास कबूल नाहीं जर तू दुसरा घरठाव करशील तर फौजदारी गुन्ह्यास पात्र होसील ही नोटीस लिहून तुजला कळविले आहे. कळावें तारीख २८-३-१९०४ इसवी०

सही
भिवसन यादोजी पाटील राहणार
बामणी बाकोडे दस्तुर खुद्द.

नोटीस

आन्या वा. नाम्या माहार वस्ती कसबे आडगांव तो. आकोट. यांस.

रामा वल्लद उद्या माहार वस्ती कसबे अडगांव याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तारीख २१ आगष्ट सन १९०१ रोजीं माझी मुलगी गुनी तुला गंधर्वानें बायको करण्याचा ठराव करून मला तू करारनामा लिहून दिला कीं गंधर्व झाल्या नंतर लग्नाची बायको सजी इजला फारकती देऊन सोडून देईन व तुझे मुलीसी संसार करीन. असे न करितां पहिले बायकोस बाजवीन तर करारनामा फारकती समजून तुझे मुलीस माझे येथून घेऊन जावे या प्रमाणें लिहून दिला. परंतु तसे न करितां आपले पहिले बायकोसी संसार करून आहेस त्यामुळें हल्लीं गेले आषाढ महिन्या पासून माझी मुलगी माझे घरीं आहे करून कळविण्यांत येते कीं करारनाम्याचे शर्ती प्रमाणें नोटीस पावले दिवसापासून चार दिवसांत व्यवस्था करून माझा खावटीचा खर्च आपण देऊन मुलीस घेऊन जावे. तसे न केल्यास करारनामा फारकती समजून व मुलीवर तुझा कोणतेही प्रकारें हक्क नाहीं असें समजून तिला दुसरा नवरा करून देईन हे तुला कळावें. तारीख ३० माहे मार्च सन १९०४ इसवी०

सही
रामा वल्लद उद्या माहार वस्ती
कसबे अडगांव निशानी खुद.
दस्तुर— सुर्यभान वल्लद रावजी
माहले राहणार अडगांव खुर्द
जाहगीर दस्तुर खुद.

नोटीस

बेशमी १ महमद हयात वल्लद शेकरहिम, २ महमद हुसेन, ३ महमद यासीन व ४ महमद इसमाईल सर्व राहणार वाडेगांव यांस:—

सयद अमीर वल्लद सयद महेबूब काजी वाडेगांव. यांजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं वाडेगांव येथील काजीपणाचे वतनदारीचे हक्काची बाब फेब्रुवारी १९०४ अखेर पर्यंत तुह्मी मजला देत आले, तारीख १।३।०४ पासून पुढें देणें बंद केलें याचें कारण काय ते ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत कळवावे. तसे न केल्यास रीती प्रमाणें तजवीज केली जाईल व या नोटीशीचे व दुसरे सर्व खर्चा सुद्धां नुकसान तुमचे पासून भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख २ माहे एप्रिल सन १९०४ इ०

सही
सयद अमीर वल्लद सयद महेबूब
काजी राहणार वाडेगांव
पोष्ट— वाडेगांव.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ४ शके १८२६

मुलकी कारभार

या प्रांताच्या मुलकी कारभाराचा वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध होऊन अर्धा पाऊण महिना होत आला. त्या रिपोर्टांतील कांहीं महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख आज करावा असा आमचा विचार आहे. रा. रा. हेअर साहेब कमिशनर यांच्या हातचा हा शेवटचाच वार्षिक रिपोर्ट होय.

रिपोर्टीच्या वर्षी ह्मणजे १९०२-०३ सालीं पर्जन्याची सरासरी २८॥ इंचापर्यंत पोंचली. पहिला दुष्काळ १८९६-९७ सालीं पडला त्याच्या पूर्वी दहा वर्षांच्या पर्जन्याचें मान ४०॥ इंचांचे होतें. तेंच प्रमाण गुदस्ता फक्त २८॥ इंच पावसावर येऊन बसलें. प्रथमतः जुलै महिन्यांत पर्जन्याला चांगला प्रारंभ झाला; पण पुढें पावसानें हेळसांडच केली. तथापि आक्टोबर महिन्यांत झालेल्या वृष्टीनें खरीपाच्या पिकास थोडा धक्का बसला तरी रबीचें पीक चांगलें सुधरलें.

श्रीमंतांची शेती

या प्रांतांत जमाबंदीच्या आकारणींत आलेली अशी वहितीची जमीन १२९४२ चौरस मैल असून त्यांपैकीं १२६९९ चौरस मैलाचें क्षेत्र कुळांच्याकडे वहितीला आहे. दुष्काळांत जमिनीची किंमत फार उतरली होती पण पुनः सर्वत्र जमिनीला किंमत फारच फार येऊं लागली आहे. शेती फार पिकूं लागली, लोक सधन झाले आणि त्यांच्या पैशाला कोठें वाटा नाहींत ह्मणून जमिनीची किंमत फार चढली असें कोणी प्रतिपादन केल्यास तें आह्माला संमत नाहीं. अलिकडे सावकारांचा व इतर धंदेवाल्यांचा पैसा ह्मणजे समाजांतील मध्यम वर्गांतील लोकांच्या हातून नानाविध प्रकारांनीं गेलेला आणि श्रीमंताच्या घरीं संचित होत चाललेला पैसा होय. हा पैसा जमिनी खरेदी करण्याकडे अलिकडे फार जातो आणि खरेदीदार लोक ब्यांकेंतील व्याजाच्या दरानें आपल्या पैशाची किंमत करितात आणि ह्मणूनच त्या दृष्टीनें अलिकडे शेतीला किंमत फारच अधीक येत असते. वरील गोष्टीला अपवाद बुलढाणें जिल्ह्यांतील चिखली तालुक्यांत पुष्कळसा दृष्टीस पडतो. तेथील कुळें सरकारची जमीन आपण होऊनच परत करितात आणि अशी सोडलेली जमीन वहितीला घेण्यासाठीं पुष्कळसे उमेदवार तयार नसतात. इतकेंच नाहीं तर ८४२ शेतें हरास केलीं तेव्हां जमिनीच्या साऱ्याची देखील रकम वसूल झाली नाहीं. चिखली व मेहकर तालुक्यांतील सरकारी जमीन साऱ्याच्या रकमेला कोणी वहितीला घेऊं नये ही गोष्ट मोठी आश्चर्यकारक असून तिकडील लोकांची विपन्नावस्था व्यक्त करित.

या अपवादाचें स्पष्टीकरण विशेष विस्तारानें यावयाला पाहिजे होतें पण तत्संबंधीं सरकारी रिपोर्टांत मौनव्रताचा स्वीकार केलेला आहे. तथापि चीफ कमिशनर साहेबांनीं विशेष कळकळ दाखविली आहे आणि चिखली तालुका पूर्ववत् सुखी व संपन्न करण्यासाठीं जर कांहीं निराळ्या गोष्टी करावयाच्या असतील तर त्या अवश्य अमलांत आणाव्या ह्मणून डिपुटी कमिशनर व कमिशनर या उभय अधिकाऱ्यांस मुद्दाम सूचविलें आहे. आज पर्यंत ७२ हजार रुपयांची माफी देण्यांत आली आहे. तगाईचा पैसा लोकांस नकोसा असतो असें आह्मांस वाटत नाहीं. एकंदर ६२२०० रुपये तगाई साठीं मंजूर केले होते पण फक्त १४।१५ हजार रुपये लोकांस तगाईच्या रूपानें कर्जाऊ देण्यांत आले. तगाईचा व्यापार रयतेच्या सोयीसाठीं आहे, लोक गरजवंतही आहेत पण अधिकाऱ्यांच्या कटकटीमुळें लोक तगाईचा नाद सोडतात असा कुमार श्री हरमामनी यांचा अभिप्राय आहे आणि त्यांतच आह्मांस पुष्कळसें तथ्य दिसतें.

आबादानीचा भ्रम

१९०२-०३ सालीं ऐनकाळीचा वसूल पऱ्यासुद्धां ७६,९१,६८४ रुपयांचा होता आणि तो बहुतेक फार लवकर वसूल झाला ह्मणून सरकारी रिपोर्टांत लोकांच्या सुखसंपन्नते विषयीं अनुकूळ असे अभिप्राय ठोकून देण्यांत आले आहेत. आमच्या दृष्टीनें हा प्रकार मोठा भ्रामक आहे. सरकारांतून साऱ्याविषयीं फार सक्ती होते आणि मुंबई इलाख्यांत जमिनीच्या नव्या कायद्याच्या गोष्टी ऐकून लोक भितीनेंच अगोदर सारा भरतात. सरकार सवाईनें दंड वसूल करितील व प्रसंग विशेषीं जमिनीही काढून घेतील अशी लोकांस मोठी भीति आहे आणि तिचा मुख्य परिणाम ह्मणजे साऱ्याचा तात्कालिक वसूल होय. फक्त अपवाद चिखली व मेहेकर या दोन तालुक्यांचा आहे.

सार्वजनिक इनामें

आमच्या प्रांतांत इनामी व जहागीर जमीन फारशी नाहीं. तिचें क्षेत्रफळ एकंदर ४,७०,७५० एकर असून जमाबंदीची आकारणी २,९५,३२९ रुपये आहे. या आकारणी पैकीं सरकारी मालकीची दस्तुरी ३९६७२ रुपयांची आहे. जीं इनामें किंवा जहागिरी खानगी आहेत त्या संबंधानें आमचें कांहीं ह्मणणें नाहीं, परंतु जी देणगी देवकार्यार्थ, किंवा सार्वजनिक लोककार्यार्थ आहे तिचा विनियोग यथायोग्य होत नाहीं असा आमचा अनुभव आहे. या प्रकारच्या धर्मार्थ देणग्या संबंधानें दर पांच वर्षांनीं पंच मार्फत चौकशी होत जावी अशी आमची सूचना आहे. इतर प्रांतांत धर्मार्थ देणग्यांची वहिवाट फार काळजीपूर्वक होत असते व तत्संबंधीं मद्रास इलाख्यांत विशेष चळवळ आहे ह्मणून आह्मी ह्मणतों कीं तिकडील धोरणावर या प्रांतीं देखील कांहीं विशिष्ट व्यवस्था होणें फार अगत्याचें आहे.

सोनू बाईचा बाळा

सरकारी सारा वसूल करणारी मुख्य अधिकारी मंडळी ह्मटली ह्मणजे पाटील पटवारी हे होत. एकंदर ६१८९ पाटील व २६५६ पटवारी आहेत. त्यांस मुशाहिऱ्या बद्दल ७,५३,९४१ रुपये दिले गेले. सरासरीनें प्रत्येक पाटलला सालिना ५५ रुपये पडतात व प्रत्येक पटवाऱ्यास १४६ रुपये पडतात. हा रोजमुरा फारच अल्प आहे. वडिलोपार्जित वतनदारीसाठीं ह्मणून पाटील पटवारी जीव कीं प्राण करितात परंतु कालमानानें ती वतनदारी किंमतीनें हलकी झाली आहे, सरकारांत तिला मोठासा मानपान नाहीं आणि पाटलाची स्थिती तर एखाद्या मोलकऱ्यापेक्षां ही कमी दर्ज्याची सरकारी अधिकाऱ्यांच्या अरेरावीनें झाली आहे. हे विचार कित्येक वतनदार मंडळीस आवडणार नाहींत पण आह्मी वस्तुस्थितीचें चित्र रेखाटलें आहे ह्मणून ते आह्मांस माफी करितील अशी उमेद आहे.

बेअब्रूचा निवाडा

—:०:—

आमच्या येथें राजमार्गावर नेटिवांच्या गाड्यांना मनाई होत असे अशा संबंधानें आह्मी पूर्वीच उल्लेख केलेला आहे. आणा एका प्रसंगीं रा. रा. केशव गोविंद दामले हायकोर्ट वकील यांचे गाडीला प्रत्यवाय करण्यांत आला आणि त्यावेळीं त्यांची गाडी पोलिस स्टेशनांत पाठविण्यांत येऊन बैल कोंडवाड्यांत घालण्यांत आले ही गोष्ट आह्मी पूर्वी लिहिली तेव्हां त्या प्रसंगाच्या अनुरोधानें एक बेअब्रूचा घडलेला प्रकार आह्मी त्या वेळीं मुद्दाम तपशीलवार कळविला नव्हता हा बेअब्रूचा खटला मोठा चमत्कारिक आहे आणि त्या संबंधांत न्याय कोर्टानें बरोबर न्याय केला नाहीं इतकेंच नाहीं तर दाद मागण्यास गेलेल्या फिर्यादी वरच वाक्प्रहार करण्यांत आले असें कळतें.

मूळची गोष्ट अशी कीं, रा० दामले यांच्या गाडीला जेव्हां अटकाव झाला तेव्हां समक्ष तेतेथें नव्हते पण त्यावेळीं राव बहादूर दत्तात्रय विष्णु भागवत हायकोर्ट वकील यांची स्वारी आपल्या शिवणीच्या बंगल्यावर चालली असतांना त्यांच्या देखत हा सर्व प्रकार घडला. त्यांनीं त्या अटकाव करणाऱ्या पोलिस कानस्टेबलास त्याचें नांव व नंबर विचारून घेतला आणि गाडी व बैल हीं त्याच्या स्वाधीन केली. ही गोष्ट करितेवेळीं त्यांनीं जवळच्या मिशन हौस मधील मंडळींना तेथें बोलावून घेतलें होतें. शिपायानें आपलें नांव व नंबर हीं देण्यापूर्वी पुष्कळसा हटवाद केला आणि रावबहादूर भागवत यांचें नांव गांव टिपून घेतल्यानंतर आपला पत्ता त्यांना दिला. आणि नंतर सर्व मंडळी आपापल्या मार्गानें रवाना झाली.

येथ पर्यंत सर्व गोष्ट ठीक झाली. पोलिस शिपायाला मज्जाव करण्याचा हुकूमच जर होता तर त्यानें थोडासा आपल्या अधिकाराचा अतिरेक केला असला तरी आह्मी त्याच्या दर्जाच्या मानानें त्याला फारसा दोष दिला नसता. पण या पुढील त्या शिपायाचें काल्पनिक अवडंबर फारच धाडसाचें होतें. राव बहादूर भागवत यांच्या संबंधानें त्याच्या मनांत भीति उत्पन्न झाली ह्मणून ह्मणा किंवा आपण केलेली गोष्ट गैरवाजवी घडली असें त्याला वाटलें ह्मणून ह्मणा, त्यानें वरील प्रसंगावर एक निराळीच गोष्ट रचली. माझा पोलिसचा काळा डगला रावबहादुरांनीं धरला व मला ओढलें तेव्हां तो फाटला व या रीतीनें माझ्या कामांत व्यत्यय आणण्यांत आला अशी बतावणी त्यानें लागलीच येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेली साहेब यांच्यापाशीं केली, आणि रावबहादुरा संबंधानें आपलें गाऱ्हाणें त्यांच्या कानावर घातलें. वस्तुतः ही गोष्ट कांहींच घडली नव्हता. आणि रावबहादुरांना त्या बिचाऱ्या शिपायानें आपल्या विरुद्ध असें खोटें गाऱ्हाणें केलें असेल हें खरेंहि वाटेना. ह्मणून त्यांनीं डाक्टर रेली साहेब यांस चिठी लिहून चौकशी केली. तेव्हां त्यांच्या मनाचा भ्रम दूर झाला आणि त्यांच्या मनाची स्थिती अर्थातच अगदीं गोंधळल्याप्रमाणें झाली असली पाहिजे. पोलिसच्या शिपायाच्या कामांत हरकत करणें व त्याचा डगला फाडणें हा कायद्यानें मोठा गुन्हा आहे व तो कैदेच्या शिक्षेला पात्र आहे; आणि जवळ जवळ अशाच गुन्ह्याचा आरोप त्या शिपायानें आपल्या मार्थी आणलेला आहे, तरी देखील या शुल्क शिपायासंबंधानें हें प्रकरण पुढें लांबवर वाढविण्यानें रावबहादुराच्या मनांतून नव्हतें परंतु हा त्यांचा स्वस्थ बसण्याचा विचार त्यांच्या मित्रमंडळींना पसंत पडला नाहीं. अशा खोट्या विधानाचा प्रतिकार करावा ही गोष्ट फार आवश्यक दिसली आणि ह्मणूनच रावबहादुरांनीं त्या शिपायावर बेअब्रूची फिर्याद येथील पहिले वर्ग माजिस्ट्रेट रा. रा. क्रे साहेब यांच्या कोर्टांत आणिली.

पहिले दिवशीं रावबहादुरांची सांप्रदाया प्रमाणें प्रतिज्ञेवर जबानी झाली आणि सर्व गोष्ट माजिस्ट्रेट साहेबांनीं ऐकिली तेव्हां माजिस्ट्रेट साहेबांनींच उद्गार काढले कीं, रावबहादूर फार शांतवृत्तीचे आहेत आणि ह्मणूनच त्यांनीं शिपायाची गाडी बैल नेण्यासंबंधाची अपक्रिया निमूटपणें होऊं दिली. रावबहादूर भागवतांच्या दर्जाचा दुसरा कोणी गृहस्थ असतां तर त्यानें आपल्या स्वाभाविक ऐटीनेंच त्या शिपायास झिटकारून दिलें असतें. पण तसा डौल रावबहादुरांच्या अंगीं नाहीं या विषयीं थोडासा न्यायाधिशांना अचंबाहि वाटला. पुढें साक्षी पुरावा झाल्यानंतर आरोपीवर चार्ज ठेवावा किंवा नाहीं याचा विचार करणेसाठीं हें प्रकरण गेल्या सोमवारपर्यंत तहकूब होतें. सोमवारीं न्यायाधिशांनीं असा निकाल सांगितला कीं, आह्मी आरोपीस सोडून देतों आणि कोर्टास त्रास देण्यासाठीं विनाकारण ही फिर्याद आणल्याबद्दल रावबहादुरावर काय चाळूं त्यांस दंडहि करण्यांत आला असतां पण ज्या अर्थी आरोपीनें खोटेंच विधान केलेलें आहे त्या अर्थी फिर्यादीवर उलट प्रकरण आह्मी चालवीत नाहीं. या प्रकरणाचा अक्षरशः निकाल नकला मिळाल्यानंतर आह्मी वाचकासमोर मांडणार आहोंत परंतु फिर्यादीच्या वकिलांच्या सांगण्यावरून वरील निकालाचा

दन्तकुसुमाकर

खाली लिहिलेल्या दताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... -॥-

देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कद्रदां है हम॥

दांतावर जाळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वाकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खऱ्या आणि अचूक औषधांचा गुण शंभरांतून एक देन रोगास कदाचित् न आलाच तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नपतन व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रनें, कोष, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धूपणी छातीतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य विनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास योग्य उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचें आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास पाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ० ८६ आणे पडेल. अनुपान खडी सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील दरावर मिळतील. दरः—

३६ गो०	१ रु०	७५ गो०	२ रु०
११५ गो०	३ रु०	१६५ गो०	४ रु०
२७३ गो०	६ रु०	५५० गो०	१० रु०

आमचकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा कॅटलाग मागवावा, फुकट देऊं. पाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलिकडे २।३। वर्षे आंजरलें चोर ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

ORIENTAL

GOVERNMENT SECURITY

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED,

Established 1874,

Head Office—**BOMBAY**

Chief Agency for C. P. Berar & Khandesh

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED

TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay, in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
for C. P. Berar and, Khandesh

मुंबई बँकचीं सेव्हिंग्स बँक

या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी वनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन ग्रोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस

काळबा देवी पोस्ट

मुंबई.

जाहिरात

कोडावर रात्रीचें औषध

हटकून गुण डबीस २ रुपये.

व्ही. एम. जोशी

पोलिस टाऊन नजीक उमरावती

प्रांत वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

लेजच्या जुन्या मंडळीमध्यें वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध अशीं जीं विद्वद्रत्नें आह्मांस लाभलीं होतीं त्यांपैकींच रा० महाजनी हे होत. आणि ह्मणूनच प्रिंसिपाल सेल्बी साहेब यांनीं त्यांस मुद्दाम आमंत्रण केलें होतें.

रा० अण्णासाहेब महाजनी यांनीं वरील समारंभांत जें प्रेमळ, सुश्राव्य व बोधपर व्याख्यान दिलें त्यामध्यें साधा व कळकळीचा सुंदर बोध आहे असें सांगून 'ज्ञानप्रकाश'कार ह्मणतात कीं हा बोध आत्मानुभवानें उजळेला असून त्यांत दाखविलेली नीति कर्तव्याची दिशा सर्वांच्या नेत्रांमुळें आदर्शवत सतत राहावी अशी त्या व्याख्यानाची महती आहे.

रा० अण्णा साहेब यांचें तें व्याख्यान आह्मांस वाचण्यास अद्याप मिळालेलें नाहीं. तथापि त्या व्याख्यानाचा तिकडील पत्रकारांनीं केलेला गौरव आणि त्यांच्या व्याख्यानाविषयीं व्यक्त केलेला आदरभाव हीं पाहून आह्मांस पराकाष्टेचा आनंद वाटतो. राजश्री अण्णासाहेब हे बाहेर गांवीं जाऊन जेव्हां जेव्हां आपल्या अमृतमय वाणीनें लोकवृंद आनंदित व प्रसन्न करून टाकतात आणि तत्संबंधीं पुणें, मुंबई, नगर, धुळें इत्यादि स्थळोस्थळींच्या पत्रांतून जेव्हां त्यांच्या गुणांचा नैसर्गिक आमोद आह्मी पेर्थे बसून घेतों तेव्हां एखादे वेळ असा भ्रम होतो कीं, हे दूरवर इतके महदुपकार करितात तर मग आह्मा सारख्या अती निकट असलेल्या मंडळीवर त्यांचा अनुग्रह खरोखरच नाहीं कीं काय! पण वस्तुतः तसा प्रकार नाहीं. आपल्या करतलावरील रत्न पृथ्वीच्या मोलाचें जरी असलें तरी प्रसिद्ध पेठेंतील जवाहीर वाला त्याची किंमत जाहीर करी पर्यंत त्याच्या खऱ्या किंमतीची ओळख बरोबरशी होत नाहीं. हीच गोष्ट आपल्या जवळील सुंदर चित्र किंवा सुंदर पुष्प याच्या संबंधानें आपणांस प्रत्यही अनुभवास येते. आपल्य दिवाणखान्यांतील सुंदर चित्राची वाखाणणी कुशल चित्रकारांनीं करावी किंवा आपल्याच बागांतील सुंदर पुष्पाचा आमोद एखाद्या परीक्षक सुगंध्यानें वर्णनावा ह्मणजे आपल्याला त्या रत्नाची, चित्राची, किंवा पुष्पाची खरी थोरवी कळते व आपण अधिक गुणलुब्ध होतो. जवळ जवळ असाच प्रकार रा. अण्णासाहेबांच्या संबंधानें लिहितांना आमच्या सारख्यांच्या मनाचा होत आहे. आणि ती गुरुमूर्ती आमच्या संन्निध असतांना आपले सद्गुण आह्मांमध्यें किती तरी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतिनें प्रेरित करीत असेल याची नीटशी कल्पना होणें दुर्घट होय. त्यांचा नैसर्गिक जिव्हाळा असाच जोरदार आहे कीं, त्यांच्या कक्षेंत येणाऱ्या लोकांमध्यें ते एका प्रकारचा जोम व जोर नवा नवा भरीत असतात. अशी ही ईश्वरदत्त शक्ती विरळाच आढळते.

सुख संमेलन

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळा प्लेगामुळें दोन वर्षें भरला नव्हता पण यंदा उमरावती येथें गेल्या शनिवारीं व रविवारीं या संस्थेची मंडळी पुष्कळशी जमून सर्वांनीं सुखसंवाद, सुखभोजन आणि सुखक्रीडा यांचा आस्वाद फार प्रेमळपणानें घेतला. ही मंडळीची सुखकर उल्हासवृत्ती एखाद्या अधिक सुखद इष्ट कार्याकडे लागावी असा पुष्कळ दिवसांचा जुना प्रश्न आहे पण त्याचा निकाल अद्याप पर्यंत सुखकारक होत नाहीं. ह्या उणीवेकडे संस्थेच्या चालकांनीं आस्थेचा लक्ष पुरवावें अशी आह्मी शिफारस करितो.

वऱ्हाडमुन

हवामान— उष्णतेचें मान फार प्रखर होत चाललें आहे. दिवसा फार उष्णा होतो तथापि अजून रात्रींचा थंडपणा बराच सुखकर वाटतो. प्लेगाची रोगराई बहुतेक अस्तास गेली आहे. आणि उन्हाच्या तापामुळें लोक रानांतून घरोघर परत येऊं लागले आहेत. येथील पेठेचे बाजारभाव अगदीं स्थिर आहेत.

रा. रा. बॅटन साहेब ज्युडिशिअल कमिशनर यांची प्रकृती चांगली सुधरत असून ते येत्या १५ वे तारखे पासून आपले कामाचा चार्ज घेतील असा अंदाजा आहे. आणि कर्नल गॅरेट साहेब ऑफिशिएटिंग ज्यु० कमिशनर हे पूर्वी ठरल्या प्रमाणें रजेवर विलायतेस जातील.

रा. रा. जोन्स सुपरिंटेंडंट निसबत ज्युडिशिअल कमिशनर हे पेनशनला आले आहेत. तथापि त्यांच्या चाकरीची मुदत चालू महिना अखेरपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

आणि त्यांस पेनशन मिळाल्यानंतर त्यांची जागा रा. रा. क्रो साहेब हेडक्लार्क निसबत डेपटी कमिशनर आकोला यांस देण्यांत येणार आहे अशी आनंदाची बातमी कळते.

रा. रा. महमद रहिमतुल्ला तहशिलदार वणी यांनीं चालू महिन्यांत २७ दिवसांची हक्काची रजा घेतली असून तेथील ना० तहशिलदार रा० रा० रामकृष्ण अमृत देशपांडे अडगावकर यांस तहशिलदार नेमण्यांत आलें आहे.

अलावा —यंदा मोहरमचा सण आमच्या शहरीं सुखानें शेवटास गेला. रात्रीं वाद्यें वाजविण्यासंबंधानें सरसकट परवानगी पाहिजे होती पण ती यंदा रात्रींच्या १२ च्या पर्यंतच देण्यांत आली होती. वाद्यासंबंधानें अलीकडे होत आलेला मनाईचा प्रकार फार गैरशिस्त आहे असें आह्मांत वाटतें. या साली येथें ताबूद थोडे झाले पण जलशांची गंमत विशेष व्यवस्थेशीर असून तमाशबिनी चांगली जमत असे. आमच्या अगरेवशीविरील स्वारीचा जलसा त्रि० बहादुर बुकबायंडर यांनीं चार मंडळींच्या सहाय्यानें फार चांगला केला.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. वामन संतो क्लार्क ऑफ कोर्ट इलिचपूर यांस प्लेगाच्या नवज्वरानें देवाज्ञा झाली. गृहस्थ अगदीं तरुण असून स्वभावानें फार गरीब होते.

वर्तमानसार

सारांश दिला आहे. सरासरी न्यायाधिशांचा असा अभिप्राय पडला कीं, त्या शिपायानें डाक्टर रेली जवळ जें विधान केलें तें स्वतःच्या बचावाकरितां केलें आणि त्यांत रावबहादुरांची बेअब्रू करण्याचा त्याचा इरादा नव्हता. या शिवाय रावबहादुरांची बेअब्रू यःकिंचित शिपायाच्या सांगण्यानें झाली आहे असें वाटत नाहीं. रावबहादुरांचा सरकारदरबारांतील मान इतमाम, त्यांची सामाजिक उच्चस्थिती आणि त्यांची लोकप्रियता ही लक्ष्यांत घेतली ह्मणजे कोणीहि एखाद्या शिपायाच्या अद्वातद्वा सांगण्यावरून त्यांस लघु लेखणार नाहीं किंवा त्यांची इतरांच्या दृष्टीनें अब्रूही कमी होण्या सारखा नाहीं. अशा आशयाचा साहिबांच्या फैसल्याचा रोख आहे असें सांगतात.

अशा रीतीनें हा बेअब्रूचा खटला निकाळास लागला हें कोणाही मुज्ञास बरें वाटणार नाहीं. या अशा विपरीत निकाला नंतर जर कोणी आह्मांला बातमी येऊन सांगेल कीं, त्या पोलिस शिपायानें आपला कोट फाडल्याबद्दल राव बहादुरांवर फिर्याद केली आणि त्यांत ते दोषीही ठरले तर ही बातमी खोटी आहे असा संशय घेण्यास आमचें मन प्रवृत्त होणार नाहीं. पण वस्तुतः तसा प्रकार घडला नाहीं हें आह्मांस पक्कें माहींत असल्यामुळें आमच्या मनाची स्थीरता व समाधानवृत्ती कायमच राहील. वरील बेअब्रूचें प्रकरण राव बहादूर भागवत येथेंच सोडून देतील आणि त्याची या प्रांताच्या श्रेष्ठ कोर्टांत शहानिशा करून घेणार नाहींत असा कित्येकांचा त्यांच्या संबंधानें अभिप्राय पडतो पण आह्मी त्या सर्वांचा अंदेशा दूर करण्यासाठीं अशी प्रतीच्छा दर्शवितों कीं, इतक्या बराबर गोष्ट आल्या नंतर आणि हायकोर्टांत जाणें हा जर न्यायाचा पंथ आहे तर त्या मार्गांतून राव बहादूरांचें पद यत्किंचितही चलन पावणार नाहीं.

पैशाची गुलामगिरी

१५ दिवसांपूर्वी येथील कचेऱ्यांच्या वेळां संबंधानें मेजर कोलंब साहेबांनीं जो हुकूम फर्माविला होता त्या संबंधानें येथील राव बहादूर भागवत प्रभृति वकील मंडळी एक अर्जी घेऊन साहेबांस विनंती करण्याकरितां गेली होती. त्या मुलाखतींत साहेब बहादुरांनीं वकील मंडळींना अशा अर्थानें संबोधिलें कीं, वकिलांचें गाऱ्हाणें आह्मी ऐकत नाहीं; वकिलांचा कोर्टाशीं कांहीं संबंध नाहीं. ते नुसते आपल्या कुळाचें काम करण्यासाठीं येतात आणि त्या कामानिमित्त ते कुळापासून पैसाहि घेत असतात आणि ते कोर्टांत येतात ह्मणजे ते आपल्या पैशासाठीं येतात. तेव्हां कोर्टाच्या वेळे संबंधानें कांहीं एक हूं चूं करण्याचा त्यास हक्क नाहीं. इत्यादि इत्यादि प्रकारच्या दुर्वचनांनीं मेजर कोलंब साहेबांनीं वकील मंडळींचा उपमर्द केला आणि सामान्य शिष्टसंप्रदायही त्या समयीं साहेबांनीं अंगिकारिले नव्हते अशा विषयीं वकील लोकांनीं मे. ज्युडिशिअल कमिशनर साहेबांकडे दाद मागितली आहे असें कळतें. वकील मंडळीसंबंधानें तूर्त आह्मापुढें प्रश्न नाहीं पण मेजर कोलंब साहेबासारख्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांस आह्मी मुद्दाम असें कळवूं इच्छितों कीं पैशासाठींच सर्व जग आहे, किंबहुना पैसा ही जगाची चालक शक्ती आहे. द्रव्यापुढें वकील काय आणि डेपुटी कमिशनर काय, हे सारख्याच दर्जाचे आहेत. अर्थशास्त्रज्ञ तर मनुष्याची अशी व्याख्या करितात कीं, मनुष्य हा अर्थ संपादन करणारा प्राणी होय. अर्थशास्त्रामध्यें हे सिद्धांत मूलतत्वाचे आहेत पण त्यांचा प्रतिध्वनी वरील प्रकारच्या मुलाखतीच्या प्रसंगीं करणें अगदीं अप्रासंगिक व शिष्टाचाराविरुद्ध आहे. अशाच प्रकारचा उद्गार लार्ड कर्झन साहेबांनीं एका मेजवानीच्या प्रसंगीं नुकताच काढला आहे. ना. रॅले, ना. प्रिंसेप, ना. अमीर अली व मि. लॅटिमर हें पेनशन घेऊन विलायतेस जात असल्या कारणामुळें व्हाइसराय साहेबांनीं त्यांस सरकारी दिवाणखान्यांत मेजवानी दिली. त्या प्रसंगीं वरील चार गृहस्थांचे गुणानुवाद गातांना ते ह्मणाले कीं, इंग्लिश लोक इंडियांत येतात ते आपल्या पगारासाठीं येतात आणि ह्मणूनच इंग्लिश लोकांचा इंडियाशीं असा अगदीं व्यापारी तत्वाचा संबंध आहे असें जें वारंवार प्रतिपादन केलेलें ऐकूं येतें तें बरोबर नाहीं. खरोखर पाहिलें तर अलम दुनियेचा रिवाज असा कीं कोणत्याहि कामाचें वेतन हें त्या कामाचा योग्य मोबदला होय. याच दृष्टींच्या विचारामध्यें जर सर्व पर्यवसान होत असलें तर ती दृष्टी अगदीं क्षुद्रवृत्तीची व नीच प्रकृतीची होय. नंतर व्हाइसराय साहेबांनीं आपल्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ इंग्लिश लोकांनां इंडियाशीं संबद्ध करणाऱ्या नानाविध प्रेम बंधनांचा उल्लेख केला. लॉर्ड कर्झन साहेबांच्याच भाषेनें आह्मी मेजर कोलंब साहेबांस कळवितों कीं, त्यांनीं वकील ह्मणजे पैशाचा चाकर असें ह्मणण्याचें अप्रयोजक धाष्टर्य दाखवूं नये कां कीं, तशा विचाराच्या उच्चारानें बोलणाराचीच लघु दृष्टी प्रदर्शित होते. ते ज्या धर्मासनावर बसतात त्याचा महिमा फार मोठा आहे. व त्यावर बसतांना त्यांनीं आपली विचारदृष्टी उदात्त, उदार व सत्वशील ठेवावी आणि त्या स्थानाचे श्रेष्ठ गुण व देवपणा हीं नेहमीं आपल्या पुढील मंडळीस दाखवावी असा सद्बोध त्यांस व्हाईसराय साहेबांच्या त्या अमृत वाणीनें होईल तर पुष्कळच कार्यभाग सिद्धीस गेला असें आह्मी समजूं.

हातचा हिरा

(मार्च महिन्याची २३ सावी तारीख ह्मणजे पुण्यांतील डेक्कन कॉलेजचा वाढ दिवस होय. त्या दिवशीं कालेजांतील जुन्या व नव्या विद्यार्थ्यांचें संमेलन होत असतें. हा दिवस त्या पाठशाळेंत एखाद्या सणाच्या महोत्सवा प्रमाणें आनंदांत घालवितात. ह्या दिवशीं त्या संस्थेच्या उद्देशाला अनुसरून कांहीं भाषण समारंभही होत असतो. अशा प्रसंगाला संभाषण करण्याचा बहुमान आमच्या येथील श्रेष्ठ व पूज्य गृहस्थ रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस देण्यांत आला होता. डेक्कन कालेजच्या जुन्या मंडळीमध्यें वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध अशीं जीं विद्वद्रत्नें आह्मांस लाभलीं आहेत त्यांपैकींच रा० महाजनी हे होत. आणि ह्मणूनच प्रिंसिपाल सेल्बी साहेब यांनीं त्यांस मुद्दाम आमंत्रण केलें होतें.

रा० अण्णासाहेब महाजनी यांनीं वरील समारंभांत जें प्रेमळ, सुश्राव्य व बोधपर व्याख्यान दिलें त्यामध्यें साधा व कळकळीचा सुंदर बोध आहे असें सांगून 'ज्ञानप्रकाश'कार ह्मणतात कीं हा बोध आत्मानुभवानें उजळेला असून त्यांत दाखविलेली नीति कर्तव्याची दिशा सर्वांच्या नेत्रापुढें आदर्शवत सतत राहावी अशी त्या व्याख्यानाची महती आहे.

रा० अण्णा साहेब यांचें तें व्याख्यान आह्मांस वाचण्यास अद्याप मिळालेलें नाहीं. तथापि त्या व्याख्यानाचा तिकडील पत्रकारांनीं केलेला गौरव आणि त्यांच्या व्याख्यानाविषयीं व्यक्त केलेला आदरभाव हीं पाहून आह्मांस पराकाष्टेचा आनंद वाटतो. राजश्री अण्णासाहेब हे बाहेर गांवीं जाऊन जेव्हां जेव्हां आपल्या अमृतमय वाणीनें लोकवृंद आनंदित व प्रसन्न करून टाकतात आणि तत्संबंधीं पुणें, मुंबई, नगर, धुळें इत्यादि स्थळोस्थळींच्या पत्रांतून जेव्हां त्यांच्या गुणांचा नैसर्गिक आमोद आह्मी येथें बसून घेतों तेव्हां एखादे वेळ असा भ्रम होतो कीं, हे दूरवर इतके महदुपकार करितात तर मग आह्मा सारख्या अती निकट असलेल्या मंडळीवर त्यांचा अनुग्रह खरोखरच नाहीं कीं काय! पण वस्तुतः तसा प्रकार नाहीं. आपल्या करतलावरील रत्न पृथ्वीच्या मोलाचें जरी असलें तरी प्रसिद्ध पेठेंतील जवाहीर वाला त्याची किंमत जाहीर करी पर्यंत त्याच्या खऱ्या किंमतीची ओळख बरोबरशी होत नाहीं. हीच गोष्ट आपल्या जवळील सुंदर चित्र किंवा सुंदर पुष्प याच्या संबंधानें आपणांस प्रत्यही अनुभवास येते. आपल्या दिवाणखान्यांतील सुंदर चित्राची वाखाणणी कुशल चित्रकारांनीं करावी किंवा आपल्याच बागांतील सुंदर पुष्पाचा आमोद एखाद्या परीक्षक सुगंध्यानें वर्णनावा ह्मणजे आपल्याला त्या रत्नाची, चित्राची, किंवा पुष्पाची खरी थोरवी कळते व आपण अधिक गुणलुब्ध होतो. जवळ जवळ असाच प्रकार रा. अण्णासाहेबांच्या संबंधानें लिहितांना आमच्या सारख्यांच्या मनाचा होत आहे. आणि ती गुरुमूर्ती आमच्या संन्निध असतांना आपले सद्गुण आह्मांमध्यें किती तरी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतिनें प्रेरित करीत असेल याची नीटशी कल्पना होणें दुर्घट होय. त्यांचा नैसर्गिक जिव्हाळा असाच जोरदार आहे कीं, त्यांच्या कक्षेंत येणाऱ्या लोकांमध्यें ते एका प्रकारचा जोम व जोर नवा नवा भरीत असतात. अशी ही ईश्वरदत्त शक्ती विरळाच आढळते.)

सुख संमेलन

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळा प्लेगामुळें दोन वर्षें भरला नव्हता पण यंदा उमरावती येथें गेल्या शनिवारीं व रविवारीं या संस्थेची मंडळी पुष्कळशी जमून सर्वांनीं सुखसंवाद, सुखभोजन आणि सुखक्रीडा यांचा आस्वाद फार प्रेमळपणानें घेतला. ही मंडळीची सुखकर उल्हासवृत्ती एखाद्या अधिक सुखद इष्ट कार्याकडे लागावी असा पुष्कळ दिवसांचा जुना प्रश्न आहे पण त्याचा निकाल अद्याप पर्यंत सुखकारक होत नाहीं. ह्या उणीवेकडे संस्थेच्या चालकांनीं अवश्य लक्ष पुरवावें अशी आह्मी शिफारस करितो.

वऱ्हाडमान

हवामान— उष्णतेचें मान फार प्रखर होत चाललें आहे. दिवसा फार उष्णा होतो तथापि अजून रात्रींचा थंडपणा बराच सुखकर वाटतो. प्लेगाची रोगराई बहुतेक अस्तास गेली आहे. आणि उन्हाच्या तापामुळें लोक रानांतून घरोबर परत येऊं लागले आहेत. येथील पेठेचे बाजारभाव अगदीं स्थिर आहेत.

रा. रा. बॅटन साहेब ज्युडिशिअल कमिशनर यांची प्रकृती चांगली सुधरत असून ते येत्या १५ वे तारखे पासून आपले कामाचा चार्ज घेतील असा अंदाजा आहे. आणि कर्नल गॅरेट साहेब ऑफिशिएटिंग ज्यु० कमिशनर हे पूर्वी ठरल्या प्रमाणें रजेवर विलायतेस जातील.

रा. रा. जोन्स सुपरिंटेंडंट निसबत ज्युडिशिअल कमिशनर हे पेनशनला आले आहेत. तथापि त्यांच्या चाकरीची मुदत चालू महिना अखेरपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

आणि त्यांस पेनशन मिळाल्यानंतर त्यांची जागा रा. रा. क्रो साहेब हेडक्लार्क निसबत डेपटी कमिशनर आकोला यांस देण्यांत येणार आहे अशी आनंदाची बातमी कळते.

रा. रा. महमद रहिमतुल्ला तहशिलदार वणी यांनीं चालू महिन्यांत २७ दिवसांची हक्काची रजा घेतली असून तेथील ना० तहशिलदार रा० रा० रामकृष्ण अमृत देशपांडे अडगावकर यांस तहशिलदार नेमण्यांत आलें आहे.

अलावा —यंदा मोहरमचा सण आमच्या शहरीं सुखानें शेवटास गेला. रात्रीं वाद्यें वाजविण्यासंबंधानें सरसकट परवानगी पाहिजे होती पण ती यंदा रात्रींच्या १२ च्या पर्यंतच देण्यांत आली होती. वाद्यासंबंधानें अलीकडे होत आलेला मनाईचा प्रकार फार गैरशिस्त आहे असें आह्मांत वाटतें. या साली येथें ताबूद थोडे झाले पण मळशांची गंमत विशेष व्यवस्थेशीर असून तमाशबिनी चांगली जमत असे. आमच्या अगरवेशीवरील स्वारीचा जलसा मि० बहुदिन बुकबायंडर यांनीं चार मंडळींच्या सहाय्यानें फार चांगला केला.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. वामन संतो क्लार्क ऑफ कोर्ट इलिचपूर यांस प्लेगाच्या नवज्वरानें देवाज्ञा झाली. गृहस्थ अगदीं तरुण असून स्वभावानें फार गरीब होते.

वर्तमानसार

राज्यपदाचा बेत— आपल्या नेटिव संस्थानिकांस राज्यद्वेषाची भावना झालेली दिसते!! कंब्याचे (लाहोर) महाराज राजा राजारामसिंग यांनीं आपणांस गादीचा राजीनामा द्यावयाची परवानगी मिळावी असा गेल्या डिसेंबरांत अर्ज केला व जानेवारींत त्यास ती परवानगी मिळाली! त्यानीं काढल्या गादीचा राजिनामा दिला असून त्यांचे बंधु ध्यानसुरासिंग यांस मे महिन्यांत राज्याभिषेक होणार आहे. या एकंदर प्रकाराच्या मुळाशीं काय आहे हें निराळें सांगणें नकोच.

निमकहराम— रशियाच्या सैन्यांतील एका आफिसरानें लढाई संबंधानें रशियाचे बेत जपानी लोकांस पैसे घेऊन सांगितल्याबद्दल त्यास फांशी देण्यांत आलें. असले निमकहरामास देहांत शिक्षाच योग्य. असले लोक ज्या देशांत आढळतात तो खरोखरी दुर्दैवी होय!

कोरड्या कोळशापासून वीज— हल्लीं कोळसा जाळून वाफेच्या यंत्राच्या योगानें गति उत्पन्न करावी लागते, आणि त्या गतीपासून विद्युद्यंत्र चालवून वीज उत्पन्न करावी लागते. ह्या रूपांतराच्या कामांत कोळशाची शेंकडा पाऊणशें भाग शक्ति फुकट जाते; म्हणून प्रत्यक्ष कोळशापासून वीज उत्पन्न करण्याचें प्रयत्न चालू आहेत व या प्रयत्नास यशही आलें आहे असें म्हणतात. हें जर खरें असलें, तर सर्व उद्योगधंद्यांमध्यें मोठी क्रांति होणार!

अत्यंत स्तुत्य देणगी—बनारस येथील सेंट्रल हिंदू कॉलेजचे ट्रस्टून होण्याचें त्रावणकोरच्या महाराजांनीं कबूल केलें असून सदरहू कॉलेजास ३,५०० रुपयांची ग्रांट प्रतिवर्षीं देण्याविषयीं हुकूम केला आहे. या शिवाय कालेजास गेल्या महिन्यांत मुंबईतील एका बँकेकडून ५,०००, फैजाबादकडील रायबहादूर गोकुळचंद यांचेकडून २,००० व आणखी एका कडून १,००० अशी मदत मिळाली आहे.

सोपस्न भाव— लखनौ येथें तारायंत्राचें काम शिकवून तारमास्तर तयार करण्याचा एक सरकारी वर्ग आहे. या वर्गांत प्रवेश करून घेण्यासाठीं एक परीक्षा होते. या परीक्षेंत जे पास होतील त्यांस त्या वर्गांत घेतलें जातें. परंतु या परीक्षेस युरोपियन व युरेशियन विद्यार्थ्यां खेरीज कोणासही घेतलें जाणार नाहीं असें स्पष्टपणें जाहिरातींतच छापलें होतें. कोण घाडस हें!

असें कां? --- सर्व बंगाल्यांत एकंदर ३२ हजार पुरुष व २० हजार स्त्रिया इतकी मुकी असून, कलकत्याच्या "बहिऱ्यांच्या व मुक्यांच्या शाळेंत" सारे २७ मुलगे व ४ मुली इतकेच आहेत. असें कां!

युरोपियन काळीज भीतीनें कापत आहे.—जपानला इंग्लंडनें मदत देऊन रशियाशीं लढावयास लाविलें हें फार गैर आहे अशा तऱ्हेनें एशियांतील इंग्लंडचें वर्चस्व नाहींसें होईल. या लढाईमध्यें लहानशा जपाननें जर रशियाला चीत केलें, तर एशियामध्यें जीं आज मोठमोठीं झांकलेल्या विस्तवाप्रमाणें दुर्बलतेच्या पडलांत आच्छादलेलीं राष्ट्रें आहेत, तीं आपले अंगावरील पटल बाजुस सारून जपानचें अनुकरण करतील. आणि मग जो भयंकर परिणाम होईल तो इंग्लंडला मुकाट्यानें सोसावा लागेल. रूसो-जपान युद्धापासून इंग्लंडचें फायद्यापेक्षां नुकसानच फार आहे. जपाननें रशियाला जिंकलें तर एशियांतील इंग्रजांच्या ताब्यांतील राष्ट्रें जपानचें उदाहरण गिरवून इंग्रजांवर आपण पराक्रम गाजविण्याची महत्वाकांक्षा धरणार. बरें रशियानें जपानला जिंकलें तर रशिया हिंदुस्थानावर स्वारी करणार व त्याचा प्रतिकार करणें इंग्लंडला अशक्य होणार. कोणत्याही दृष्टीनें जरी पाहिलें तरी रूसो जपानयुद्ध हें इंग्लंडच्या मोठ्या हानीचें कारण होणार आहे खास.

रशियनांची उत्कंठा— "जर फक्त झारसाहेब हूं म्हणतील तर जे आह्मी आज जपानने लढाईंत क्रोडों रुपये खर्च करीत आहोंत तेंच उद्यां, ब्रिटिश लोकांशीं लढाई करण्यास सर्वस्व सुद्धां देऊं" अशा प्रकारचे उद्गार मास्को येथें आज बरेच दिवसांपासून आपोआप निघूं लागले आहेत व त्याचाच प्रतिध्वनि सर्व रशियांत—अगदीं लहान खेड्यापासून तो मेठमोठ्या शहरीं—प्रत्येक रशियन शिपायाचे व प्रत्येक मनुष्याचे तोंडांतून निघत आहे.

अगदीं बारीक तार— सोन्याची तार इतकी बारीक काढितां येते कीं एक मैल लांब तारेचें वजन फक्त पाऊण गुंज भरतें.

चोख उत्तर—लॉगमनच्या कित्यापासून अक्षर चांगलें वळत नाहीं. अशा पुष्कळ तक्रारी सरकारकडे गेल्या होत्या, पण त्याजबद्दल पांच वर्षांचें कंत्राट देण्यांत आलें आहे. म्हणून या गोष्टीचा तूर्त विचार करितां येत नाहीं. असें सरकाराकडून चोख उत्तर देण्यांत आलें आहे!

ख्रिश्चन राक्षसीपणा— अमेरिकेंतील मिसिसिपी नदीवरील प्रदेशांतील एका गोऱ्या मळेवाल्याचा थोड्या दिवसां पूर्वी एका हबशानें व त्याच्या बायकोनें खून केल्यावरून तेथील सुमारें एक हजार गोऱ्या लोकांनीं एकत्र होऊन सदर हबशी व त्याची बायको या उभयतांस जंगलांतून धरून आणून ज्या ठिकाणीं गोऱ्या मळेवाल्याचा खून झाला होता त्याच जागेवर त्यांनां जिवंत जाळून ठार मारिलें. हा हृदय द्रावक प्रकार पाहण्यास तेथें पुष्कळ लोकांची गर्दी झाली होती. कोण रानटीपणा हा!

एकाएकी बेशुद्ध झाले—हंबर्ग जवळील एका गांवीं लोक देवळांत प्रार्थना करण्यासाठीं जमले. प्रार्थना सुरूं झाली न झाली तोंच पुष्कळ जण बेशुद्ध होऊन पडले व बाकीच्यांचीहि तीच स्थिती होणार तों ते तेथून उठून बाहेर आले. व त्या बेशुद्ध पडलेल्या लोकांनाहि उघड्या हवेंत आणिलें. व सावध केलें या चमत्काराचें कारण, त्या देवळात कोल गॅस येत होता. ह्या गॅस पासून अनर्थ झाल्याचीं उदाहरणें पुष्कळांच्या चांगल्या माहितींतलीं आहेत.

कंटक जपानी लोक— कोरिआमधील जपानी शिपाई इतके कंठक आहेत कीं, तेथें पाऊस, बर्फ, वादळ वगैरे अडचणीमधून ते दररोज १०० रत्तलच्या बोज्यासह २५ मैल कूच करितात,

हिंदुस्थानच्या उन्नतीचें भविष्य— आर्यावर्तीची सुधारणा व उन्नती अशा वेळीं होईल कीं, ज्यावेळीं मराठ्यांची युक्ति, पंजाब्यांची शक्ति, गुजराथ्यांची संपत्ती, रजपुतांची स्वामिभक्ती व बंगाल्यांची वक्तृत्व शक्ती एक होऊन संघानें कामें केलीं जातील.

प्रकाशदायी वृक्ष— नेवाड येथें एक अद्भुत वृक्ष आहे. त्यास सूर्यवृक्ष ह्मणतात. देवभोळे लोक यास भेटवीवृक्ष लेखतात. अगदीं अमावास्येच्या काळोख्या रात्रींहि याचा प्रकाश इतका चकचकीत असतो कीं त्याच्या योगानें स्वच्छ छापलेला कागद वाचतां येतो. हें झाड सरासरी ६—७ फूट उंच असतें. याचा उजेड एक मैल लांबीवरून दिसतो.

चमत्कारिक चाल—रशियांतील मास्को जवळील शहरीं ही चाल आहे. गांवांत लग्नाच्या जितक्या मुली असतील त्या सर्वांनीं मोठ्या राजमार्गावर एका रांगेंत सुंदर पोषाककरून उभे राहावें. आणि नंतर ज्यांना लग्नें करावयाची असतील अशा नवरदेवांनीं त्यापैकीं जी मुलगी पसंत पडेल ती घेऊन देवळांत जावें व मग तिच्या मातापितराबरोबर लग्न संबंधीं सर्व ठराव करावा.

चोर पण देशाभिमानी—एका जपानी चोराने सुमारें रु. १५०० किंमतचें एक सोन्याचें घड्याळ चोरलें. घरीं येऊन घड्याळ उघडून पाहतां त्यांत रशियन बादशहाचें चित्र कोरलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां आपल्या राष्ट्राच्या शत्रूचें चित्र ज्या घड्याळांत आहे, तें आपल्या जवळ कामाचें नाहीं असें मानून त्यानें तें घड्याळ त्याच्या मालकाकडे परत पाठविलें व त्यास घड्याळ परत करण्याचीं सर्व कारणें लिहून कळविलीं. यावरून जपानमधील चोरांच्या अंगांत देखील स्वदेशाभिमानें वारें खेळत आहे, असें दिसतें. हिंदुस्थानच्या अंगीं असा स्वदेशाभिमान केव्हां उत्पन्न होईल तें परमेश्वरास माहीत.

कुत्र्या मांजराचा दवाखाना—क्लीव्हलँडच्या एका डाक्टरानें कुत्र्याच्यासाठीं व मांजरासाठीं एक दवाखाना बांधला आहे. खालच्या मजल्यांत कुत्रें व माडीवर मांजरें ठेविलीं आहेत. शस्त्रक्रिया करण्यासाठीं एक निराळी खोली काढली आहे. येथें मेलेल्या कुत्र्या मांजरा साठीं एक स्मशान—भूमी केली आहे व त्यांना पुरण्यासाठीं येथेंच कॉफीन (पुरण्यासाठीं पेट्या) तयार करितात. त्यांना सर्व रोगावर औषधी दिली जातें. हातपाय मोडल्यास बरे करितात व पुढील सुळे दांतसुद्धां नवीन बसवून देतात. शहरांत एखादें कुत्रें किंवा मांजर दुखावलें गेलें कीं, टेलिफोन मधून या दवाखान्यांत तत्काळ बातमी कळवितात व एका क्षणार्धांत कामावरील डाक्टर, दुखणेकरी कुत्र्या मांजरा पाशीं येऊन हजर होतो. इतकी सोयीची व मूतदयेची सुव्यवस्था प्रत्यक्ष माणसासाठींहि क्वचितच असेल. त्या प्राण्यांचें शिकंदर नशीब खरें.

चमत्कारिक चाल

फ्रीज लॅन्डमध्यें एक चमत्कारिक चाल अशी आहे कीं, जननाची व मृत्यूची बातमी एका मनुष्यानें गांवांतील घरोघरीं जऊन सांगावयाची. जन्माची बातमी असल्यास पांढरे हातमोजे व मृत्यूची असल्यास काळे मोजे घालून सांगणारा मनुष्य गेला पाहिजे. परंतु एक मूल जन्मतःच मेलेलें होतें. ही बातमी सांगणारास प्रथम पंचाईत पडली, पण तो युक्तिवान असल्यामुळें त्यानें एक काळा मोजा व दुसरा पांढरा मोजा घातला व आपलें इष्ट कार्य बजावलें.

गुन्हेगार लोकांचें इंद्रभुवन

स्पॅनिश गुन्हेगार लोकांना झाफारिना बेटांत ठेवितात. त्यांची ती जागा ह्मणजे एक चैनबाजीचेंच माहेर घर आहे. तेथील कैदखान्यांत जाणें तरी मोठ्या नशिबाचेंच काम समजलें पाहिजे. त्यांची कैद खटली ह्मणजे त्या बेटाच्या बाहेर कोणी जावयाचें नाहीं. बाकी यांना दिवसभर अनियंत्रितपणें मोकळे खुषाल फिरतां येतें. कांहींकांना तर रात्रींहि भटकण्याची परवानगी देतात. प्रातःकाळ झाला कीं पुष्कळ जण तडक आपले दारूच्या गुत्त्यांत जातात व मनमुराद चैन करितात. त्यांना कांहीं एक कामकाज करावेंच लागत नाहीं.

नीच मांसाचे वृक्ष— ना० टिळकांच्या खटल्यापासून प्रकाश आलेली एक गोष्ट फार उद्वेगजनक आहे. ती अशी कीं येवढ्या तेवढ्या आशेनें खोटें बोलण्यासच काय, पण हवें तें नीच कृत्य करण्यास तयार होणारी अधम मंडळी पुण्यास अद्याप आहे! व जोंपर्यंत व ज्या लोकांत असे नीच मांसाचे वृक्ष आहेत तोंपर्यंत त्या लोकांची उन्नति ह्मणें अशक्य आहे.

प्राण्यांचे चमत्कारिक नेत्र

पुष्कळ प्राण्यांना दोहोंपेक्षां जास्त डोळे असतात. जळू प्राण्याला डोक्यावर दहा नेत्र असतात, व समुद्रांतील एका जातीच्या किड्याला दोन डोळे डोकीवर असतात. तसेंच कित्येक चित्र्यांनाहि मस्तकावर एक निराळा डोळा असतो. ह्या सर्व डोळ्यांचा व्यापार एकदम सुरूं नसतो, मधमाशीला दोन मोठे डोळे असतात आणि यामुळें तिला सर्व जवळचे पदार्थ दिसतात. तसेंच तिला डोकीवरहि दोन डोळे असतात त्यामुळें दूरच्या अंतरावरील वस्तु तिला दिसतात. आपल्या शास्त्राप्रमाणें सूर्याला १२ नेत्र आहेत व शिवाला त्र्यंबक ह्मणतात.

एक सारखी शंभर वर्षें वाजत असलेली घंटा

उत्तर चिनामध्यें एका पवित्रस्थानीं एक घंटा आहे. ती रात्रंदिवस, विश्रांति खळ न पडतां; आज शंभर वर्षें वाजविली जात आहे हें बाजविण्याचें काम करणाऱ्या लोकांना वेतन देण्यासाठीं लोकांवर एक कर बसविला आहे. हा कर सर्व लोक मोठ्या खुशीनें देतात. तेथील लोक फार देवभोळे माणसें आहेत. ह्या घंटेच्या प्रत्येक नादानें एक एक दुष्ट सैतान नाश पावतो अशी त्यांची समजूत आहे. आणि जो सैतान जितके जोर न होतील होतील तितके बरे ह्मणून ही घंटा अविश्रांत वाजविली जात आहे.

आकोल्यातील लोकांस.....१ रु.
बाहेरगावीं टपालहाशिलांसह..... २ रु
वर्गणी आगाऊ दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
६१ ओळीस.....रु१ रु६
दुसरे खेपेस.....रु१

Town ... ... 1 Re.
Mofussil ... ... 2 (With postage)
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ..... 2 as

वऱ्हाडसमाचार.

Advertisement
below 10 lines ..... 2 Re
Per line over 10 .....8 as
Repetitions Per line „ 2

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 11 APRIL 1904 NO 14

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ११ माहे एप्रिल सन १९०४ इ० अंक १४

REGISTERED No.

WANTED

A temporary clerk on Rupees 30 per mensem for a period of six months for Executive Engineer's Office at Akola. Apply to the Undersigned with testimonials.

J. M. VACHA
Executive Engineer
West Berar Division.

नोटीस

नोटीस बेनामी कृष्णा माळी मजूर पाळे खानखेड राहणार शेगांव तालुके मलकापुर बीट नंबर १ यास:—

खाली सही करणार इनकडे नोटीस देण्यांत येतें कीं तूं गेल्या सुमारे नवरा आमीन लग्न नव्हते पंमुळे कीं तुजपासून विरक्त होत नवऱ्यामुळें अन सुमारे एक वर्ष झाले मी आपले घरांचे हली नांदत्यास चेऊन राहिले व तुमची मर्जी संसारा लायक नसल्यामळें मी घरोपचार करून दुरस्त होऊन डाक्टरांचे पाटिफिकेट अणून पगजा घेऊन जावे अंमिरी जातीची चार मंडळी जमून पंचाइत केली तरी तुझी आपमणें केलें नाहीं म्हणून नोटीस देते कीं एक महिन्याचे आत दुरस्त होई डाक्टरांचे सर्टिफिकीट दाखवून मजला घेऊन जावे. मी नांदण्यास तयार आहे. तसे न केल्यास ही नोटीसच फारकत समजून मी दुसरा घरोबा करीन मग तुमचा नवरा पण वा रक्त मजकडे कोणतेच प्रकारचा राहणार नाहीं व शिवाय खावटीचे देणें ५० रुपे जे हले आहेत ते ज्याचे असे त्यांचे न दिल्यास फिर्याद करूं घेतल जातील कळावें ता. ३४।०४

सही
चिमी मदे कृष्णा माळी
राहणार नांदुरा हाल-
ची बागडे.

आनंदोत्सव

सुमारे दोन वर्षे पूर्वी म्हणजे सन १९०२ साली श्री हरिद्वारा जवळ 'गुरुकुल' नांवाच्या एका पाठशाळेची संस्थापना झाली. ह्या पाठशाळेचे जनक पंडित मुंशीराम नांवाचे एक परोपकारी महाशय होते. हे गृहस्थ तिकडे नामांकित वकील होते. प्राचीन शिक्षण पद्धति अती उत्तम आहे अशा पक्का ठरवून यांनी मनाचा झुकाव आपल्या मनोदयाकरणें गोष्ट घडवून आणण्यासाठीं यांनीं असा पण केला कीं, 'गुरुकुलाची स्थापना करण्यासाठीं तीस हजार रुपये ची रकम जमवीन तेव्हांच पुनः घरांत पाय देईन' येणें प्रमाणें पण करून ते पैसा जमविण्यासाठीं बाहेर पडले. त्यांनीं आपला व्यवसाय वकीलीचा त्याग केला. उद्दिष्ट गोष्टीची सिद्धी होईल तोपर्यंत आपण घरांत होतें. चार सहा महिन्यांत त्यांनीं ४६ हजार रुपये जमवीले. तेव्हां यांची आणि महाशय अमनसिंग नांवाच्या एका सद्गृहस्थाची गांठ पडली. महाशय अमनसिंग यांनीं गुरुकुलासाठीं सा लीस हजार दीड हजार रुपये उत्पन्न या आपला कांगडी गांव अर्पण केला. पुढें लवकरच या विद्यालयाची समुद्धीवर स्थापना करण्यांत आली.

कडकडीत नियम

या पाठशाळेंत सहा शास्त्रांचें अध्ययन होऊन शिवाय ज्योतिष, वैद्यक, गणित वगैरे विषयहि शिकविले जातात. येथें बी. ए. चा अभ्यासहि शिकविण्याची सोय होणार आहे. या पाठशाळेंत विद्यार्थ्यांनांचें ब्रह्मचर्य व्रत उत्कृष्ट पाळलें जातें हा विशेष होय. या शाळेंत असा नियम आहे कीं, "गुरुकुलात १० वर्षांच्या आतील मुलांचा घेतलें नाहीं. १८ वर्षांचा अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत त्यास शाळेचे बाहेर जातां येणार नाहीं. त्यास भेटण्याची त्याच्या वडिलवारी माणसांची इच्छा असल्यास तेथें जाऊन भेटावें." अशा कडक नियमामुळें, शिष्यानें गुरुच्या घरीं राहून एक तपभर एकाग्र मनानें अध्ययन केलें पाहिजे असा पुरातनचा शिवाजच अमलांत आला आहे. दोन वर्षे मध्येच येथील विद्यार्थ्यांच्या तोंडावर एक प्रकारची पवित्र व तेजःपुंज कांती दिसे.

गेल्या फेब्रुवारीच्या अखेरच्या दिवसापासून चार दिवस गुरुकुलाचा दुसरा वार्षिक उत्सव करण्यांत आला. या उत्सवा निमित्त फारच प्रचंड जमाव जमला होता. २० हजार पुरुष आणि बायका व मुलें मिळून ९ हजार इतके लोक जमले होते. पहिले दिवशीं तीन तीन व्याख्यानें झालीं, व भजन झालें. दुसरे दिवशीं हे प्रथम भक्तिपूर्ण असें भजन होऊन रिपोर्ट वाचला. यांतील

मुलांचा निरुत्साह

लक्षांत घेण्यासारखा आहे म्हणून ते जशाचा तसाच खालीं दिला आहे.

'गुरुकुल स्थापून एक वर्ष पूर्ण झालें मेल्या वर्षी उत्तर मुलें होतीं व आता नव्वद त्यांपेक्षा भारत आहेत. यांचा प्रमाणें कार्यक्रम—सकाळीं साडेचार वाजतां उठून शौचमुखमार्जनादि करून थंड पाण्यानें स्नान करून संध्या व अग्निकार्य हीं सात वाजे पर्यंत आटोपणें. नंतर व्यायाम करून दूध पिऊन अभ्यासाला सुरुवात सकाळीं आठ वाजतां होणें. साडे दहापर्यंत अभ्यास होऊन नंतर विश्रांती व भोजन १२॥ वाजेपर्यंत, नंतर चार वाजेपर्यंत अभ्यास, नंतर दूध पिऊन व्यायाम करणें, फुटबॉल, आट्यापाट्या, कबड्डी, कुस्ती वगैरे पद्धतीचा व्यायाम करून सायंसंध्या करून अग्निकार्य करणें. नंतर भोजन व थोडासा अभ्यास होऊन साडे नवाला निजणें. या प्रमाणें विद्यार्थ्यांची दिनचर्या आहे. विद्यार्थ्यांवर अध्यक्षांची व अधिष्ठात्याची सारखी नजर असते व त्यांना वाईट काम करण्यास वेळ नसतो. अशी ही संस्था असून हिचा कार्यक्रम फार हितावह आहे.

पैशाचा पाऊस

पुढें या संस्थेला सहाय्य देण्यासाठीं विनंती करण्यांत आली. विनंती प्रमाणें सर्वांनीं यथाशक्ति आपल्या शक्तीप्रमाणें मोठ्या प्रेमानें हात मारा लाविला. दीड दोन तासांतच ३६ हजार रुपये रोख तेथल्या तेथेंच जमले. तसेंच १० हजारांचे आकडे पडले व जवाहिर व जमिनी मिळून ४६ हजारांचा ऐवज देण्यांत आला. तेथें जमलेल्या बऱ्या बऱ्या लोकांनीं एकदम हजार, दोन हजार, अडीच हजार पांच हजार असा रकमा दिल्या.

पुरुष प्रमाणें स्त्रियांनाहि पैसे देण्याची स्फूर्ति झाली, त्यांनीं आपल्या अंगावरील दागिने दान केले, याची रकम ७-८ हजार झाली असावी.

सदुपदेश

तिसरे दिवशीं विद्यार्थ्यांस उपदेश करण्यांत आला तो विद्यार्थीजनांनीं चांगला ध्यानांत धरावा. ते अध्यापक म्हणाले कीं:—

'हे विद्यार्थीहो! आचार्य हा पिता व विद्या ही माता असें मानून, सर्व दुष्ट आचरणें सोडून सदाचरणी व्हा. तुमचें शरीर शीतोष्ण सहन करण्यास मजबूत झालें पाहिजे, तुमचें मन सूक्ष्मविषय ग्रहण करण्यास योग्य झालें पाहिजे व तुमचें आचरण अनुकरणीय झालें पाहिजे. यासाठीं तुम्ही गुरुच्या आज्ञेंत वागा. पंचवीस वर्षांचें एकनिष्ठ ब्रह्मचर्य प्रत्येकानें पाळलें पाहिजे. इ०

एका बाळाचा मार्मिक प्रश्न

वरील उपदेश झाल्यावर एका ९ वर्षांच्या मुलानें प्रश्न केला कीं तुम्ही आमच्या वडून मंडळीनें आजन्म ब्रह्मचर्य कां पाळावें लागणार नाहीं?

हा प्रश्न ऐकून लोकांस फारच सुंदर आश्चर्य वाटलें! या प्रश्नास अध्यापकांनीं उत्तर केलें कीं, विद्यार्थ्यांस योग्यते प्रमाणेंच ब्रह्मचर्य व्रत पाळण्यास लावलें पाहिजे.

नंतर सर्व ब्रह्मचारी मंडळींनीं भिक्षा देहि म्हणून सर्वांपुढें भिक्षा मागितली. त्यावेळीं त्यास दोन हजारांची भिक्षा मिळाली. यावेळीं

एका स्त्रीचें विलक्षण औदार्य

दृष्टीस पडलें. हिनें भिक्षा देते वेळीं सांगितलें कीं:—

'मी दक्षिणेची राहणारी व्या. चंदाव रकर मुंबई हायकोर्टाचे जज्ज यांच्या बंधूची मुलगी. पण मी निर्धन आहे गुरुकुलाचें नांव ऐकून येथें आलें. ही संस्था चांगली व देशांहित करणारी आहे, असें महत्वपूर्ण अनुभवास आल्यामुळें माझा जवळ असलेल्या माझ्या दागिन्यांची विकून आलेली किंमत साडेपांचशें रुपये मी गुरुकुलास अर्पण करीत आहे.

दारिद्र्या शिवाय आजन्म राहण्याचा हा तिचा निश्चय अश्चर्य करण्यासारखा आहे.'

संपूर्णता

संध्याकाळीं दोन व्याख्यानें झालीं. एका व्याख्यानांत ही विशेष गोष्ट सांगितली कीं:—

'धर्म हा तर्काच्या कसोटीस उतरला पाहिजे. केवळ पाहिजे त्यावर विश्वास ठेवण्यानें आर्यावर्ताचा नाश झाला. प्रत्येकापुढें वांकण्याची संवय हिंदूस लागल्यामुळेंच सध्यां सर्वत्र त्यास थप्पड मिळत आहे. त्यांनीं आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे व विचार केला पाहिजे. कोणत्या परिस्थितीचा विचार करणार नाहींत, तोपर्यंत आपली उन्नति दशा होणारच नाहीं.'

दुसऱ्या व्याख्यानांत उपदेश केला कीं:—

'आमच्यांत आळस फार आहे, त्यामुळें दुःख होतें, दुःख निवारण केलें पाहिजे, तोच पुरुषार्थ. भीष्मासारखे ब्रह्मचारी, रामासारखे सत्यप्रतिज्ञ, हरिश्चंद्रा सारखे सत्यनिष्ठ, धर्मासारखे धर्मात्मे, अर्जुनासारखे वीर निपजले पाहिजेत. या पुरुषांच्या चरित्रांकडे दृष्टी देऊन आमची पुढील पिढी त्यांच्यासारखी होईल असें आपण केलें पाहिजे.'

येणें प्रमाणें त्या महोत्सवाची संपूर्णता करण्यांत आली.

मोत्याचा वापर

खरी मोती वजनांत जड असून एकाएकी फुटत नाहींत. मोती वापरांत काळे पडेल किंवा नाहीं हें पहाणें झाल्यास शुभ्र चादरीवर टाकलें असतां त्याचा रंग बदलतो किंवा काळसर हिरवा दिसतो तें मोती काळें पडणार असें समजावें.

आकाशांतील बादळाचे योगानें मोत्याचे रंग फार फिरतात. उत्तम मोती वाईट दिसतें व वाईट चांगलें दिसतें म्हणून एक दोन वेळा बदलून मोती घ्यावें. शुभ्र मलमलीच्या कपड्यांत मोती ठेवावें हें उत्तम.

तिजोरींत अगर कुलुप सारखे फार दिवस मोती ठेवल्या त्यांची माती होते म्हणजे अगदीं खराब होतात. यांजकरितां खुले उघडे हवेंत नेहमीं मोती असेल तेवढें बरें, मळलेलें मोती साफ करणें झाल्यास तांदूळाच्या, मिठाच्या, साखरेच्या किंवा रिठ्याच्या, यांपैकीं कोणत्याही पाण्यांत

भिजत घालून धुऊन साफ करावें. लिंबू वगैरे आंबट जिन्नसांत मोती भिजत ठवूं नये; फार वेळ ठेवल्यास त्याचा चुना होतो. तसेंच सोड्याचे पाण्यानें व साबूनेंही मोती साफ करितात, परंतु एखादे जातीचे मोती काळे पडत. तसेंच विलायती पुडीनेंहि किंवा समुद्रफेसानें मोती साफ करितात. फारच जुनें मोती मळानें भरलें असल्यास एकदम पाण्यांत भिजत टाकूं नये. खराब होतें. तर तें तसेंच तांदुळाचे कोंड्यानें, अगर समुद्रफेसानें कोरडेच साफ करावें व नंतर धुवावें. मोती नेहमीं अंगावर असावित, परंतु निरंतर श्वासाजवळ ठेवूं नये. अग्नीसानिध्य नेहमीं मोती घालून बसूं नये. तसेंच निजतेवेळेस मोती आंगावरील काढून निजावें. नाहीं तर झिजतात. भिकबाळीचे मोती फारच झिजतात.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ११ शके १८२६

शेतकऱ्यांचा ऱ्हास

आमच्या प्रांतास शेतकऱ्यांचा वर्ग [illegible] होय. शेतकऱ्यांचा वर्ग खेरीज करून बाकीचा जनसमूह सरासरीनें दहाव्या हिस्यापेक्षां मोठासा नाहीं. या मानानें पाहतां सर्व शेतकऱ्यांची जी बरीवाईट स्थिती तीच आमच्या जनसमूहाची खरी स्थिती होय. या प्रांतांतील शेतकऱ्यांची स्थिती समाधानकारक नाहीं इतकेंच नव्हे तर उत्तरोत्तर हा मोठा लोकसमूह अगदीं ऱ्हासास पोंचला आहे. जवळ जवळ आमच्या कडील शेतकरी ह्मणजे शेतांत काबाड कष्ट करणारे मोलमजूर आहेत असें ह्मटलें तरी चालेल. शेताचा धनी वेगळाच असतो, आणि त्या धन्याच्या संपत्तीला नवीन संपत्ती जोडणारी अशी ही मजूरदार शेतकरी मंडळी होत. ह्या बाबतींत गेल्या मुलकी रिपोर्टांत रा. रा. हेअर साहेब कमिशनर यांनीं ज्या कांहीं गोष्टी नमूद केल्या आहेत त्या विशेष चिंतनीय आहेत, किंबहुना, त्या विशेष काळजी उत्पन्न करणाऱ्या आहेत असें आह्मांस वाटतें. हा प्रांत फार सुपीक व धनधान्यांनीं संपन्न आहे असा जो बहुत वर्षांचा लौकिक चालत आलेला आहे तो इकडील शेतकरी लोकांच्या संबंधानें फार भ्रामक होय. अलीकडील अंमलाखाली एक श्रीमान लोकांचा वर्ग वेगळाच बनत चालला आहे आणि तो वर्ग ह्मणजे इकडील साहूसावकार व शेताच्या माला वर व्यापार करणारे लोक यांचा होय. हा वर्ग एकंदर लोक संख्येच्या मानानें फारच अल्प आहे. आणि त्याचा श्रीमंती ह्मणजे त्या मानानें इतर लोकांची ऱ्हासाची स्थिती होय. या प्रांतामध्यें जी सावकार मंडळी आहे ती शेतकऱ्यांचें रक्त शोषून वेणारी जळू होय. अलिकडील २५–३० वर्षांमध्यें सावकारी व्याजाच्या पायीं शेतकऱ्यांची शेती सावकाऱ्यांच्या घरांत गेली आणि हीच गोष्ट त्यांच्या दुःखद स्थितीचें मुख्य कारण होय. सावकरी व्याजाचा घोडा शर्यतींतल्या घोड्याप्रमाणें एक सारखा धांवत सुटला आहे आणि त्याला धरून थांबविण्याची शक्ती आमच्या पादचारी शेतकरी लोकांत नाहीं. गांवोगांव जाऊन नर प्रत्यक्ष चौकशी केली तर असें आढळेल कीं, गेल्या पंचवीस वर्षांमधील क्रांतीनें शेतकऱ्यांस अगदीं नादार करून सोडिलें आहे. प्रांतांतील लोक समूह सरासरीनें विशेष अज्ञ, अक्षरशत्रू पण भोळा असा होता आणि त्यांच्याबरोबर व्यवहार करणारे सावकार चक्रवाढीच्या आंकड्यांची घडामोड करण्यांत पटाईत आणि तशांत त्यांस सुधारलेल्या दिवाणी कोर्टाची मिळणारी मदत हीं दोन्ही एकत्र झाल्यामुळें सावकार व कूळ यांमधील लढाईचा परिणाम एकाला परिपुष्टी देणारा व दुसऱ्याला क्षय लावणारा असाच होत गेला. सावकार व कूळ यांच्या या लढाईमुळें वऱ्हाडच्या समाजामध्यें एक मोठीच क्रांती घडून आली आहे. वऱ्हाडामध्यें एकंदर शेतांची संख्या ३९४६४४ आहे असें सांगतात. या शेतांचें एकूण क्षेत्रफळ ११२९९ चौरस मैल आहे. या क्षेत्रफळापैकीं २५७६ चौरस मैल जमीन ज्यांच्या घरीं शेतीचा धंदा [illegible] जमिनीच्या मालकीचा हा फेरबदल खरेदी, गहाण इत्यादि व्यवहारामुळें झालेला आहे. आणि या शिवाय पुष्कळशी जमीन सावकारांच्या कर्जाच्या फेडीमध्यें शेतकऱ्यांच्या घरून सावकाराकडे गेली आहे. पण या शेवटच्या अदलाबदलीचे आकडे उपलब्ध नाहींत. असा रिपोर्टांत उल्लेख आहे पण आह्मी असें सुचवितों कीं, सरकारनें या बाबतींत पक्का शोध करावा आणि गांवोगांवचे आंकडे एकत्र करून लोकसमूहाच्या खऱ्या स्थितीचें चित्र लोकांपुढें व स्वतां पुढें नेहमीं ठेवावें. या संबंधांत रा. हेअर साहेब लिहितात कीं, रयतेच्या उघळपट्टीमुळें जमीन सावकारांच्या घरीं चालली आहे आणि मूळचे शेतवाले लोक मजुरदारांचा वर्ग अधिकाधिक वाढवीत चालले आहेत; ही गोष्ट कितीहि खरी असली तरी या वस्तुस्थितीचा पालट करणें हें आतां मोठें दुरापास्त होय. या सरकारी अभिप्रायांतील ही निराशा मोठी काळजी उत्पन्न करणारी आहे. ही निराशा एक वेळ प्रस्थापित झाली आणि सावकारापासून रयतेची सुटका करणें या पुढें शक्य नाहीं अशी गोष्ट जर सरकारनें ठाम करून ठेविली तर लोकांचे हातपाय गळालेच असें समजलें पाहिजे. हा निराशेचा अभिप्राय कर्नल मेकंझी साहेबापासून पुनरुक्त होत असतो आणि असाच क्रम चालूं राहील तर आमच्या कडील शेतकरी वर्ग अगदीं ठार बुडाला असें सरकारनें पक्कें ध्यानांत धरावें.

सदुपाय

शेतकऱ्यांच्या ऱ्हासाचीं जीं कारणें वर निर्दिष्ट केलीं आहेत तीं दूर झाल्या शिवाय त्यांस दुसरा तरणोपाय शक्यच नाहीं. प्रथमतः सावकारी व्याजाला कांहीं तरी धरबंध कायद्यानें घातला पाहिजे. या प्रांतांत भांडवलावर जें व्याज मिळतें तितका नफा दुसऱ्या कोणत्याच व्यापारांत मिळण्यासारखा नाहीं. व्याज ह्मणजे सावकाराची कामधेनू व कुळाचो साक्षात् आकाबाईच होय. इतर धंद्यांत घातलेल्या भांडवलावर जो नफा मिळतो त्याच्या पेक्षां व्याजाची आकारणी अधिक होतां कामा नये. जेथें सावकाराच्या पैशाला जमीन तारण आहे तेथें निदान व्याजाचे पाय आखूडच बांधले पाहिजेत आणि व्याज कमी जास्ती देववियासंबंधानें दिवाणी कोर्टांनींहि वरचेवर रयतेच्या दृष्टीनें विचार करावा असें आह्मी सुचवितों. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठीं कांहीं कमी व्याजानें पैसा पुरविणाऱ्या पेढ्याहि निघाल्या पाहिजेत. हल्लीं सावकाराविषयीं कुळाचा मनोभाव प्रेमाचा नसतो हें खरें, तथापि कुळाची गरज भागण्याची अन्यत्र सोय नसल्यामुळें सावकाराचाच उंबरठा पुनः पुनः कुळास पहावा लागतो. सहकारी मंडळींच्या पेढीची युक्ती जी नुकतीच कायद्यानें प्रतिपादित केलेली आहे तिचें आलंबन जर अधिकाधिक होत जाईल तरी देखील कुळाचा कार्यभाग पुष्कळसा साध्य होईल असें आह्मांस वाटतें पण या संबंधाच्या गोष्टी पुष्कळशा जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या हातांत असतात. याचा दाखला आमच्या जिल्ह्यांत विशेष ध्यानांत धरण्यासारखा आहे. [illegible] कुमार श्री हरचामजी हे येथें जेव्हां डेपुटी कमिशनर होते तेव्हां त्यांनीं आपल्या प्रोत्साहनानें एक औद्योगिक मंडळी स्थापित केली होती आणि गांवोगांव हंगामाच्या वेळीं एक धान्याची पेढी स्थापन करण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला होता. आणि ते ह्या जिल्ह्यांत अधिक कांहीं काल राहते तर त्यांचे वरील दोन्ही प्रयत्न बऱ्याच अंशीं सिद्धीला गेले असते. त्यांच्या पश्चात् औद्योगिक संस्था व धान्याच्या पेढीची संस्था ह्या दोन्हीहि अगदीं निजल्या सारख्या झाल्या आहेत. हें सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, अशी लोकोपयोगीं कार्यें राजाश्रयावर व पुरस्कर्त्यांच्या हिंमतीवर सर्व थैव अवलंबून असतात. राजाश्रयाशिवाय एकट्या लोकांच्याच हातून ही गोष्ट घडणारी नाहीं. शेतकऱ्या संबंधानें आणखी एक महत्वाची गोष्ट सरकारी जोरानें अमलांत आणण्या सारखी आहे. ती ही कीं, शेतीचा मालक, मग तो कोणीहि असो, त्यानें ती शेती घरींच वाहिली पाहिजे. अलीकडे नफ्यानें शेती लावून काढण्याचा प्रकार जो फार-रूढ झाला आहे तो फार घातुक आहे. शेतकरी दुसऱ्याची शेती जेव्हां नफ्यानें वाहण्यास घेतो तेव्हां तो एक प्रकारें सहाचाच व्यवहार करीत असतो. शेतीच्या मालकाला मिळणारी रक्कम अगोदरच निश्चित असते पण शेत वाहणाऱ्याचें संधान सर्वथा अनिश्चित गोष्टींवरच अवलंबून राहातें. पाऊसपाणी व पीक यांचा अनिश्चितपणा हा एवढा मोठा असतो कीं त्यांच्या संबंधानें कोणताच तर्क बरोबर बसवितां येत नाहीं. निव्वळ नफ्यानें शेती वाहणें ह्मणजे एक जुगारच होय. आणि तो जितका लौकर नाहींसा होईल तितकीं विश्वासाचीं बंधनें शेतीचा धनी व वाहितदार यांजमध्यें उत्पन्न होतील. भावी पिकामध्यें शेताचा धनी व वहितदार यांचा संबंध एकसारखा राहत गेला तर ती गोष्ट उभयपक्षीं हितकारक होईल. या शिवाय आणखी एक सुधारणा शेतकरी लोकांच्या शिक्षणासंबंधानें झाली पाहिजे. कृषिकर्मशास्त्रांत आमचा शेतकरी पिढीजादाच प्रवीण आहे खरा पण त्याला आपल्या जमिनीचा मगदूर वाढविण्याचा व नानाविध पिकें उत्पन्न करण्याचा मार्ग जितका शास्त्रोक्त रीतीनें कळेल तितका त्याचा विशेष फायदा होण्याचा संभव आहे. आणि हल्लीं शेतीच्या धंद्याविषयीं जी अनास्था व निष्काळजीपणा दृष्टीस पडतो व भाडोत्री शेतीचा धंदा जो प्रचारांत आला आहे त्या सर्वांचा चांगला बीमोड होईल. हल्लीं शेतीचा धारा अतोनात वाढला असूनहि जमिनीला किंमती मोठमोठाल्या येतात आणि ही गोष्ट वरवर पाहणारास लोकांच्या सुसंपन्नतेचें मोठें लक्षण आहेसें वाटेल पण वस्तुतः लोकांचा शेतीकडे जो इतका मारा दिसतो तो त्यांस दुसरा धंदा नाहीं व भांडवलास अन्यत्र गती नाहीं ह्मणून आहे. आणि याच मुळें शेतीच्या धंद्यांत त्याज्य व गर्हणीय स्पर्धा सुरू झाली आहे. ही स्पर्धा दूर करण्याला औद्योगिक कार्यक्षेत्र पुष्कळ विस्तृत झालें पाहिजे आणि लोकांना जसजसा नवा उद्योग व कार्यक्रम लागेल तसतसा शेती संबंधाचा लोकांचा अधिक ओढा नाहींसा होईल. पण हा शेवटील प्रश्न शेती संबंधाचाच नमून सर्व हिंदुस्थान देशांतील औद्योगिक बळाबळाचा आहे. इंडियाचा ऱ्हास औद्योगिक ऱ्हासामुळें झालेला आहे आणि औद्योगिक संपदा आमच्या देशांत पुन्हां नांदूं लागे पर्यंत आमच्या मागचा दुष्काळ, पेतनाचा अभाव आणि दारिद्र्याची जाड शृंखला हीं कधींहि सुटणार नाहींत.

थोर मुत्सद्दी

लॉर्ड कर्झन साहेब हे सध्यां विलायतेला जात आहेत. आणि त्यांनीं कलकत्त्यास भरलेल्या कौंसिलांत अखेरच्या दिवशीं आपल्या पांच वर्षांच्या कारकिर्दीचें सिंहावलोकन केलें आहे. लॉर्ड कर्झन हे एक अद्वितिय मुत्सद्दी आहेत. त्यांच्या तोडीचा वक्ता, कार्यकर्ता व राजकारणी व्हाईसराय विरळाच आढळेल. त्यांची इतक्या वर्षांची कारकीर्द ह्मणजे इंडियाचा एक मोठा इतिहासच होय. यांची महत्वाकांक्षा फार वर्णनीय आहे. यांनीं इंडियांत आल्यापासून सर्व कारभारांत मोठीच चळवळ करून सोडली. आणि त्यांनीं सिद्धीस नेलेल्या क्रांतीचीं बरीवाईट फळें आह्मांस भविष्य कालांत प्राप्त होतीलच; परंतु लॉर्ड कर्झन साहेबांनीं व्हाईसरायीचीं वस्त्रें परिधान केल्यापासून एक मोठा कार्यवृक्ष उभारला आहे हें निर्विवाद होय. त्यांनीं सुधारणेचीं बीजें आपल्या समजुतीप्रमाणें चांगलीं पेरिलीं आहेत आणि त्याला पुढें जीं मधुर वा कटु फळें येतील त्या बद्दल आह्मी लाडे

साहेबांस गुणदोष लावीत बसण्या पेक्षां आह्मीच आपल्या भाग्याची तारीफ करूं अगर नशिबाकडे बोट दाखवूं. इंडियाची जर कांहीं लाभहानी व्हावयाची असेल तर ती अशाच कर्त्या पुरुषाच्या हातून होणारी आहे. लॉर्ड कर्झन साहेबांची आह्मी फार तारीफ करितों कीं, त्यांनीं ज्या ईर्षेनें इंडियाचे दहा बारा महत्वाचे प्रश्न आपले पुढें मांडून ठेविले त्या संबंधानें त्यांनीं पुष्कळ तऱ्हेनें लोकमताची वारंवार पृच्छा केली. आणि चारी बाजूंनीं आपल्या पुढील प्रश्नांची भवति न भवति संपूर्णतेनें केली ही गोष्ट त्यांच्या कारकिर्दीचें पहिलें सुलक्षण होय. लोकपक्षाची सरशी पार्लमेंटांतहि पुष्कळदां होत नाहीं, तेव्हां इंडियाच्या कौंसिलांत लोकमताची पायमल्ली झाली याबद्दल विशेष आश्चर्य वाटावयास नको. पण ती पादाक्रांती करितांना देखील लोकमताचें समालोचन लॉर्ड कर्झन साहेबांनीं केलें आणि लोकमताविषयीं वारंवार आदरभाव प्रदर्शित केला ही गोष्ट देखील भावी व्हाईसराय साहेबांनीं अवश्यमेव ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

जागृती.

एकंदरीनें लॉर्ड कर्झन यांनीं सर्व राज्यकारभारांत एका प्रकारची विलक्षण जागृती उत्पन्न केली आहे. सांप्रदायिक वहिवाटीला चरांचशी निराळीच गती देण्यांत येऊन सर्वत्र नवी नवी कार्यशक्ती प्रचलित झालेली आहे असा वारंवार बोध होतो. ही जागरूकता अशीच कायम राहील तर लॉर्ड कर्झन साहेबांच्या ह्मणण्या प्रमाणें आह्मांस पुढील आशयाचा अनुभव खात्रीनें लौकरच येईल. ते आपल्या भाषणाच्या उपसंहारांत ह्मणालें कीं, माझ्या कारकिर्दींत इंडिया सरकारापुढें पुष्कळच वादग्रस्त प्रश्न होते आणि त्यामुळें विरुद्ध पक्षाच्या वाक्ताडनाचा भडिमारहि पुष्कळदा सोसावा लागला. तरी हें वादयुद्ध संपल्यावर आपण हा काल पावेतों जे परिश्रम केले व जें नेटानें काम केलें त्याचा सुपरिणाम असा होईल कीं, इंडिया पुढें असलेल्या विकट प्रश्नांशीं सामना देण्याचें ह्या देशास सामर्थ्य येईल, सरहद्दीवरील या देशाचें लष्करी ठाणें अधिक भक्कम व मजबूत राहील, तसेंच यथाविधि शेती, व्यापार, उद्योग, शिक्षण, कालवे, रेलवे, लष्कर, पोलीस हीं विशेष सुस्थितींत आलीं दृष्टीस पडतील, राज्यकारभाराच्या यंत्रालयांतील प्रत्येक भाग चांगला साफसूफ केलेला दृष्टीस पडेल, इंडियाची पत वाढेल, हुंडणावळीला व नाण्याला अधिक स्थिरस्थावरता येईल आणि या देशाच्या लोकांची संपत्ती वृद्धिंगत होईल आणि लोकांची राजनिष्ठा अधिकाधिक दुणावेल. या सर्व गोष्टींचें श्रेय सर्वथा आमच्याकडेच नाहीं, कां कीं, आमच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या परिश्रमांचा आपणांस पुष्कळ फायदा मिळाला आहे; तथापि या गोष्टी मध्यें आमच्याहि वाटणीला कांहीं यशःसंपदा येईलच आणि ही यशःसंपदा पाहून आपणास साहाजिक वाटेल कीं, आपण जे परिश्रम केले व जो त्रास सोसला तो सर्व कांहीं उगाच व्यर्थ झाला नाहीं. हो व्हाईसरायांची उत्कट इच्छा अंशतः जरी फलद्रूप झाली तरी आह्मी त्यांचे नेहमीं धन्यवाद गाऊं.

सरकारी धोरण

आह्मी वर लार्ड कर्झन साहेबांची इच्छा अंशतः तरी सिद्धीस जावो ह्मणून ध्वनित केलें आहे याचें कारण त्यांच्या कारकिर्दींत जें मुख्य सरकारी धोरण वारंवार आमच्या मार्गांत आडवें येत आहे तें होय. हें सरकारी धोरण असें आहे कीं, सर्व राजकारभाराच्या बाबतींत सरकारानें आपला हात अधिकाधिक शिरकविला आहे. सर्व सूत्रें सरकारच्या हातांत इतकीं उत्कृष्ट तऱ्हेनें आणून ठेविलीं आहेत कीं, लोकमताला हालचाल करण्याला फारशी जागाच ठेविलेली नाहीं. इंडियांत राजपक्ष व लोकपक्ष असे दोन पक्ष स्वतंत्र नाहींत आणि वेळोवेळ प्रसिद्ध झालेल्या निरनिराळ्या ठरावांनीं सरकारी धोरण इतकें ठाम व निश्चित करून टाकलें आहे कीं लोकपक्षाला आणखी कांहीं वर्षें निदान आपलें मत प्रकाशित करण्याची जरुरीच राहिलेली नाहीं. उदाहरणार्थ, जमिनीचा धारा—या संबंधानें जो लांबलचक ठराव मागें प्रसिद्ध केला आहे त्यांत कायमचा धारा करण्याची जरूर नाहीं, हल्लींचा धारा उत्पन्नाच्या मानानें फार कमी आहे, मोंगलाईंतल्या धाऱ्यापेक्षां इंग्रजांतला धारा फार हलका आहे इत्यादि गोष्टी ठराव रूपानें प्रसिद्ध झाल्यामुळें राष्ट्रीय सभेनें आतां या बाबतींत बोलूं नये असें अप्रत्यक्ष रीतीनें कळविलें आहे युनिव्हर्सिटीचा कायदा जो नुकताच पसार झाला त्यामध्यें देखील डाक्टर भांडारकरांच्या भाषणावर पुष्कळसा जोर देऊन व्हाइसराय साहेबांनीं आह्मी जें करितों तेंच ठीक आहे असें निसून सांगितलें आहे. शिक्षणासंबंधीं ठरावानेंहि एक मोठी नियामक सत्ता सरकारानें आपले हातीं घेतली आहे आणि त्या सत्तेमुळें खानगी संस्थांना पुष्कळसा धक्का पोंचण्याचा संभव आहे. लष्करी अवाढव्य खर्चाच्या बाबींचेंहि समर्थन अशाच डौलानें व जोरानें पुनः पुनः केलें आहे. सरकारी चाकरीमध्यें युरोपियन लोक फार थोडे आहेत आणि नेटिवांचाच भरणा पुष्कळ आहे असें प्रतिपादन करितांना पुष्कळशा आकड्यांचें जें पृथःकरण केलें आहे तें देखील सरकारी बादशाहीपणाचें द्योतकच होय. सर्वांत घातुक वाद ह्मणजे इंडियाच्या सांपत्तिक भरभराटीचा होय. सरकारी खजिना तुडुंब भरला आहे ह्मणून लोक सुखांत व आबादानींत आहेत हा तर्क या देशाला जितका घातुक आहे त्या पेक्षां सरकारासच अधिक अकल्याणकारक आहे. लोक स्थितीविषयीं एवढा मोठा मतभेद ह्मणजे दक्षिणध्रुव व उत्तरध्रुव या परस्पर विरुद्ध दिशेच्या ध्रुवाप्रमाणें अगदीं विरुद्ध आहे लार्ड कर्झन साहेबांस जसा एक बेडापीर सोबती मिळाला होता व त्यामुळें उशी डोक्यावर छत्री धरून पाऊस पडत नसतांनाहि पाऊस पडत आहे असें ह्मणतां सुटावें तद्वत् आह्मांस लॉर्ड कर्झनप्रभृति अधिकारी मंडळी अशी हट्टी मिळाली आहे कीं, त्यांच्या डोळ्यांपुढें सर्वत्र पसरलेली इंडियाची आपदा हीच इंडियाची संपदा नाचत आहे असें त्यांस वाटतें हें इंडियाचे दुर्दैव होय.

रणसंग्राम

लढाईची वितंबातमी कोणास लागूं नये असा लढणाऱ्यांचा फार मानस असतो. व खरी बातमी न कळविण्यासाठीं योग्य तो बंदोबस्त त करीत असतात. आणि ह्मणूनच एकाच्या अगदीं उलट दुसरी अशी बातमी प्रसिद्ध करण्यांत येत असते. अशाच घोटाळ्यांतून आपण कांहीं तरी खऱ्या खोट्याची निवडानिवड करून आपले मनाच्या आवडी प्रमाणें लढाईचें चित्र डोळ्यापुढें रेखाटलें पाहिजे.

सध्यां पोर्टआरथरचा वेढा मुख्य दिसतो. तेथें दररोजची लहान मोठी कांहीं तरी चकमक झडत असते. या पेक्षां जास्त महत्वाची बातमी तेथें कांहीं एक नाहीं.

यालू नदीचे कांठीं जपानी सैन्यभार लोटत आहे व तेथेंच आपलें तळ देऊन अवकाश सांपडला कीं रशियाशीं एक जंगी लढाई देण्याचें विचारांत आहे. ह्या लढाईवर पुढील कार्यक्रम पुष्कळसाच अवलंबून राहणार आहे. जमिनीवरील लढाईचें मोठें तोंड ह्मटलें ह्मणचे हेंच दिसत आहे. ही लढाई फार निकराची होईल. दोन्हींहि राष्ट्रें आपली तयारी गुप्त रीतीनें जय्यत करण्यांत गुंतलीं आहेत. आणि ह्मणूनच सांप्रतच्या न्यूचांग व व्हालीहोडस्टाक या दोन रणस्थानां संबंधानें विशेषसा विचार करण्याची जरूरी नाहीं.

आकोला बाजारभाव

हुंडी दर्शनी			९९॥।≈॥
सोनें	२४।≈	चांदी	७१।
जवारी	९०—९२	जवस	७९
गहू काठे	८१	बनशी	९९
सरकी			९॥
मीठ		३॥।	रु. मण
चणे		२॥। ते ३	रु. मण
तूप		८॥	रु. मण
तेल		४॥	रु. मण
रुई जीन			८३
कापूस			९७

जाहीरनोटीस

नोटीस बेशमी काशीबाई मर्द मनोहरलाल जात कनोजी ब्राह्मण राहणार मौजे कसबे आडगांव तालुके आकोट यांस व इतर सर्व लोकांस महादेव दादा हारदास याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं:—

आह्मी तुमचेपासून दोन मळे खरेदीखत करून विकत घेतले परंतु आह्मांला असें आढळून आलें कीं ते दोन्ही मळे दुसरे लोकांजवळ तांबे गहाण आहेत. व ज्या जवळ हे दोन्ही मळे गहाण आहेत त्यांचें व आमचे भांडण चाललें आहे करितां त्या भांडणाचा निकाल होईपर्यंत तुह्मी तुमची शेतें व घर कोणास विकूं नये किंवा गहाण ठेवूं नये. कोणीहि तीं शेतें व घर विकत घेऊं नये घेतल्यास त्याचे बद्दल विकत घेणाराकडून पैसे भरून घेतले जातील. कळावें तारीख ९ एप्रिल १९०४

सही

महादेव दादा हरदास

अडगांव दस्तुर खुद.

जाहीरखबर.

सर्वत्र लोकांस या जाहिरखबरीनें प्रसिद्ध करण्यांत येतें कीं, आमचा मुलगा [illegible] बनशी वल्लद रामसा हलवाई हा [illegible] २०।२१ वर्षें वयाचा आहे. तो फार [illegible] निघाला असून वाईट लोकांच्या संगतीत असतो असें आमच्या नजरेस आलें व त्यानें घरांतील जिन्नसपानसा [illegible] अकस्मात [illegible] व कांहीं उचापतीचाही व्यवहार केला आहे. मागील व्यवहारांचा कला तो उलगडा केला आणि आह्मी त्याला घरांतून काढून दिला व तत्संबंधी माहिती आमच्या इष्टमित्रांस व साहूकारांस पूर्वीच कळविली. त्याला अलग केला तेव्हां इस्टेटीचा वांटाही आह्मी त्याला देऊन टाकला आहे. असा गोष्टींनीं देखील तो शुद्धीवर आला आहे असें वाटत नाहीं. हा मुलगा अमून बेफाम्पणानें वागतो व तो आह्माला न विचारतां घरांतील ईभर रुपयांचा मालही लबाडीनें घेऊन कोठे तरी पळून गेला आहे. तो त्याच्या लबाड सोबत्यांच्या छंदानें वागतो. अशा उजाड मुलाशीं व्यवहार जो कोणी करील, व त्याला पैसाअडका चैनबाजीसाठी देईल तर तो फसणारच आहे; पण लोकांची फसवणुक होऊं नये ह्मणून आह्मी सूचनार्थ ही खबर प्रसिद्ध करीत आहों. त्याच्या संबंधाचा कोणताही व्यवहार आह्माला किंवा आमच्या इस्टेटीला बांधू शकणार नाहीं. जो त्याच्याशी व्यवहार करील तो फसेल व त्याच्याबद्दलची जोखीम आह्मावर नाहीं. कळावें तारीख ९ एप्रिल १९०४ इसवी.

सही.

रामसा वल्लद तुळशीराम हलवाई

राहणार आकोला निशाणी—

दस्तुर—द्वारका रामसा हलवाई.

र. नं. ११ ह्मास २१ पैकीं नं. ५

१९०४

जाहीरनामा

अक्ट नंबर ७ सन १८८९ अन्वयें वारसाचे सरटिफिकीट देण्याबद्दल.

विद्यमान किंगसाहेब सिव्हिल जज्यसाहेब जिल्हा वाशीम यांचे कोर्टांत.

सर्वत्रांस या जाहिरनाम्यानें कळविण्यांत येते कीं अर्जदार रतनसा मौजीसा सावजी राहणार वाशीम यानें मोहोन रतनसा हा वाशीम येथें रहात असून नागपूर येथें आमचे घरीं तारीख २४-६-८९७ साळांत मयत झाला आहे व त्याची पोस्ट सेव्हिंग ब्यांकमध्यें राहिलेली रकम सातशें अठावीस रुपये नऊ आणे नऊ पै (७२८।९।९) वाशीम येथील पोस्टांत आहे ती रकम मिळण्याकरितां सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें वारसाचें सरटिफिकीट मिळण्याकरितां या कोर्टांत अर्ज दाखल केला आहे. त्याची चौकशीची ता. १८-६-१९०४ इसवीची नेमिली आहे करितां त्या प्रकरणांत ज्यांचा हक्क संबंध असेल त्यांनीं सदरहू तारखेस सकाळीं १० वाजतां आमचे समोर हजर राहून आपले हक्क संबंध दाखवावेत. या प्रमाणें करण्यास चुकूं नये. कळावें. तारीख ७-४-१९०४ इ०

S. H. King

शीक्का सिव्हिल जज्य वाशीम.

६ शें वर्षांचें घड्याळ—रूएन (फ्रान्स) येथें एक घड्याळ आहे. तें आज ६०० वर्षांचें जुनें आहे. इतके वर्षांत त्याला दुरुस्ती मुळींच करावी लागली नाहीं. एवढेंच नाहीं. तर तें आजपर्यंत बंदमुद्दां पडलें नाहीं!

फार प्राचीन झाड पडलें—आग्रा येथील ताजमहालाच्या बागेंत एक प्राचीन तमिळचें मोठें झाड होतें. या झाडाच्या ठिकाणीं लोकांची मोठी पूजाबुद्धि होती. वस्तुतः असें सांगतात कीं, हें झाड ताजमहालाची इमारत बांधण्यापूर्वी पासूनचें फार प्राचीन होतें. या झाडाची बरोबर व्यवस्था न राखिल्यामुळें तें नजीनदोस्त आलें. व एक झाडाचें पुरातन वस्तू नाहींशी झाली.

स्त्रियांचें साहस—रशियन शिपाई कोरियामध्यें फार अचंबित कृत्यें करीत आहेत. अलीं एक बातमी आली आहे कीं, कोरियन बायका रशियन स्वारांवर हल्ला करून सुमारें ३० लोकांना ठार मारिलें. खरें असल्यास अश्चर्यकारक होय.

एक मुसलमान हिंदु झाला—पुलतानाकडील मुनसी अबदुल कादर नांवाच्या जन्मतः मुसलमान असलेल्या गृहस्थानें स्वामी दयानंदाचें लेख वाचल्यामुळें आपला वैदिक धर्मा माणें वागण्याची मनेच्छा झाली. व त्याच्या मुळ मुसलमानी धर्मांत आला दोष दिसूं लागले. तेव्हां त्यानें मिरत येथील आर्यसमाजास आपणास वैदिक धर्माची दिक्षा देण्याबद्दल विनवणी केली. त्या समाजानें हिंदु मुसलमानास मिळवून सर्वांसमक्ष मुनसी साहेबास त्याच्या इच्छे प्रमाणें वैदिक धर्माची दीक्षा देण्याचा संस्कार केला व आतां मुसलमानाचें हिंदु केलें.

माशानें मांजरास मारिलें—एका बंगाली गृहस्थाच्या घरीं मोठा तलाव होता. त्यांत पुष्कळ मासे होते. त्याच्या घरांतील एक मांजर रोज तळ्याच्या काठीं बसून मासे मारून खात असे. एकदा या मांजरानें एका हातभर लांब अशा माशास पंजा मारून तळ्याबाहेर ओढलें. दोघांचीहि मोठी झटापट झाली व शेवटीं या माशानें त्या मांजराच्या गळ्यास विळखा घालून त्याचा प्राण घेतला. अशा गोष्टी क्वचितच घडतात.

श्रीमती निर्मला बाला—या स्त्रीचा जन्म १८६६ सालीं झाला. ही फार बुद्धिवान स्त्री आहे. हिला विद्येची आवड अगदीं लहानपणा पासून लागलेली होती. हिला हें विद्या व्यसन फारच जडलें आहे असें म्हणणें बरें. ही कलकत्ता युनिव्हरसिटीची ए. ए. ची परीक्षा पास झाली आहे. हिला एकदा राष्ट्रीय सभेचे डोकेसाहे निवडले होते. ही नेहमीं कलकत्त्याकडे प्रवेश परीक्षेस इंग्रजीची परीक्षक असते. ही व हिचा पती हे दोघे हे एकाच वर्षी ओडण्यानें बी. ए. ची परीक्षा पास झाले. ह्यांनीं एक मुलीचें कारिजहि स्थापन केलें आहे. श्रीमती निर्मला बाईंची विद्येपासा वलिल पाति या देशांतील स्त्रियांना व तसेच पुरुषांना अनुकरणीय आहे.

प्रजेची फलप्राप्ती—बलाकार पोलीस पैकीं एका पोलीस शिपायाचा सुंदर ट्रेझरीवर सकाळीं ८ पासून ९ पर्यंत पहारा होता. वेळ येतांच पहाऱ्यावर जातां यावें म्हणून तो नजीकच देवाची पूजा करीत बसला. दुसरीकडे लक्ष जाऊं नये म्हणून त्यानें आपले कान बंद केले होते इतक्यांत एक बडे साहेब अधिकारी तेथें आले. त्यांनीं त्यास हाक मारली पण त्यास ती ऐकूं न गेल्यामुळें त्यानें उत्तर दिलें नाहीं. साहेबांनीं ह्यास वेड लागलें असें समजून त्यास तेथून हांकून दिलें. पण तो पोलीस होता, असें समजताच त्याची दुपारी समोर चौकशी करून त्यास १ महिना रक्तमजुरीची शिक्षा या साहेबानीं दिली. ही काय, ईश्वराची अनन्यभावें पूजा केली त्याची फळप्राप्ती!

मार्मिक आख्यायिका

कैलासडे या तीर्थाचाने पुढील गोष्ट आहे. एके समयीं मुंबईचे लॉर्ड बिशप न्यायमूर्तीस भेटण्यास आले त्या वेळीं त्यांचे टेबलावर अनेक धर्मग्रंथ होते, त्यात बायबलही होतें. हे ग्रंथ एकमेकावर रचून ठेवले असून सर्वांवर बायबल होतें. तें पाहून बिशप साहेब म्हणाले:— 'आपला येथें बायबलनें अग्रस्थान मिळविलें आहे, तें उच्चस्थानीं जाऊन बसलें आहे व इतर ग्रंथ त्याचे खालचे आहेत. असें आपण मानतां, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.' यावर न्यायमूर्तीनीं पुढील मार्मिक उत्तर दिलें:— 'असें दिसतें खरें; पण बायबलास पायाभूत—आधारभूत—कोणता ग्रंथ आहे. हें आपण नीट पहा. टेबलावर सर्वांचे खालीं श्री तुकाराम महाराजांची गाथा आहे. हें आपण पाहिलें नाहीं.'

खरी महत्वाकांक्षा—महत्वाकांक्षा म्हणजे सत्ताधिकार किंवा लब्धप्रतिष्ठा मिळविण्याची इच्छा, किंवा थाटमाट आणि वैभवाचें प्रदर्शन ह्यांची आवड इत्यादि मनोविकार जे सर्वसाधारण अर्थात ते नव्हेत. तर बुद्धिमान पुरुषाचे ठिकाणीं, सत्कार्यांतील संकटें नाहींशीं करण्यासाठीं किंवा सत्कार्यास प्रगति देण्यासाठीं जी एक विशिष्ट शक्ति असते, त्या शक्तीचा प्रभाव दाखविण्याची जी इच्छा, ती खरी महत्वाकांक्षा होय.

"Ambition does not mean love of power or fame for the sake of glitter decoration and authority, on their own account and all these are common passions enough in strong natures as well as weak. Ambition in a better sense, the motive of resolute and potent genius to use strength for the purpose of strength, to clear the path, dash obstacles aside, force good causes forward."

कळकळीचा उपदेश—हल्लींच्या विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता पूर्वीच्या विद्यार्थ्यां प्रमाणेंच प्रखर असतांही, हल्लीं विद्यानिष्ठ, लोकव्यवहारदक्ष आणि पुरुष कां निघत नाहींत याचें कारण म्हणजे विद्यार्थी उत्तम परिस्थितींत असतांही परावलंबित्व असतात, त्यांची कर्तव्यसीमा संकुचित झालेली असते, हाणून पूर्वी सारखे सांडे अगर तेजस्वी निर्माण होत नाहींत. सत्याची अभिरुची, विद्येची एकनिष्ठ सेवा, विद्यानें आत्मोन्नति, पुरुषार्थाची खरी किंमत, याचा परिचय करून घेऊन आपली कर्तव्यसीमा प्रत्येकानें बढविली पाहिजे. असें ना. चंदावरकरांचें म्हणणें आहे.

रस्त्यांतून थुंकणाऱ्यांवर खटले—सार्वजनिक जागेत कोणीही थुंकण्यास बंदी, न्यूयार्क वगैरे अमेरिकेंतील शहरांतून थुंकणाऱ्यांवर आरोग्यरक्षणाच्या सबबीवर फौजदारी खटले करण्यांत येतात.

विषावर पैसे मिळविणारे—सध्यां सर्व विषांची किंमत फार येते म्हणून आफ्रिकेंतील लोक निरनिराळ्या जातीचे सर्प पकडून त्यांचें विष काढीत आहेत. दर रतली विषाची हजार पौंड प्रमाणें किंमत येतात.

पाणी कोठें लौकर लागतें? वावांत जरा ठिकाणीं वाळवीचें किंडे असतात त्यांचे आसपास अगर घर उन्हाळ्यांत एक दोन प्रहरीं मेंढ्या आणून तेथें खालीं करून जेथें जमिनीस लागतात तेथें विहीर खणली असतां त्या विहिरीस पाणी हटकून लौकर लागेल.

दोन अद्भुत मुलें—एका पार्शी गृहस्थानें गेल्या तारीख २० रोजीं दोन तेलगी मुलें बडोदें सरकारकडे त्यांना दाखविण्यासाठीं आणलीं. सदहूं मुलांपैकीं एकाचे पोटास लागून दुसरा मुलगा उत्पन्न झालेला आहे मुलाचें वय सरासरी १०।१२ वर्षांचें आहे लागून असलेल्या मुलाचें सर्व शरीर आ मुलाचे पोटांत असून बाकी सर्व भाग बाहेर दिसत आहे. सबंध असलेल्या मुलाचें डोकें बरेंच मोठें असून हातपाय अखंड व कृश आहेत. या दोन्ही मुलांस लिहितां वाचतां यायचें येत आहे. महाराजानीं सदर मुलांना कांहीं बक्षीस देण्याचा हुकूम केला आहे.

लहान मुलाचें पार्सल—ड्रेस्डन येथून सुटणारी एक एक्सप्रेस गाडी ट्रेनमध्यें एका वर्षाच्या वयाचे मुलास उत्तम पॅक करून पार्सलनें पाठविण्यांत आलें. असें समजतें कीं, सदरहू मुलास ब्रा स्टेशनावर मुक्कम येऊन कोंहोचलें होतें. मुलाचें पार्सल करण्याची रीत अगदीं नवीन आहे.

रजपूतांत सद्बोध—रजपूत मुलगे आणि मुली यांच्यां शिक्षणाचा अधिक प्रसार झाला पाहिजे, रजपूत लोकांच्या आचारविचारांत सुधारणा झाली पाहिजे, प्रत्येक रजपूतानें ब्रिटिश सरकारचेंच एकनिष्ठपणें वागलें पाहिजे, राजपूतांचा प्राचीन इतिहासकार कर्नल टोड यानीं आपल्या इतिहासांत रजपूत वंशाचें जें चित्र काढलें आहे, त्या प्रमाणें प्रत्येक रजपूतानें शूर, राजभक्त व मुत्सद्दी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे विचार त्यांच्या महाजनांचे उद्गार आहेत.

एका वृद्ध गृहस्थाचे उद्गार—तुम्ही शिकून काय केलें? तुम्ही बी. ए. होऊन काय केलें? घड इंग्रजी नामलें येत नाहीं, संस्कृत नाहीं; गणितही पुरें नाहीं. मोडी अक्षर नाहीं, जमाखर्च येत नाहीं; पुरें असें कांहींच नाहीं. इतके रुपये खर्चून सांचातरी शिक्षण मिळतें त्यांत काय फायदा? बरें मोठी नोकरीही मिळत नाहीं. घरें नाहीं, आचारविचार माहेबी, तोही पुरा नाहीं. त्याचे गुण अंगांत नाहींत, त्याच्या ज्या सध्या वस्तु, चाली, रीति-पद्धत-कीं, ज्यांना ते मुळींच महत्व देत नाहींत त्या तुम्हाला नव्या म्हणून महत्वाच्या वाटतात व त्या भिकार गोष्टी तशा उचलतां. चार चवचाल मुलांच्या संगतींत राहून वाटेल तसें वागतां, कोणी बोलत नाहीं, दडपत नाहीं, पण कायदा दोही दिशा सोळा. वाटेनांत चालतीं मुलें नसतात असें फारच आहे. पण त्यानें वळण कोण घेतो? तसेंच मुलें चालतीं! पण तुम्ही व तुमच्यासारखे अर्धेमुर्धे शहेब बनलेलेच बाहेर निघायचे. भ्रष्टाचार करायचा कर्म करायचें, पण मानेल तसें वागावयाचें वळ डोर, श्रीमंती मिळवायची व अर्धे कच्चें शिक्षण मिळवायचें हेंच तुमच्या कॉलेजात रहाण्याचें फळ!" वरील गोष्टी मुलांनीं ध्यानांत घेतल्यास व नेदेप आहेत आपासून दूर राहण्यास शिकावें म्हणजे शिक्षणाच्या शत्रु असून रसपानानें सर्वत्रास सोख्य होईल.

जपानी स्त्रीचा देशाभिमान—जपानमधील तहासाली शहरांतील एका स्त्रीयानें आपल्यास लढाईच्या कामगिरीवर पाठविण्याविषयीं अर्ज केला होता, पण तो अर्ज लष्करी अधिकाऱ्यांनीं नामंजूर केला. अर्ज नामंजूर करण्याचें कारण असें दर्शविण्यांत आलें होतें कीं, सदर स्त्रीचा हा एकुलता एक मुलगा असल्यानें तिच्या उदरनिर्वाहाचा आधार त्याच्यावर आहे याकरितां त्यास लढाईवर पाठविणें योग्य नाहीं. या प्रमाणें अर्जाचा निकाल झाल्याची बातमी त्या मुलाच्या आईस समजतांच तिनें एकदम आत्महत्या करून घेतली. ही आत्महत्या करितांना तिनें एक पत्र लिहून ठेविलें होतें त्यांत असा मजकूर होता कीं आपल्यामुळें लढाईवर जाण्यास अडचण येऊं नये म्हणून आपण आत्महत्या केली आहे.

जपानी उमरावांचा स्वार्थत्याग

जपानी उमरावांपैकीं प्रिन्स टोकुगावा व मार्क्विस कुरोदा या दोन प्रमुख उमरावांनीं आपले सबंद पगार लढाईच्या कामास लढाई चालू राहिपर्यंत देण्याचें ठरवूं केलें आहे.

२००० स्त्रियांची रशियन पलटन—

रशियामधून आलेल्या बातमीवरून असें समजतें कीं, लढाईवर नाकाकरिता २००० स्त्रियांची एक पलटण तयार करण्याची परवानगी एका रशियन स्त्रीनें थोड्या दिवसांवर रशियन सरकारकडे मागितली होती. ही परवानगी मिळण्यापूर्वीच या बाईनें दोन हजार स्त्रियांच्या लष्करासाठीं लागणारी हत्यारें व खाणी सामान खरेदी करण्याकरितां कंड जमविला होता. पण स्त्रियांची पलटण लढाईवर पाठविणें योग्य नाहीं अशी रशियन अधिकाऱ्यांची समजूत होऊन त्यांनीं या बाईस पलटण काढण्याची परवानगी दिली नाहीं.

REGISTERED No. N 4

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.....०१-६
दुसरे खेपेस.....०१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ..... 2 as

Advertisement
below 10 lines ..... 2 Rs
Per line over 10 .....8 as
Repetitions Per line ,, 2 as

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 18 APRIL 1904 NO 15

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १८ माहे एप्रिल सन १९०४ इ० अंक १५

जाहीरात

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं आमचे खाशांत रस्त्या वरील कुठी लोकांच्या हमिरी ठेवण्याचे कामाकरितां टाइम कीपरच्या जागा दरमाहा रुपये १५ प्रमाणें भरावयाच्या आहेत. या लोकांस इंग्रजी नांवें लिहितां आलीं पाहिजेत व या लोकांची इच्छा नोकरी करावयाची असेल त्यांनीं आमचेकडे अर्ज करावेत. तारीख ७।४।०४

(सही) जे. एम. वाचा
एक्झिक्युटिव इंजीनियर
पश्चिम वऱ्हाड, आकोला

नोटीस

परतवाडा मुनिसिपाल्ट कमिटीकडून नोटीस देण्यांत येतें कीं, सन १९०४।०५ साला चा घरपट्टीचे आकारणीचा तक्ता तयार करून कमिटीनें मुनिसिपाल आफिसांत ठेविला आहे. ज्याची इच्छा असेल त्यानें सदर्हू तक्ता पहावा. कळावे. ता. ५।४।०४ इ.

गणेश नागेश वकील
व्हाईस चेअरमन
मु० क० परतवाडा.

नोटीस

बेशमी रामचंद बनसराम मारवाडी दुकान आकोलें ताजनापेठ यांस: —

खोला सही करणार नोटीस देतों कीं तुम्ही आमचे पक्षकार हिराची मर्द महिबुबखा व महमदखा वल्द चांदखा यांचेपासून त्यांचे ताजना पेठेंतील मकान एक हजार रुपयास विकत घेतलें त्याबद्दल तुम्हास त्यांनीं खरिदीखत ता. १२-१०-१९०३ इसवीचे नोंदून दिलें. सदरहूचे भरण्याचे रुपयांपैकीं पांच रुपये मात्र त्यांना तुम्ही रजिस्ट्रारचे कचेरीत दिले बाकीचे रुपये तुम्हांस त्यांनीं कित्येक वेळां खरिदीखतांत लिहिले प्रमाणें द्या म्हटले असतां तुम्ही आज देतों उद्या देतों असें हणून चाळवितां परंतु रुपये देण्याची आपली मर्जी दिसत नाहीं, तरी या नोटिसीनें आपणांस कळविलें जात आहे कीं नोटीस पावल्यापासून चार दिवसांचे आंत तुम्ही आपले करारा प्रमाणें रकम रुपये ९९६ नऊशे पंचाणव व नुकसानीचें व्याज दर दोन प्रमाणें देऊन आमची पावती घ्यावी. तसें न केल्यास खरिदी घेतलेल्या मिळकतीवर तुमचा कांहीं हक्क राहणार नाहीं व आमचे पक्षकार मग त्या मिळकतीची वाटेल ती व्यवस्था करतील. अगर योग्य ती दाद मागणें कस्तां तुमचेवर योग्य कोर्टांत फिर्याद करतील. त्या फिर्यादीचा व या नोटिसीचा खर्च तुमचेवर बसेल. तारीख १०-४-०४

सही
नामदेव सदाशिव वकील
वरील हिराचे व महमदखा
यांचे तर्फे.

नोटीस

नोटीस राधाबाई जवळे वासुदेव भट व पार्वती बाई जवळे सांब भट जोशी राहणार मौजे कृष्णापूर प्रगणें उमरखेड तालुके पुसद जिल्हे वाशीम यांसी:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही मजला सुमारें दोन वर्षांपूर्वी दत्तक घेऊन दत्तकपत्र रजिष्टर वगैरे करून दिलें. व त्याप्रमाणें मी आजपर्यंत वहिवाटहि करीत आहों आतां अलिकडे तुम्ही गांवकरी लोकांचें फंदानें स्थावर व जंगम इस्टेटीची विल्हेवारी करण्याचा तुमचा विचार दिसत आहे. तरी तुम्ही ती मुळींच करूं नये. कायद्या प्रमाणें तुम्हाला स्थावर जंगम इस्टेटीची विल्हेवारी करण्यास म्हणजे कोणाला विकण्यास, गहाण ठेवण्यास, अगर बक्षीस देण्यास मुळींच अधिकार नाहीं. तुम्ही दोघांनीं मजपासून अन्नवस्त्र घेऊन सुखी असावें. तुम्हाला कोणापासून कर्ज काढणें अगर दुसरे कोणतही प्रकारची देवघेव करण्याबद्दल मनाई आहे. या उपर जर तुम्ही देवघेव कराल तर तिजबद्दल मी किंवा माझी इस्टेट मुळींच जबाबदार नाहीं. कळावें तारीख १०।४।१९०४ इसवी.

सही
मारुती बिन वासुदेव भट जोशी
राहणार कृष्णापूर प्रगणे
उमरखेड दस्तुर खुद्द.

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं मौजे कृष्णापूर प्रगणे उमरखेड तालुके पुसद जिल्हा वाशीम येथील राधाबाई जवळे वासुदेव भट जोशी व पार्वती बाई जवळे सांब भट जोशी यांच्याशीं कोणीहि देवघेव करूं नये. कारण त्यांना देवघेव करण्याचा अधिकार (माझे शिवाय) मुळींच नाहीं. मी राधाबाईचा दत्तक पुत्र असून पार्वतीबाई ही माझी दत्त आजी आहे. सर्व स्थावर जंगम इस्टेटीचा मालक मी असून त्या इस्टेटीची वहिवाट हल्लीं मी करीत आहों. हल्लीं गांवकरी लोकांचे फंदानें राधाबाई व पार्वतीबाई माझ्या इस्टेटी संबंधानें विल्हेवाट करणार असा त्यांचा विचार दिसतो. करितां त्या उभयतां बाईशीं कोणीहि कोणतेच प्रकारची देवघेव करूं नये. व त्याचे पासून स्थावर जंगम इस्टेट खरेदी, गहाण अगर बक्षीस कोणी घेऊं नये. घेतल्यास ती रद्द असे. कळावें. तारीख १०।४।१९०४ इसवी.

सही
मारुती बिन वासुदेव भट जोशी
राहणार कृष्णापूर प्रगणे
उमरखेड दस्तुर खुद्द.

नोटीस

बेशमी बायजाई मर्द बहादू जात माळी राहणार चान्नी ता. बाळापूर पोस्ट-चान्नी यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों ऐसाजे—आपण माझ्या चुलती आहात. आपले भ्रतार मरून आज ४ वर्षे झाल आलीं. इतके दिवस आपण आपल्या घरीं बसून कोणाच्याहि देवघेंत न पडता वाळ काढला. पण आतां माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, आपण दुसरीकडे गंधर्व लावून निघून जाणार आहांत. शिवाय मयत बहादूचा यांचें घर व शेती हीं विकून टाकण्याचा तुमचा इरादा दिसतो सबब ही नोटीस देणें भाग आलें. तर कळवितों कीं आपण चुलत्याची जिनगी विकी, गहाण अगर बक्षीस कोणास देऊं नये. असें करण्याचा तुमांस अख्तयार नाहीं. शिवाय आपण जोंपर्यंत आमच्याच वशात राहाल व दुसरा घरठाव करणार नाहीं तोंपर्यंत तुम्हांस खाण्यापिण्यास देण्यास आम्ही तयार आहों. तुम्हास नवऱ्याच्या वेळचे किंवा स्वतःचे कर्ज वगैरे कांहीं नाहीं आणि जर एवादें कर्ज खरोखर असल्या विषयीं आमची खात्री करून द्याल तर चुलत्याच्या इस्टेटीच्या माथीं तें सर्व फेडण्याला आम्ही तयार आहों. सारांश इस्टेटीची विकी किंवा गहाण वगैरे देण्याची काहीमात्र गरज नाहीं. कळावें तारीख १३ एप्रिल सन १९०४ इ०

सहीची निशाणी
शिदू वल्द बुलाजी माळी राहणार चान्नी याचे हातची रेघ.

जाहीरात

तमाम लोकांस या जाहीर लेखानें मी खालीं सही करणार कळवितों कीं, माझी चुलती नामे बायजाई मर्द बहादू माळी राहणार चान्नी ही माझ्या चुलत्याचें शेत व घर हीं विकणार आहे. तरी तिजबरोबर हा व्यवहार कोणी करूं नये किंवा ही जिनगी विकण्याचा बिलकूल हक्क नाहीं. या उपर जो तिजबरोबर व्यवहार करील तो फसेल. त्याची जबाबदारी त्या जिनगीवर राहणार नाहीं. आणि तो व्यवहार कोणत्याही प्रकारें इस्टेटीला बाधूं शकणार नाहीं. त्या शिवाय माझ्या चुलतीला कर्ज वगैरे काढण्याचें प्रयोजन बिलकूल नाहीं. हणून या जाहीर लेखानें सर्वांस सुचविलें आहे. कळावें तारीख १३ एप्रिल सन १९०४ इ०

सहीची निशाणी
शिदू वल्द बुलाजी माळी राहणार चान्नी हातची रेघ.

नोटीस

बेशमी उकर्डा वल्द राघो जात मोई राहणार देऊळगांव तालुके जळगांव पोस्ट-पातुर्डा. यांस:—

मी खालीं सही करणार या जाहीर लेखानें कळवितों ऐसाजे—तूं माझा वडील मुलगा आहेस. तूं लबाड लोकांच्या छंदीलागून आमच्या बरोबर मांडून गेल्या शिमग्याचे सुमारास आमापासून वेगळा राहिला आहेस. तरी मध्यंतरीं मनास वाटेल तेव्हां आमच्या घरीं येऊन वाटेल त्या जिनसा वाटेल तेव्हां दांडगाईनें घेऊन जातोस. शिवाय तूं लुच्या लोकांच्या फंदानें माझ्या नावचे नंबर अगर इतर स्थावर जिनगी कोणास विकशील अगर कोठें लिहून देशील अशीहि मला फार भीति वाटत आहे. सबब कळवितों कीं, तूं माझी कोणचीहि इस्टेट कोणास लिहून देशील अगर त्याजवर कर्ज वगैरे काढशील तर त्याची जोखमदारी त्या इस्टेटीवर अगर मजवर बिलकुल राहणार नाहीं. तूं असला व्यवहार करूं नयेस व तूं वाईट मार्ग सोडून गुण्या गोविंदानें राहावें हणून मुद्दाम या नोटिशीनें सुचविलें आहे. कळावें तारीख १४।४।०४ इसवी.

सहीची निशाणी
राघो वल्द रामा मोई राहणार
देऊळगांव याचे हातची रेघ—

जाहीरात

तमाम लोकांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं माझा मुलगा नामे उकर्डा हा वाईट लोकांच्या नादानें बिघडला आहे व तो मजपासून निराळा राहतो. त्याची अशी स्थावर इस्टेट वगैरे कांहीं नाहीं. तो लबाडीनें कोणास माझी शती वगैरे विकील अगर गहाण देईल तर कोणी घेऊं नये. त्यास कोणी कर्जहि देऊं नये. या उपर जर कोणी त्यास बरोबर असला व्यवहार करील तर तो सर्वथा फसेल. त्याची जबाबदारी माझ्या इस्टेटीवर बिलकुल नाहीं. तो व्यवहार सर्व बातल होय. कळावें. ता. १४।४।०४ इ.

सहीची निशाणी
राघो वल्द रामा मोई
राहणार देऊळगांव याचे
हातची रेघ.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ३ शके १८२६

उत्कृष्ट सूचना

परवांच्या बजेटावर संभाषण करितांना नामदार मॉरिसन यांनीं फार उत्कृष्ट अशा दोन सूचना केल्या आहेत. त्यांचें ह्मणणें कीं, लोकांवर करांचा बोजा जास्त न पडतां जर सालोसाल सरकारच्या तिजोरींत पुष्कळ शिल्लक जमत आहे तर त्याचा विनियोग चांगल्या उपयुक्त गोष्टीकडे होणें इष्ट आहे. कर कमी केल्यानें लोकांच्या जवळ व्यक्तिशः जी थोडी रकम राहील ती त्या लोकांच्या हातून एखाद्या लोककल्याणाच्या कार्याकडेच खर्चिली जाईल असें मला वाटत नाहीं. पण हाच एकवटलेला पैसा, सरकारनें मनांत आणिल्यास, जनतेच्या हिताचें एखादें कार्य उत्तम उठवून देईल. ह्मणून मी आपल्याकडून दोन देशहिताचीं कामें सरकारास सुचवितों कीं, हिंदुस्थानच्या लोकांना उच्च शिक्षण देणारी अशी एक संस्था आणि त्यांची नैतिक व मानसिक उन्नती करणारी अशी एक संस्था अशा दोन संस्था स्थापन करण्याविषयीं सरकारनें मुद्दाम विचार करावा.

विद्यापीठ

सध्यां कॉलेजामधून जें शिक्षण मिळतें तें शिक्षण ह्मणजे ठरीव सिद्धांतांचें ज्ञान करून देणें व त्यांत परीक्षा घेणें इतकेंच होय. कॉलेज आणि शाळा यांच्या शिक्षणामध्यें कांहीं ह्मणण्या सारखा फरक नाहीं. अर्थात् नवीन शास्त्रीय शोध लावण्याचें व उच्चतर अध्ययनाचें शिक्षण येथें मिळत नाहीं हें उघड आहे. तर हिंदुस्थानच्या लोकांसाठीं अशी एक निराळीच शिक्षणसंस्था सरकारानें मुद्दाम काढावी कीं, जेथें गुरु व शिष्य दोघेही ज्ञानाचा उच्चतर प्रदेश अवलोकन करून त्या ज्ञानाची माहिती सर्व जगतास करून देतील आणि जेथें लोकांना आपली ज्ञानामृतपानाची आवडी मुनसोक्त वाचनानें पुरवून विद्याभ्यासाचा महा आनंद संपूर्ण अनुभवतां येईल. असें विद्यापीठ स्थापित होणें अत्यंत अवश्य आहे व त्यामुळें हिंदुस्थानचे लोक शास्त्रीय विषयांत पारंगत होऊन त्यांची बुद्धिमत्ताहि तरतरीत होईल यांत शंका नाहीं.

खरोखर नामदार साहेब ह्मणतात त्या प्रमाणें सरकार असें एक जरी विद्यापीठ संस्थापित करील तरी लोकांबद्दलची त्यांची कळकळ लोकांस खरी वाटेल. उच्चतर शिक्षण लोकांस पाहिजे असें नुसतें फोल बोलणें उपयोगाचें नाहीं. हातांतून कांहीं तरी तसें काम वठत गेलें पाहिजे. मि० टाटा यांनीं रीसर्च युनिव्हर्सिटीसाठीं आपल्या पदरचे पैसे दिले तरी त्यांनी नांवारुपाला आलेली अशी कांहींच गोष्ट अद्याप दिसत नाहीं. मग सरकारेच गोड बोल लोकांस कितपत पटतील बरें !

नवीन चीफ कमिशनरी

लोकांची नैतिक व मानसिक उन्नती करण्या संबंधानें नामदार साहेबांची जी सूचना आहे ती फारच स्तुत्य आहे. त्यांचें ह्मणणें कीं शाळेंतील शिक्षण ही एकच गोष्ट लोकांच्या बुद्धीची व नीतीचीं उन्नती करणारी आहे अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. लोकांची उन्नती, ते शाळेंतील अभ्यास संपल्यावर जो उद्योगधंदा करितील त्यावरहि पुष्कळच अवलंबून असते. सध्यांच्या शिक्षणानें लोकांची बुद्धि कांहींशी तरल होत असेल पण या फायद्याबरोबर लोकांच्या अंगांतले मर्दानी उत्कृष्ट गुण लोपत आहेत अशी माझी समजूत आहे. शाळा व कॉलेजें यांच्यामुळें लोकांना कांहीं नवीन नवीन गोष्टी चांगल्या, समजल्या परंतु इंग्रजी राज्यपद्धतेचा हिंदुस्थानांत असा चमत्कारिक परिणाम झाला आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांना एखाद्या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या शिरावर जोखीम घेण्याची किंवा एखाद्या महत्वाच्या कामकाजाचा योग्य विचार करण्याची संधीच मिळत नाहीं. प्रसंगीं कर्तृत्व करण्याची धमकच जर हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगांत उरली नसेल तर ही गोष्ट इंग्रजी अमदानीस मोठ्या लांछनाची होय. लोकांच्या ठायीं कर्तृत्वशक्ती उत्पन्न झाली पाहिजे या साठीं सरकारनें एक गोष्ट मुद्दाम अनुभवून पहावी. एक लहानसा प्रांत इंडियन लोकांसाठीं ह्मणून निराळा राखून ठेवावा व तेथें इंडियन लोकांची चीफ कमिशनरी काढावी. ह्या प्रांतांतील लहान थोर सर्व अधिकारी इंडियन लोकच असावेत. अशा रीतीनें प्रत्यक्ष कामाची त्यास ओळख पटेल, तीं कामें व अशींच महत्वाचीं दुसरीं कामें करण्याचें सामर्थ्य त्यांस येईल आणि अशा रीतीनें राज्यकर्तृत्वाच्या कामांत निरडल्यामुळें व निरंतर महत्तर कार्याचाच दृढतर व्यासंग झाल्यामुळें त्यांची लुप्तप्राय झालेली कार्यस्फूर्ती पुनः प्रज्वलित होईल.

लॉर्ड कर्झन साहेबांच्या विशेष आवडीचा विषय ह्मटला ह्मणजे शिक्षण पद्धती होय. शिक्षणाच्या पद्धतींत आपण फार सुधारणा घडवून आणिल्या ह्याबद्दल त्यांस मोठा अभिमान वाटणें साहजिकच आहे. पण नुसत्या पुस्तकी शिक्षणानें लोकांची मानसिक वा नैतिक उन्नती होत नसते. ही उन्नती होण्याला स्वदेशाचा प्रत्यक्ष राज्यकारभार आपल्या हातानेंच होणें फार आवश्यक आहे. लोकसमूहाच्या अफाट प्रदेशांत अनंत कार्यें स्वहस्तें करीत असतां जें उदात्त शिक्षण प्राप्त होतें तितकें उदात्त शिक्षण दुसरीकडे केठें मिळणार आहे ? हीच गोष्ट वर नामदार साहेबांनीं सांगितली आहे. नामदार साहेबांचे हितबोधाचे शब्द सरकारनें विसरूं नयेत. राजकीय उन्नती शिवाय शिक्षणाची सुधारणा होणें नाहीं. लोकांना आपल्या देशाच्या राज्यकारभारांत जास्त कारभार करण्यास शिकविलें पाहिजे. नामदारांच्या ह्मणण्या प्रमाणें सरकार नवीन चीफ कमिशनरी करून लोकांस शिकवील तर सरकारच्या या उदार कृत्यानें सर्व लोक फार आनंदतील.

नव्याचा पाडा

हिंदुस्थानच्या लोकांस राजकीय हक्क देण्या संबंधानें लार्ड कर्झन साहेबांचें मत असें आहे कीं, हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितीला राजकीय हक्क नको आहेत. राजकीय हक्क दिल्यानें हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं. राजकीय हक्क मिळविण्याजोगी हिंदुस्थानची स्थिती नसतांना मी तसे हक्क लोकांस देऊन माझ्या मागून येणाऱ्या प्रतिनिधींना त्याचें फल भोगावयास लावावें ही गोष्ट मला पसंत दिसत नाहीं. लोकांस राजकीय हक्क देणारा मनुष्य फार प्रिय असतो व तो आपला हितकर्ता आहे असें लोकांस वाटत असतें. पण भलतेच हक्क लोकांस देऊन लोकप्रियता संपादन करण्याची मला बिलकूल इच्छा नाहीं. सर्व हिंदुस्थानच्या लोकांची जास्त एकी व्हावी व त्यांनीं देशहिताच्या कामीं आस्था धरावी ह्या त्यांच्या गोष्टी मला मान्य आहेत. पण जर राजकीय हक्का संबंधीं ते ओरड करीत राहतील तर त्यांची होत असलेली सुधारणा मात्र फार मागासणार आहे.

लॉर्ड कर्झन साहेबांनीं वर सांगितलेलें मत ऐकून पुष्कळ लोकपुढाऱ्यांच्या मनाला एक मोठा धक्काच बसणार आहे. कांग्रेस सभा भरवून राजकीय हक्क मागणाऱ्या नरश्रेष्ठांना ही एक अप्रत्यक्ष रीतीनें सूचनाच केली आहे कीं, उगीच राजकीय हक्काच्या पाठीस तुह्मी लागूं नका, ते आह्मी कांहीं देणार नाहीं. मीच हक्क देत नाहीं इतकेंच नव्हे तर पुढील व्हाइसरायांनीं सुद्धां ह्याच विचाराचा अवलंब करावा असें ध्वनित केलें आहे. कर्झन साहेब किंवा त्यांच्या मागाहून येणारे प्रतिनिधी आह्मांला हक्क देवोत वा न देवोत, आपल्यास ज्या गोष्टी अगदीं योग्य दिसतात त्या मिळे पर्यंत मागण्याचा हक्क आपणांस आहे व तें आपलें कर्तव्य आहे. राजकीय बाबतींत आह्मांस हक्क मिळाल्या खेरीज आपली कष्टमय स्थिती सुधरावयाची नाहीं असा आपला पक्का अनुभव आहे. आणि असे हक्क मिळविण्याच्या कामीं आपली कितीहि नाउमेदी झाली व आपला धिःकार झाला तरी आपणांस आपला हक्क सोडतां कामाचा नाहीं. आपल्या हक्काच्या मार्गांत जे आडवें येईल तें दूर करण्याचा आपण मनोभावें प्रयत्न केला पाहिजे. आह्मी राजकीय हक्कांस अद्याप कसे अपात्र आहों हें मोक्षम न ठेवितां याचें स्पष्टीकरण लाट साहेबांनीं केलें असतें तर बरें होतें.

स्वावलंबन

राजशाही येथें मौलवी शमसुलहद यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच एक महमदी विद्या परिषद भरली होती. तिच्या हकिकती वरून मोठ्या महत्वाच्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आपल्या मुसलमानभाईंना आपली खरी स्थिती आतां समजूं लागली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. आपण राज्यकर्त्यांच्या विशेष मर्जीतले आहों मग आपणांस कोणाची व कसलीहि पर्वा करण्याचें कारण नाहीं ह्मणून जी घमेंड त्यांना होती ती आतां दूरावत चालली आहे. पूर्वीचे पुढारी त्यांस उपदेश करीत होते कीं, कांग्रेस पासून दूर रहा, व हिंदूशीं मिसळूं नका, सरकारची मन धरणी करा ह्मणजे आपणांस सरकार अधिकारसंपन्न करून सोडील. पण ह्या उपदेशाचा ठसा लॉर्ड कर्झन साहेबांनीं चांगला धुऊन फुसून साफ नाहींसा केला आहे. कोणच्याहि समाजावर मर्जी ह्मणून अधिकारदानाची सरकारी मेहेर नजर होणार नाहीं. आपल्या विद्वत्तेवर आपल्या गुणांवर व आपल्या हिंमतीवरच आपण आपलें पाऊल पुढें पुढें टाकलीत गेलें पाहिजे. ह्या गोष्टीचा मुसलमान बंधूंच्या मनावर आतां चांगला उजेड पडला आहे. कांग्रेस, औद्योगिक परिषद वगैरे संस्था आपल्या सर्वांच्या, हिंदू मुसलमानांच्या, कल्याणासाठींच आहेत अशी जाणीव त्यांच्याठायीं उत्पन्न झाली आहे. इंडिया हा देश मुसलमानांचा व हिंदूचा दोघांचाहि आहे. दोघांनीं एक दिलानें व एका जुटीनें हिंदुस्थानच्या हिताच्या गोष्टींत लक्ष्य पुरविलें पाहिजे. आपण तुटकपणानें राहून आपलें व देशाचें नुकसान आपण करीत आहों, हिंदु मुसलमानांनीं आपली दुही मोडली पाहिजे, आपल्या राज्यकर्त्यांच्या तोंडाकडे पाहून आपली सोय लागणार नाहीं वगैरे गोष्टी मुसलमानांचे सध्यांचे थोर थोर पुढारी वारंवार आपल्या जातभाईंना उपदेशित आहेत. हे हितबोधाचे शब्द सर्व मुसलमान बंधूंनीं मुद्दाम ध्यानांत घ्यावेत आणि या प्रमाणें द्विधा भाव सांडून देश हिताच्या कार्यासं मोठ्या हुरूपानें लागावें. मग इच्छित मनोरथांची फलप्राप्ती देणारा परमेश्वर कांहीं दूर नाहीं.

राजधोरण

ह्या पांच चार वर्षांत आशियांतील इतर देशाच्या राजकारणा संबंधानें हिंदुस्थानची जबाबदारी कशी वाढत चालली आहे याचा कर्झन साहेबांनीं चांगला उलगडा केला आहे. हिंदुस्थान ह्मणजे एक किल्ला आहे. याच्या दोन बाजूंस समुद्राचा संदक असून बाकीच्या बाजूस संरक्षण करण्यासाठीं उंच पर्वत उभे आहेत. ह्या पर्वताच्या पलिकडे लहान मोठा असा प्रदेश पसरलेला आहे. तो भाग आपण बळकावून बसावें अशी आमची इच्छा नाहीं पण तो आमच्या शत्रूंना मात्र मिळतां कामा नये. आपल्या दोस्तांच्या ताब्यांत तो भाग असला ह्मणजे ठीक. पण जर आपल्या वैऱ्याचा व प्रतिस्पर्ध्याचा पाय तेथें ठरेल आणि आपण स्वस्थच बसूं तर आपली शांतता नष्ट होऊन केव्हां कसें विघ्न उत्पन्न होईल याचा नेम नाहीं आणि ह्मणूनच आपणांस अगाऊ तरतूद केली पाहिजे. आरबस्थान, इराण, आफगाणिस्थान, तिबेट व सियाम वगैरे देशाशीं जो आपला सध्यां संबंध आहे त्याचा उलगडा वरील गोष्टींनें सहज होणार आहे. ह्या देशाशीं

जें कारस्थान केलें त्याचें कारण तरी हेंच कीं शत्रूंचें प्राबल्य तेथें माजूं नये. नुसत्या सरहद्दीच्या तटबंदीच्या पलिकडे जो सेनापती लक्ष्य पुरविणार नाहीं तो अदूरदर्शी होय. ह्याच साठीं सध्यांची तिबेटची मोहीम आहे. दुसऱ्याचीं राज्यें मिळविण्याचा आमचा हेतु नाहीं पण आपले राज्याची तनदुरस्ती राहावी एवढाच हेतू आहे. जास्त मिळविण्याची हाव न धरितां आहे तेंच चांगलें राखलें ह्मणजे झालें आणि ह्या साठीं जें कांहीं कर्तव्य आहे तें मी करीत आहे व या माझ्या करण्यास जर कोणी दोष दिला तर मी तो सहन करण्यास तयार आहे.

रणकंदन

लढाई सुरु आहे. पोर्ट आर्थर येथें दररोज चकमक झडत असते. विशेष बातमी ह्मटली ह्मणजे जपाननें रशियन ॲडमिरल मॅकरॉफ यांचें जहाज बुडविलें. तो शूर ॲडमिरलहि बुडून मेला. याच्या मृत्यूनें सर्व रशिअन लोकांस मोठी दहशत पडणार आहे. व जपानी लोकांस रशियाच्या जहाजांचा नाश करणें विशेष सुलभ जाईल.

वऱ्हाडवृत्त

हवामान– गेल्या आठवड्यांत दोन तीन दिवस वारा फार सोसाट्याचा असून तो एक सारखा अष्टौप्रहर खेळत होता. या वाऱ्यानें आम्रफलें फार पडलीं अशी बोलवा आहे. दोन प्रहरीं ऊनहि तापतें तरी सांज सकाळीं हवेंत गारवा फार लवकर येतो व थोडीशी थंडीहि अंगास झोंबतें. हवापाणी स्वच्छ असून आरोग्यकारक आहे. प्लेगाचा उपद्रव अगदीं नष्टप्राय झाला आहे ही ईश्वराची कृपा होय.

वऱ्हाडांतील आंग्लो– व्हर्नाक्युलर शाळा ४ मे पासून १५ जून पर्यंत उन्हाळ्या निमित्त बंद राहतील. ही सुटी प्लेगामुळें बंद असलेल्या शाळांसही देण्यांत आली आहे.

वऱ्हाड प्रांत नागपुरास जोडल्यामुळें वऱ्हाडची अशी निराळी वकिलीची परीक्षा होणार नाहीं असा पुष्कळांचा तर्क होता पण ही परीक्षा यंदा नेहमीं प्रमाणेंच येत्या सप्टेंबरमध्यें होईल ह्मणून प्रसिद्ध झालें आहे.

मि. रेली साहेब, सिव्हिल सर्जन, आकोला यांस ६ आठवड्यांची हक्कानी रजा मिळाली आहे व त्यांच्या रजेंत बिलासपूरचे सर्जन मि. नृत्यलाल बसक हे नवीन गृहस्थ येथें येणार आहेत.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर ए. अ. क. मलकापूर हे तारीख २ मे पासून ६ आठवड्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत.

मि० ब्याटन साहेब ह्यांची प्रकृती आतां बरी आहे व त्यांनीं गेल्या १५ वे तारखेस आपल्या ज्युडिशिअल कमिशनरीचा चार्ज घेतला, आणि मि. ग्यारट साहेब हे ७ महिन्यांच्या रजेवर गेले.

स्वाहाकार– येथील वे० शा० सं० रा० रा० बाळंभट बिन केशव भट घोंगे यांनीं काल प्रातःकाळ पासून कुंडमंडपविधियुक्त संहितेच्या स्वाहाकाराच्या उत्सवास प्रारंभ केला आहे. हा उत्सव अष्टमीपर्यंत चालणार आहे. व शेवटचे दिवशीं पूर्णाहुती व अवभृथस्नान होऊन उत्सवाची परिसमाप्ती होईल.

वऱ्हाडांतील प्रमुख प्रमुख देशमुख मंडळींनींहि एक यज्ञ करण्याचा विचार करून त्यासाठीं १५–२० हजार रुपये जमविले आहेत. हा यज्ञ पुराणांतरीं सुप्रसिद्ध असलेल्या पयोष्णी नदीच्या कांठींच होणार आहे. तसेंच उमरावती सारख्या सुधारणेच्या पीठस्थानींहि एक पशुयज्ञ होणार ह्मणून गुणगुण आहे. चार पांच महिन्यापूर्वी येथील रा० रा० व्यंकटेश कृष्ण देसाई वकील यांनींहि एक स्वाहाकारचें पुण्यकार्य केल्याची गोष्ट सर्वांच्या आठवणींतली आहे.

येणें प्रमाणें वऱ्हाडांतील लोकांच्या मनांत कल धार्मिक पुण्य कार्याकडे विशेष होत आहे व त्यांच्या विचारास हें एक निराळेंच वळण मिळत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

आकोला बाजारभाव

हुंडी दर्शनी	१००८=
सोनें २४।=	चांदी ६८॥।
जवारी ५०–१२	जवस ७८
गहू काठे ८०	बनशी ९०
सरकी	५
मीठ	२। रु. मण
चणे	२॥। रु. मण
तूर	९। रु. मण
तेल	४॥ रु. मण
रुई जीन	८२
कापूस	५७

मेहकर ता. १३-४-०४

मी फिरत फिरत श्रीविरजक्षेत्रीं कांहीं दिवस वास करून श्रीबालासाहेबाची कीर्ति ऐकून हिमकर क्षेत्रीं आलों. श्रीविरजक्षेत्रींचें महात्म्य तेथेंच वाचावयास मिळालें व स्थळ प्रत्यक्ष पाहून आनंद झाला तो पत्रीं लिहितां येत नाहीं. शक्य असेल त्यानें ईश्वरी लीलेचें कौतुक पाहण्यास विसरूं नये. येथील स्वामी फार तपस्वी आहेत. त्यांचे दर्शनानें महा पापें नष्ट होतील यांत संशय नाहीं. हिमकर क्षेत्रींची श्रीबालाजीची मूर्ति फारच फार प्रेक्षणीय आहे. व ही निदान ७०० वर्षांपूर्वीची प्रस्थापित असेल अशा बद्दल पुराबा तेथेंच सांपडलेला शिलालेख देत आहे. त्याची नक्कल येथील हेडमास्तरांनीं घेऊन संस्कृत पंडिताकडे पाठविली आहे असें ऐकलें. हेडमास्तर आपले कामांत फारच दक्ष आहेत अशाबद्दल आईबाप व शाळेंतील मुलें यांचे तोंडून फार कीर्ति ऐकूं येते. तसेंच ते विद्वान असून देशाभिमानी व स्वाभिमानी आहेत. आणि ह्मणून तद्विरुद्ध गुणमंडित व्यक्तींचा त्यांजवर राग आहे. श्रीबालाजीची मूर्ती फार भव्य असून ईषत्स्मितमुखी आहे मी हिंदुस्थानांत पुष्कळ हिंडलों परंतु असें हास्य मुख कोठें अजून पाहण्यांत आलें नाहीं. देवळाचें काम फार अवजड झालें आहे. पण एवढ्या दांडग्या कामाला सर्व माल येथेंच सांपडला. विटांची व चिऱ्यांची तर जंगी खाणच सांपडली. कालचक्रानें केवढें वैभव जमिनींत गुप्त झालें असेल ह्याची कल्पना करणें कठीण आहे. गांवाचे मानानें येथें धर्मशाळा फार आहेत व त्या धर्मशाळांत राहण्यास कोणी नसल्यामुळेंच जणू काय आज अडीच महिने मोठ्या आश्रयाच्या दोन विश्वयोषितांचीं दुकानें श्रीबालाजीचे धर्मशाळेंत आहेत. देवाचे धर्मशाळेंत विश्वयोषितांचीं दुकानें व तेथेंच शिष्ट ह्मणविणाऱ्या वृद्ध वरिष्ठ मंडळींनीं उघड्यावर श्रीगरुडासमोर श्रीबालाजीस साक्षी ठेवून प्रसिद्धपणें चकाट्या पिटीत बसणें तरुणांचे नीतीस विघातक व वृद्धांस लांछन आहे. कळावें लोभ असावा ही विनंती.

नोटीस

चिरंजीव राजश्री गोविंद त्रिंबक देशपांडे मुकाम तांदळी खुर्द परगणें पातूर यांस—

या नोटीशीनें कळविलें जाते कीं आपला उभयतांचा सवाईक देशपांडेपणाचा मुशारा परगणें पातूर बद्दल मिळत असून तो मुशारा भी ता० १५।४।१९०४ इ० रोजीं घेतला असून तुमचे हिश्याबद्दल या रकमेंतील पैसा या पूर्वीच तुम्हास दिला असून त्याजबद्दल तुमचे हातची प्रॉमेसरी नोटही आहे. शिवाय तुमचे हिशाची तगाईची रकमही भरून दिली ह्मणून तुह्मांस कळविलें आहे. या शिवाय तुमचे कडून रकम येणें राहिली आहे ती तुह्मी आमची भेट घेऊन हिशेब करून निकाल करून घ्यावा. विनाकारण फिर्याद वगैरे केल्यास आह्मी जबाबदार राहणार नाहीं. या नोटीशीचा खर्च तुमचेवर असे. ही नोटीस दिली ता० १६।४।१९०४ इ०

सही

नारायण त्रिंबक देशपांडे

मुकाम तांदळी द० खु०

नोटीस

रा. रा. बनसी आणि लक्ष्मण कायथ राहणार आकोला. उभयतांस:–

खालीं सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं, १५।२० दिवसापूर्वी मला घर बांधण्यास पैशाची जरूरी असल्यामुळें तुह्मी मला १०० रुपये कर्जाऊ देण्याचें कबूल केले व मला स्टांप आणण्यास सांगितल्यावरून भी त्यामानानें ८ आण्याचा स्टांप आणला तो तुह्मी रद्द केला मला रुपयाची जरूरी असल्यामुळें २५।२५ रुपयांच्या दोन प्रामिसरी नोटा लिहून घेऊन २५।२५ असे दोन वेळ मिळून ५० रुपये दिले पुढें मला आणखी ५० रुपयाची जरूरी लागल्यामुळें तुह्मास ह्मटलें असतां तुह्मी ह्मणाले कीं मागील ५० रुपये दे ह्मणजे मग तुला १०० रुपये देईन. त्याप्रमाणें मी लोकाचे कर्ज काढून तुमचे दोन प्रामिसरी नोटाबद्दल ५० रुपये दिले व त्याच्या एकदोन दिवसांनीं रुपये मागितले असतां एक रुपयाचा स्टांप आणण्यास सांगितला त्याप्रमाणें मी एक रुपयाचा स्टांप आणून तुमचे स्वाधीन केला व कागद लिहून द्या व १०० रुपये द्या असें म्हटलें असतां तुम्ही कागद लिहून देऊन रुपये देत नाहीं इतकेंच नाहीं तर माझ्या प्रामिसरी नोटा व दोन स्टांप मागितले असतां तेही देत नाहीं यावरून तुमचे मनांत बेमानकी आहे हे उघड आहे. तर तुह्मी माझा विश्वासघात करूं नये. ही नोटीस पावतांच दोन दिवसांत माझ्या प्रामिसरी नोटा व दोन स्टांप परत करावे असे मुदतींत न केल्यास व मागें पुढें मजबर फिर्याद केल्यास त्याबद्दल जबाबदार मी न राहतां तुह्मी राहाल. म्हणून अगाऊ सूचना केली आहे. कळावे ता. १७।४।०४ इसवी.

[सही.] कोंडु त्रिंगाईत बाणीण राहणार आकोला दस्तुर खुद्द.

नोटीस

बेशमी छगनलाल कन्हैयालाल दुकान कसबे नांदुरा तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणा. यास:–

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तिघे बंधू विभक्त झालों त्यावेळीं तुमचे व आमचे शेअरमध्यें तेलाची दुकान व त्यासंबंधीं असाम्या वगैरे शेअरमध्यें आजपर्यंत आहे. व त्याचे हिशेब वगैरे शेअरच्या वह्यांतच जमाखर्च आहेत व सदरील वह्याही तुमचे जवळच आहेत या दुकानचे असाम्यांपैकीं एका असामीवर तुह्मीं कोर्टात फिर्याद केली आहे त्यांत वादीचे जागीं आमचें नांव दाखल करावयाचें असून तुह्मी केलें नाहीं. यावरून आह्माला संशय आला. तरी आतां ही नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत शेअरच्या वह्या आमचे दुकानीं घेऊन येऊन सर्व हिशेब समजावून देऊन रोखे पुर्जे व असाम्या वगैरे सर्व दुकानेच निमे हिस्से करावे तसें न केल्यास रीतीप्रमाणें मजला तुमचेवर कोर्टांत दावा करावा लागेल व मग या नोटीशीचे खर्चासुद्धां रकम तुमचे जवळून घेतली जाईल. कळावें तारीख १६।४।०४ इ० (सही)

बिसनचंद बुलाखीदास दुकान नांदुरा दस्तुर खुद.

नोटीस

नोटीस बेशमी प्रयागदास शंकरलाल भटड राहणार नांदुरा मलकापूर जिा बुलडाणें यासीः–

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तिघे बंधू विभक्त झालों त्यावेळीं तेलाचे दुकान आह्मी उभयतानी शेअरमध्यें ठेविलीं त्या दुकानच रुपये तुमचे कडे घेणें होते त्याजबद्दलचें गहाणखत करून घेतलें आहे. व त्याचप्रमाणें शेअरचे दुकानांतून पुनः तुह्माला माल देऊन रुजू करून घेतली त्या रुजूवरून फिर्याद दिली. कोर्टांत छगनलाल यांनीं एकट्यांनीं दावा करून तुमचेवर कोर्टांत दावा मिळविला आहे. तरी तुह्मास नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी आमचे उभयतांचे शेअरचे असामी असून जर एकट्याला रुपये द्याल तर याजबद्दल तुह्मी जबाबदार धरले जाल व निमे रुपये तुह्माला द्यावे लागतील. याकरितां आह्मा उभयतांचे पावती शिवाय तुह्मी जर वसूल द्याल तर याजबद्दल जबाबदारी आह्मावर नाहीं. ही नोटीस दिली तारीख १६।४।०४ इ० (सही)

बिसनचंद बुलाखीदास दुकान नांदुरा दस्तुर खुद.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्र मिह विद्यते।

ज्ञानाची हाव ज्ञानाकरितां असली पाहिजे ज्ञानाच्या योगानें जगांतील ग्रंथकारांचा आणि त्यांच्या विचारांचा परिचय करून घेतां येतो, सन्मार्गबोध होऊन अंगीं सत्व गुण येऊं लागतात आणि अखिल सृष्टीचें वैभव कळून तिच्या उत्पन्नकर्त्याविषयीं अथवा तिच्या चालका विषयीं जिज्ञासा उत्पन्न होते; असें ज्ञानाचें वास्तविक महत्व असतां केवळ उपजीविकेचें साधन म्हणून ज्ञान संपादण्या करितां जे विद्यार्थी कॉलेजांत जातात, अथवा जे आईबाप आपल्या मुलास कॉलेजांत पाठवितात त्यांनीं हें लक्ष्यांत ठेवावें कीं, The motive of learning in a college for the purpose of getting in life an honest livelihood is not dishonourable in itself but it is apt to degenerate into a dishonourable motive if that purpose becomes an end in itself. सन्मार्गानें उपजीविका करितां यावी म्हणून कालेजांत शिकण्यास जाण्याचा हेतु धरणें कांहीं निंद्य नव्हे, परंतु हा हेतूच जीवित-सर्वस्व होणें मात्र अश्लाघ्य होय.

स्त्रीशिक्षणाची महती

बायकोला शिक्षण नसल्यामुळें नवऱ्यास मिळालेल्या शिक्षणापासून व्हावा तसा उपयोग करून घेतां येत नाहीं; आणि याच मुळें आमची संसारयात्रा सुखकर न होतां आमच्यांतील अनेक सुधारणांचें गाडें जागच्या जागीं थबकून राहिल्यासारखें झालें आहे. शिक्षणाच्या अभावी आमच्या बायका घरकोंबड्या बनल्या आहेत. हा घरकोंबडेपणा व एकलकोंडेपणा जाऊन त्यांच्या कल्पना उदात्त व्हाव्या, त्यांनीं आपली आणि आपल्या पतीची संसारयात्रा अधिक सुखकर करावी आपली गृहव्यवस्था उत्तम राखून आपल्या मुलाबाळांचें संगोपन उत्कृष्ट रीतीनें करावें. सारांश आपला सांप्रत विषवत जीर्णारण्या प्रमाणें भासणारा संसार खरोखरच अमृतमय आणि नंदनवनासारखा व्हावा असें जर आपणांस वाटत असेल तर आपण स्त्रियांस शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

दुःखाचा उद्वेग—श्रीमंत कै० तात्यासाहेब सांगलीकर यांचे कांहीं कपडे, शालू, जरतारी वस्त्रें वगैरेचा पुणें मुक्कामीं लिलाव झाला! असलीं उंची लिलावाचीं कामें मात्र लौकर व्हावयास पाहिजेत! पूर्वीच्या रहाशतीची आठवण होऊन मन उद्विग्न होतें.

उदार कृत्य— बजुदबाई आबाबाई फरामजी पेटीट यांनीं पारशी जातींतील गरीब लोकांच्या मदतीकरितां आपल्या इस्टेटींपैकीं आठ लक्ष रुपयांची रक्कम वेगळी काढून ठेविली आहे. या रकमेतून गरीब पारशी लोकांस माफक व्याजांत राहतां येईल अशा चाळी बांधण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें निराधार पारशी लोकांस लग्नकार्य प्रसंगीं मदत देण्यांत येणार आहे.

या साध्या चुका सुधरा—

१. जेव्हां शरीराची व मनाची श्रम करण्याची स्थिति नसेल त्या वेळीं श्रम करणें २. जितकें जास्त खाऊं तितके जास्त सशक्त व निरोगी होऊं असें वाटणें. ३. मध्यान्हीला निजून मोठ्या पाहटेस उठणें व जितका झोपेंतून वेळ काढला तितका वेळ मिळविला अशी समजूत करून घेणें. ४. थोड्या व्यायामानें बरें वाटेल असें समजणें. ५ वाच्छा नसतांना खाणें, किंवा पोट भरल्यावर नुसता पदार्थ छान लागतो म्हणून खत बसणें. ६. लहान पोरांना मोठ्या माणसा इतके श्रम होतील व हीं जितकीं पुस्तकांशीं जास्त चमतील तितकीं जास्त शहाणीं होतील असें समजणें.

विजेचा परिणाम — प्रयाग येथें दोन माणसें एके ठिकाणीं बसलीं असतां एकाएकीं विजेचा कडाकडाट होऊन विज त्यांचे जवळ पडली. तिच्या झटक्यासरशी त्यांच्या अंगांतील रक्त थिजून जाऊन त्यांचें चलनवलन बंद झालें व त्यायोगें त्यांना बधिरता प्राप्त झाली. उपचार सुरू आहेत.

काळ्या मनुष्याचें वारें नको—ट्रान्सव्हालात हल्लीं प्लेग सुरू आहे तेथें काळ्या रंगाचे लोकांना रस्त्यांतून गोऱ्यांचे बाजून जाऊं नये असा बंदोबस्त पोलिसानें केला आहे. अशीच खबरदारी पाहिजे!

रविवारचें शिक्षण—इंग्लंडमध्यें शाळांमधून दर रविवारीं धर्मसंबंधीं शिक्षण देण्यांत येतें. पण जर्मनींमध्यें अशी स्थिति नाहीं. तेथें शाळांमधून रविवारीं औद्योगिक शिक्षण देण्याची चाल आहे. या दिवशीं गवंड्याचें काम, जोडे शिवणें, हजामत करणें, पुस्तकें बांधणें, लांकडी सामान तयार करणें वगैरे हरतऱ्हेचीं कलाकौशल्याचीं कामें तिकडे शिकविण्यांत येतात. पण आपल्याकडे काय आहे!

ठेंगू व हलके लोक— सर्व जगांत अंदमान बेटांतील लोक फार खुजे व वजनांत कमी आहेत. त्यांची उंची सरासरीनें पाहतां तीन फूट ११ इंच असते व वजन ७० पौंडांच्या आंत असतें.

मधमाशीची गती—मधमाशीची गति तासाला ४० मैल असते, परंतु ती जेव्हां तोंडांत मध घेऊन आपल्या पोळ्याकडे माघारी जाते त्यावेळीं दर तासाला तिचा वेग १२ मैलापेक्षां अधिक नसतो.

आठ पायाचा घोडा— अमेरिकेमधील सेंट लुईच्या बाजारांत थोड्या दिवसांवर एक आठ पायांचा घोडा विक्रीकरितां उभा करण्यांत आला होता या घोड्याच्या प्रत्येक पायाच्या घोट्यापासून एक एक अधिक पाय फुटलेला होता. तथापि तो धावण्यांत कांहीं कमी नव्हता, बाजारांत त्यास रुपये १२०० पर्यंत मागणी आली होती.

बट्ट दुधाची चमत्कृती— दूध कृतीनें इतकें बट्ट तयार करितां येतें कीं, त्याच्या छत्रीच्या मुठी, चमचे वगैरे जिनस होऊं शकतात. पारीस शहरांत तर म्युनिसिपालिटीच्या एका कंट्राक्टरानें रस्त्यावर बट्ट दुधाची फरसबंदी करून देण्याचें कंत्राट घेतलें होतें असें सांगतात.

रेलवेंत सुधारणा—दरेक पॅसेंजर ट्रेनमध्यें स्त्रियांकरितां इंटरमिडिएट क्लासाचा डबा ठेवण्यात येईल व स्त्रियांची टिकिटें स्त्री टिकिटकलेक्टरांकडून तपासलीं जातील. ही सुधारणा ओंध रोहिलखंड रेलवेनें केली. अशीच इतर रेलवेवरहि झाली पाहिजे.

माफी मागण्याचा प्रसंग येतो काय!—डा० पोलन यांनीं सन १८७७ सालीं सरकारचे हुकुमावरून कै० न्या० रानडे यांचीं पत्रें फोडिलीं असें ना० गोखले यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं एका व्याख्यानांत सांगितलें होतें या संबंधांत उभयतांत बराच पत्रव्यवहार झाला असून ना० गोखलें यांनीं खंबीर पुराव्या अभावीं आपल्या विधानाबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावीं असें डा० पोलन यांनीं टाइम्स ऑफ इंडिया पत्रांत लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे.

मार्मिक उत्तर—जपानी सरदार मार्किस इटो म्हणतो कीं:—जपानांत व पाश्चात्य देशांत एक मोठा फरक आहे. जपानी मनुष्य लग्न करतो तेव्हां बायको ही त्याच्या गृहव्यवस्थेवर व चाकरावर देखरेख करणारी होते. पण तुझी युरोपियन लग्न करतो तेव्हां बायकोचें चाकर होतो.

वाघाशीं कुस्ती— पंधरा दिवसांखालीं चेंगमारी स्टेशन जवळील रेलवेचे खलाशी सकाळीं काम करीत असतां एक वाघ रेलवे ओलांडून जात असतांना दिसला. एकानें त्याला दगड मारिले लागलीच तो वाघ त्याच्यावर तुटून पडला. जीवावरचा प्रसंग आहे असें जाणून त्यानें त्या वाघास आपल्या अंगांत होती नव्हती तितक्या शक्तीनें गच्च आवळून धरिलें. दुसऱ्या खलाशांनींहि आपल्या हातांतील टिकास फावड्यांनीं त्या वाघास मारण्याची सुरवात केली. याच सुमारास एक गाडी तेथें आली. ड्रायव्हरनें गाडी थांबविली व गाडींतल्या लोकांनीं त्या वाघास ठार करून मृत्यूच्या तोंडांतून त्या मनुष्यास ओढिलें.

× × ×

एक— या रेलवेला आपण कंटाळलो बुवा! असें पुटपुटत त्यानें कपेरींत पाय ठेविला. त्या वेळीं त्यास १ तास उशीर झाला होता.

दुसरा— कां ट्रेन लेट होती वाटतें!

एक— छे, असें नाहीं. या ६ महिन्यांत आजच कायती वेळेवर आली आणि म्हणूनच माझी गाडी चुकली.

÷ ÷ ÷

एक— मनुष्य जो पोषाख करितो त्या वरून तो कोणत्या स्थितींत असावा असें अनुमान मी कधीं करीत नाहीं.

दुसरा— पण त्याच्या बायकोच्या पोषाखावरून हें अनुमान काढण्यापेक्षां त्याच्याच पोषाखावरून अनुमान ठरविणें जास्त बरें!

योग्य शिक्षा— व्हाइसराय साहेब हे परशिअन अखातांत गेले होते तेव्हां त्यांस स्वागतपूर्वक भेटण्यासाठीं त्यांच्या तावीं जवळ फार्सचें गव्हरनर जनरल गेले नव्हते म्हणून त्यांस बडतर्फ करण्यांत आलें आहे अशी तार आली आहे. राजपुरुषाचा योग्य मान ठेविला नाहीं म्हणून ही झालेली शिक्षा योग्य होय.

भयंकर उष्ण देश— पृथ्वीच्या पाठीवर अत्यंत उष्ण प्रदेश म्हणजे परशिअन अखातांतील आब्हल बेटें होत. ह्यांत बाहरेन बेटामध्यें अगदीं कमींत कमी उष्णता म्हणजे ९९ डिग्री असते. जुलै, आगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांत तर असह्य उष्मा होतो. मध्यरात्रींच्या सुमारास १०० डिग्रीवर पारा येतो. प्रातःकाळीं ७ च्या सुमारास १०७ डिग्री पारा असून दुपारीं २ चे सुमारास १४० पर्यंत चढतो. कोण उष्णता ही!

गोळी घालण्याची लहर—लोट झॅकी नांवाचा एक सरदार व्हीएनांत आहे. तो परवां पुष्कळ लोकांच्या जमावा बरोबर जात असतां त्यास एकदम हुक्की आली व त्यानें जवळून एक स्त्री जात होती तिजवर एकदम ५ गोळ्या झाडून तिला जायबंदी केलें. त्या सरदारास पकडलें आहे. त्या स्त्रीचा व याचा अर्थाअर्थीं कांहीं एक संबंध नाहीं. तो सरदार पूर्वी फार गरीब स्थितींतला होता, व अलीकडे वैरागी व्हावें असा त्याचा बेत होता. पण त्याचा विचार फिरला व त्यानें कायद्याचा अभ्यास केला. पुढें त्यास त्याच्या चुलत्याची पुष्कळ दौलत मिळाली, आणि आतां त्यास ही एकदम वेडाची लहर आली. मनुष्यास केव्हां काय होईल कांहीं नेम नाहीं.

अंगांत पाणी पाहिजे—परवां अमृतसर येथील हर मंदिरांत एका साहेबाचा बुडासकट आंत जाण्याचा विचार होता. त्यास बरोबर एक युरोपियन बाईहि होती. दरवाजांत बूट काढले पाहिजेत असें सांगतांच त्यानें आपले बूट काढले पण त्या बाईचे काढण्या संबंधानें इनकार केला. पुढें तेथें पुष्कळ लोक जमले व त्यांनीं निक्षून सांगितलें कीं, जर तुझी जोडा न काढता जाल तर काय होईल न होईल याचा विचार करा. ही झणझणीत मात्रा पोहोंचतांच तात्काळ जोडे काढण्यांत आले. तात्पर्य, कोठेंही रडवेपणा कामाचा नाहीं.

चमत्कारिक चाल— कोरियांतील स्त्रियांना स्वतंत्र नामाभिधान नाहीं. त्या मनुष्याच्या नांवावर मोडल्या जातात. अमक्याची बायको, आई, बहीण, हींच त्यांचीं नांवें. पण त्यांस एक विशेष हक्क आहे. रात्रींचा आठाचा ठोका पडला कीं कोणाहि पुरुषास घरा बाहेर जातां येत नाहीं. पण स्त्रियांनीं रात्रीं १ वाजे पर्यंत खुशाल फिरावें.

(१२ व्या अंकावरून पुढें.)

चिकण मातीची सुधारणा

वरील गुणदोषावरून असें दिसून येईल कीं निवळ चिकण मातीच्या जमिनीपासून कित्येक फायदे आहेत व कित्येक तोटे आहेत या जमिनींत जितका चिकण मातीचा अंश असेल त्या मानानें तोटे अधिकाधिक आहेत, म्हणून या जमिनींत वाळू व चिकण माती समसमान अपणें अगदीं जरूर आहे. अति चिकण मातीची सुधारणा खालीं लिहिल्या प्रमाणें करावी.

(१) रेती मिसळून— दर एकरी ४०।९० गाड्या रेती सर्व शेतभर सारखी पसरावी व नांगरून सर्व जमिनींत मिसळून टाकावी.

(२) चुना घालून— जमीनीच्या इष्ट भागावर १००० ते २००० पर्यंत मद्रासी मापें चुन्याचें पीठ पसरावें.

(३) मातीचा थर खरडून त्याचे चार पांच ठिकाणीं ढीग करावे व बाहेर पानें, काड्या कचरा व गवळ सांपडेल ते टाकावें व त्यास आग लावून सर्व माती हलके हलकें भाजून काढावी व नंतर ती सर्व शेतभर पसरून नांगरावें जमीनींत मिसळून टाकावी.

(४) शेतांत अर्धे मुर्धे कुजलेलें किंवा अगदीं ताजें (चिन सडलेलें) खत घालावें.

(५) तिजवर वाढणारीं रान झाडें किंवा रान हिरवें असतांना नांगरून किंवा शेतांत हरभरा पेरून तो फुलोऱ्यांत आला म्हणजे नांगरून टाकावा. या कृतीस बीवड करणें असें म्हणतात.

(६) जमीनीच्या पोटांतून पाण्याचा पाट काढून टाकावा.

रेताड जमीनीचे गुण दोष— रेताड जमीनी चिकण मातीच्या जमीनीच्या अगदीं उलट आहेत. ज्या बाबतींत चिकण जमिनी वाईट असतात त्या बाबतींत रेताड जमिनी चांगल्या असतात व जे त्यांचे गुण ते रेताड जमिनीच्या ठिकाणीं दोष होतात. नांगर बैरें वाहतुकीच्या आउतास त्या चिकटत नाहींत म्हणून त्यांना मोकळ्या जमिनी म्हणतात. व त्या मोकळ्या असल्या मुळें आउतें ओढल्यास जड जात नाहीं म्हणून त्यांस हलक्या जमिनी अशी संज्ञा आहे. त्यावरील पाणी जमिनीवर सांचून न राहतां मुदत लवकर नाहींसें होतें—म्हणून त्यास उघड्या जमिनी म्हणतात त्यांच्या तील ओलावा, खत हीं लवकर होतात व त्यांत वनस्पतिपोषक द्रव्यें ही कमी असतात म्हणून त्यांना रखरखीत असें म्हणतात निव्वळ रेती कठीण व कचकचीत असते व ती किती जरी भिजविली तरी तिचा चिक विली तरी तिचा चिकणमाती सारखा गोळा बनत नाहीं. रेताड जमिनीचीं सर्व चिन्हें चिकण मातीच्या उलट आहेत. त्यांची दुरुस्ती करावयाची असल्यास खालील उपायांची योजना करावी.

(१) त्यांत चिकण माती मिसळावी.
(२) चांगलें कुजलेलें शेणखत्याचें खत घालावें.
(३) शेतांत बिबूड करावें.
(४) आपल्या मुळांनीं घट्ट धरून ठेवणाऱ्या झाडांचीं लागवड करावी.
(५) नदीच्या प्रवाहा बरोबर वाहत येणाऱ्या कवटा जमिनीची भर घालावी.

—०—

सूचना— रत्नांचा व्यापार करणारांचे अंगीं तीन गुण अवश्य पाहिजेत. ऐट, हिंमत व प्रमाण. ऐट म्हणजे करारीपणा. हिंमत म्हणजे धैर्य. " दगडाचा व्यापार करण्यास छाती दगडाचीच पाहिजे. " आणि प्रमाण म्हणजे एक वचन. रत्नांचा व्यापारी मनुष्य रत्नच पाहिजे, त्याला आयत नसावा, असल्यास सज्जनसंगतीनें घामून काढावेत. वरील त्रैगुण्याची जोड सर्वच व्यापारी वर्गानें मिळवावी म्हणून आह्मी मुद्दाम सूचवीत आहों.

तिबेट मोहिमीवर गेलेल्या लोकांचे बर्फ व थंडी यामुळें अत्यंत हाल होत आहेत. शस्त्रप्रहाराप्रमाणें तें बर्फ लोकांस कांपतें असें म्हणतात. या नादाला लागल्या पासून किती तरी द्रव्य गमावलें, व किती तरी मनुष्य हानी झाली ! या मिशनाचा दररोजचा खर्च ३० हजार रुपये आहे. व हा सर्व हिंदुस्थानासच द्यावा लागणार आहे ! तिबेटचे लोकांची व व इंग्रजांची एक चकमकहि झाली व त्यांत इंग्रजांचा जय झाला. तिबेटी लोकांत कांहीं विशेषशी कुवत दिसत नाहीं पण या जयामुळें रशियास चीड येईल म्हणतात. कांहींही असो, इंग्रज लोक पक्के हिंमतवान व दृढ निश्चयी खरे ! कारण दुसरा एखादा असतां तर त्यानें केव्हांच हातपाय गाळले असते. तिबेटवर स्वारी करावयाचीच म्हणून जो एक कृतसंकल्प केला तो पुरा शेवटास नेल्याखेरीज स्वस्थ राहावयाचेंच नाहीं. हा दृढनिश्चयाचा धडा सर्वांनीं अगदीं तोंडपाठ करावा.

नोटीस

दामु बल्लद लक्ष्मण माळी जाधव वस्ती खेडें बुनरूक तालुके जळगांव यांसः—

मी खालीं सही करणार याजकडून असे कळविले जात आहे कीं मौजे मजकूर येथील शेत सर्व्हे नंबर १४३ चे मी तुमची आई रेऊबाई इजपासून रुपये ३०० यास खरेदी ८३४७ चा हिसा तारीख १८।१।१९०१ इसवी रोजीं घेतला असून माझे ताब्यांत होता पुढें तो हिसा तुम्ही मजपासून रुपये ४०० मास डिसेंबर सन १९०२ इसवी रोजीं खरेदी घेऊन रुपये मागाहून देईन असे कबूल करून मजला पत्र लिहून दिलें आहे व पुढें तुम्ही गोविंद पुरुषोत्तम याजपासून रुपये १०० कर्जाऊ घेऊन जाऊन मजला जमानत दिली आहे एकूण रुपये ५०० तुमचे कडेस आमचे घेणे आहेत ते सर्व रुपये, मळा मारवाडी यास रुपये १२०० यास विकून रजीष्टर समोर आमचे रुपये सर्व देतो असे बल्लद १६।२।०३ चें पत्र पाठविलें आहे आतां तुमचा आमचा सोयरे संबंध असले कारणानीं या सर्व गोष्टी घडून आल्या आहेत हल्लीं तुमची नियत बदली असून तुम्ही आमची रकम बुडवावी या हेतूनें बदलेल गोष्टी परस्परे करीत असून पातुर्दे मुक्तमीं समक्ष लेख दाखवा असे बोलला आहा. सबब या नोटीसी वरून असे कळविले जाते कीं नोटीस पावल्यापासून १९ दिवसाचे आंत रकम द्यावी नाहीं तर पुढें तुमचेवर दावा केला जाईल. कळावें. तारीख ११।४।१९०४ इसवी.

सही
विठु बल्लद रामजी माळी खेडें
बुनरूक दस्तुर सुद.

जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, मौजे खेडें बुा. यथील दामु बल्लद लक्ष्मण माळी जाधव याचे कन्येशी व आमचे मुलाशी शरीर संबंध होण्याचा नेम पक्का होऊन आमचे जाती धर्मा प्रमाणें आगोदर सोयरीक गुरस्त साली होऊन गेली आहे व आमचे घरचे मुलीचे आंगावर सोन्याचांदीचे दागिने रुपये ३०० चे मुलीच आंगावर घातले आहेत व या शिवाय कपडालत्ता रुपये १०० चा मुलीस वाहीलीं असुन अन्नखर्च रुपये १०० चा झाला आहे असें एकंदर रुपये ५०० शे आमचा खर्च होऊन गेला असून पुढें लग्नप्रसंग होण्याचा राहिला आहे हल्लीं सदर्हू दामु जाधव हा दुसरे लोकांस असे सांगतो कीं आमची सोयरीक तुटली असून माझे मुलीस दुसरे ठिकाणीं देण्याची आहे असे आह्मांस परस्परे समजले आहे करितां या लेखावरून असे कळविले जात आहे कीं आपले जातीचे सर्व लोकांनीं असें समजावें कीं, आमची सोयरीक तुटली नसून आह्मी लग्न करणार आहा सबब कोणी त्याचे भूलथापीवर त्याचें मुलीं बरोबर विवाह करूं नये जर कोणी त्याच मुलीबरोबर लग्न केले तर त्याजपासून आमचा झालेला खर्च वर लिहिलेल्या प्रमाणें भरून घेतला जाईल, कळावे, ता० १०।४।०४ इ०

सही.
विठु बल्लद रामजी माळी
खेडें बुनरूक.

नोटीस

रा. रा. शंकर सदाशिव माहाजन ब्राह्मण राहणार आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे तांदुळवाडी ता० आकोट येथील सर्व्हे नंबर २४ पैकीं येकर ९ गुंठे ३४ आकार रुपये १२ ८४ हे तुम्ही मवान्या बल्लद रामा माहार राहणार तांदुळवाडी याजपासून गहाण लिहून घेऊन हुकूमनामा मिळवून घेऊन आपले ताब्यांस गहाणाची रकम देतांवेतों व्याजाऐवजीं शेत सारा देऊन वाहून पीक खाण्यास घेतलें आहे ते शेत मी तुमच्या ऋणकाचे भऊ सखाराम, रामऱ्या, व श्यामा बल्लद रामा याजपासून खरेदी ता ३ माहे आगष्ट सन १९०४ इ० रोजी खरेदी घेतले आहे तर नोटीसीनें तुम्हांस कळविण्यांत येतें कीं तुम्ही ही नोटीस पावल्यापासून गहाणाची रकम तुमची जी निघेल ती मजपासून घेऊन शेत दुजे गहाणाचा हक्क सोडून देऊन तावा मजला द्यावा. तुमची गहाणाची रकम रुपये १९० मी शंकरलाल नरसींगदास मालक सीवनारायण दुकान आकोट याचे येथे घरवर तुम्हांस देण्याकरितां ठेविली आहे ती घेऊन जावी व शेत नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत रुपये ठेवलेली घरवर घेऊन जाऊन शेत माझे ताब्यात देणें याप्रमाणें न केल्यास तुमचेवर वरील शेत ताब्यांत घेण्याबद्दल दिवाणींत नालीश करून शेताचा तावा कोर्ट खर्च व नोटीशीचा खर्च भरून घेतले जाईल. ता० १५ माहे एप्रील १९०४

सही
पांडुरंग अवाजी गावंडे राहणार
तांदुळवाडी द. पु.

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी सुरलेले विकार, मूत्रसं, कोंड, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातीतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घ्यावें अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेतलीस टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत रु० ।६ आणे पडेल. अनुपान खर्ड सोबत घेतलेनें किंवा व्ही. पी. नें खालील भावावर मिळतील. दर: —

३६ गो०	१ रु०	७६ गो०	२ रु०
११६ गो०	३ रु०	१६६ गो०	४ रु०
२७३ गो०	६ रु०	५५० गो०	१० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा कॅटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलिकडे २।३। वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनी आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यानीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

ORIENTAL

GOVERNMENT SECURITY

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.

Established 1874,

Head Office—**BOMBAY**

Chief Agency for C. P. Berar & Khandesh

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED

TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay, in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
for C. P. Berar and, Khandesh

मुंबई बँकचीं सेविंग्स बँक

या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

थी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

केल

जाहिरात

कोडावर खात्रीचें औषध

हटकून गुण दोस २ रुपये.

व्ही. एम जोशी
पंढरिस टाऊन नजीक उमरावती
प्रांत वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

आकाऱ्यातील अंकास.....१ रु.
बाहेरगावी टपालखर्चासह..... २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....२ आणे
नमुनेशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.....१ ०६
दुसरे खेपेस.....१

वऱ्हाडसमाचार.

Town ... ... 1 Rs.
Mofussil ... ... 2 (With postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ..... 2 as

Advertisement
below 10 lines ..... 2 Rs
Per line over 10 ..... 2 as
Repetitions Per line „ 2 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 25 APRIL 1904 NO 16

वर्ष ३८ आकाला सोमवार तारीख २५ माहे एप्रिल सन १९०४ इ० अंक १६

वर्षी स रुपये २५
(दरवलेल्या नोटाबद्दल)

सर्व लोकांस या जाहीर खबरेनें मी कळवितों कीं, आठ दहा दिवसा पूर्वी मी खामगांवास माल घेण्याकरितां गेलों असतां तेथें बाजारांत माझ्या जवळच्या दोन नोटा हरवल्या. नोटाचे नंबर असे आहेत:—

नंबर	रुपये
५५०२५	१००
४४७७३	१००

अशा दोन नोटा दोनशें रुपये किंमतेच्या मजकडून हरवल्या गेल्या आहेत. सदरी त्या कोणाला सांपडल्या असल्यास त्यांनें त्या आम्हाला परत द्यावयात. आम्ही त्याजबद्दल त्यास पंचवीस रुपये इनाम देऊं. कळावें. तारीख १८।४।०४ इ०

सही
छगनलाल लछमनदास श्रावणी
राहणार जामोद.

नोटिशीचें उत्तर

तुळसी मर्द बळीराम पाटील राहणार बडनेर गंगाई पा. व ता. दर्यापूर हीस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, तूं माझी गंधर्वाची स्त्री आहेस. तूं माझें न ऐकतां आपल्या बहिणीच्या घरीं जाऊन राहिली आहेस. तूं दुसऱ्याच्या फंदानें वागेल तशी वागणेस हें बरें नाहीं. मी तुला वागविण्यास तयार आहे व तुला फारशी मुळींच देत नाहीं. तूं आज दोन वर्षें होत आलीं तरी शुद्धीवर आली नाहींस इतकेंच नाहीं तर उलट मजवर तारीख ७ च्या शुद्धबऱ्हाडी पत्रांतून मी मारहाण करितों वगैरे मजकराची खोटीच नोटीसहि दिली आहेस. तर आतां कळवितों कीं ही नोटीस पोचल्या पासून चार दिवसांत अंगावरील दागदागिन्यासह माझ्या घरीं यावें. तूं मला न विचारतां जाऊन बर्ज काढशें असल्यास त्याबद्दल मी बिलकुल जबाबदार नाहीं. येणेंप्रमाणें न केल्यास कोर्ट मार्फत तुला तऱ्हात घेतलें जाईल. व तुला फंद देणाराला हि फौजदारी कायद्यात घेईल. हें पक्कें ध्यानांत ठेवावें. कळावें. तारीख १७।४।०४ इ०

सही
बळीराम बल्लद लक्ष्मण पाटील
राहणार घुसर दस्तुर खुद्द

नोटीस

रा. रा. सुजानखा व तुराबखा मानुखा अज्ञान पालन करणार आई वजीरबी मर्द बिसमिल्लाखा व मस्तानखा व. मुरादखा मुसलमान राहणार पथरी यांस:—

खालीं सही करणार इसम कडून या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुराबखा व मुस्तानखा यांचे तारीख १०-३-८९५ इसवी रोजीं मरण पावले असून यांना तीन पुत्र व तीन मुली होत्या. मुस्तानखा सुजातखा हल्लीं जिवंत आहे व अणखी दोन मुलें मरण पावलीं त्यांचे मुलगे मानुखा व मस्तखा हे जिवंत आहेत त्याच्या मुलांपैकीं मी सर्वांत धाकटी मुलगी आहे असल्ल मुसलमानी धर्म शास्त्रा प्रमाणें तुराबखा बल्लद मुस्तानखा यांच्या सालीम जिनगीच्या तिसऱ्या हिशांतील तिसरा हिस्सा माझे मालकीचा आहे तो तुमी मजला ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत माझ्या ताब्यांत देऊन माझे पासून पावती घ्यावी असें न केल्यास मला योग्य रितीनें सदहू जिनगी मुलांपासून घेणें भाग पडेल आणि नोटिसीच्या खर्चा सुद्धां इतर खर्च तुमचा पासून भरून घेतला जाईल. मला समजली आहे त्यापैकी मुख्य मुख्य जिनगीचा तपशील:—

जनावरें बैल वगैरे अजमास किंमत रुपये २००.

धान्य जवारी खंडी ४० दर २५ प्रमाणें किंमत रुपये १०००

डागिना सोनेचांदी मिळून अजमास किंमत रुपये २०००.

नगदी रोकड १०००

२ घरें

१ घर धारे माजघर खांब २४, ओसरी खांब १८, पाग खांब २४ घराचे मागें खांब १२ चारी दिशाच्या दिवालीच्या अतीत जागा पूर्व पश्चिम अजमास हात १००, द० उ० अजमास हात ५०,

२ घर, घोडनाटाचे कवेलु पुढें छारी ओसरी व पढें खांबण चारी मातीच्या दिवाली सुद्धां पू० प० हात २० अजमास द० उ० हात १५ अजमास.

पथरी प्रगणे अडगांव तालुके आकोट येथील सर्वे नंबर येणें प्रमाणें:—

सर्वे नं.	एकर	आकार
१८६ पैकी	४४३६	१२०४ सालीम.
१९२	३१०२	६६ सालीम.
१९३	२५४२८	५२ सालीम.
२५० पैकी	६०३२	१५ सालीम.
२३८	१६०३३	३८ सालीम.
२७९	८४२५	१९ सालीम.

टाकळी प्रगणे अडगांव ता० आकोट.

२	८०५	१६८१२

यांतील ½ हिस्सा.

२७	१३४३७	३१ सालीम.

सर्वे नंबर १८६ पैकी यांत आंब्याची झाडें १२ आहेत नंबर १९२।१९३ यांत आंब्याची झाडें लहान मोठी ४४ आहेत.

सदहू जिनगी आणि या शिवाय इतर राहिलेली जिनगी, या पैकी माझा हिस्सा मला देऊन टाकावा. कळावें, ता० २०।४।०४ इ०

सही.
बाहेर बी मर्द अबदुल गफूर
मुसलमान निशानी खुद्द
दस्तुर लक्ष्मण बाजीराव
पटवारी.

नोटीस

बेशमी (१) झामसिंग चीफ साहेब राहणार खामगांव
(२) मिराजी बल्लद रामजी पाटील
(३) भगु बल्लद खानाजी पाटील
(४) नथू बल्लद निंबाजी पाटील
(५) भोनाजी भारती गांवंडे
(६) गोंडी मिराजी पाटील.

सर्वजण राहणार पिपराळें ता. खामगांव.
यांस:—

खालीं सही करणार इसम कडून या जाहीर लेखानें कळविण्यात येतें कीं तुम्ही सर्वांनीं मिळून कांहीं खोटे बनावटी स्टांप कागद मजजवळ खामगांवच्या बाजाराला मी आलें असतां विकून आणून सही करा असें म्हणू लागला तऱ्हां मी लागलीच इनकार केला आणि घरीं परत चालती झाली. त्या नंतर मंगळवारीं राजश्री झामसिंग हे माझ्या गांवीं येऊन मला धमकी देऊन म्हणें कीं खरेदी खत नोंदून दे, तेव्हां तुमी पांचजण येऊन गर्दी करूं लागला. खरेदीचे कागद खोटे आहेत व मी ते नोंदून देणार नाहींच. त्या कागदावरून माझ्या इस्टेटीवर तुमचा कोणताच हक्क चालणार नाहीं. ते खरेदीचे कागद गुण्या गोविंदानें परत करावे; नाहींतर तुमचा फौजदारी करून तुमचा कोर्टांत जबाब घेतला जाईल. कदाचित मला अशीहि भिती वाटते कीं तुमी दुसरीच बई उभी करून खरेदीचे कागद माझ्या नांवानें नोंदून घ्याल. अशासाठीं मी नोंदणी कचेरीवाल्ही पूर्वीच दरखास्त देऊन ठेवितें. अशी खोट्या कागदाच्या जोरावर तुमी तुमच्या मेहुणीच्या रितीप्रमाणें दांडगाई कराल व माझ्या शेतीवाडीवर जबरी व मारामारी कराल तर तुमची चांगली खोडकी मोडीन हें पक्कें लक्षांत ठेवावें. या नोटिशीचा खर्च तुमचावर पडेल कळावें. तारीख २० एप्रील १९०४ इ०

सही
लक्ष्मी मर्द गणपती पाटील राहणार
पिपराळे तालुके खामगांव
हिचे हातची बांगडी.

नोटिस

बेशमी 'घी बरार जिनिंग कंपनी' मुक्काम आकोट यास:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, मी तुमचे जिनांत खरेदी करून कापूस घेतला आंच कडुस माझे घरचा कापूस गाड्या ६ त्यांत कापूस खंडी ९ किंमत रुपये ५१० असून बाकीचे तक्त्याचा कापूस दोन चारदा घेतला. परंतु कध्यांतरी तुमी मइया मागे मला न विचारतां मइया नांवानें कापूस घेतला व तो मइया नांवाच्या पुर्वीच्या गंजीतच मिळून दिलात. आणि त्या कापसाचे जीन करून तुमी तो मइया मागेंच विकूनहि टाकला. सबब मी कळवितों कीं, मइया मागें झालेल्या कापसाच्या सबबीच्या नफ्या तोट्याचा मी बिलकुल जबाबदार नाहीं. माझ्या हातच्या तऱ्हपल्या आहेत तितक्याच्याच नफा नुकसानीचा मी जबाबदार आहे. माझ्या हातच्या व्यवहाराचा व मइया घरच्या कापसाचा सर्व हिशाब देऊन सर्व व्यवहाराचा निकाल करावा. येणें प्रमाणें ८ दिवसांत न केल्यास कोर्ट मार्फत व्यवस्था करावी लागेल व अखेर निकाला पर्यंतचा सर्व खर्च आपणांवर बसल म्हणून अगाऊ कळवीत आहे. कळावें. तारीख २० एप्रिल १९०४

सही (मारवाडींत)
अमोलकचंद खेतसीदास साहू
दुकान उमरी तालुके दर्यापूर,
पोस्ट— बडनेर गंगाई.

नोटिस

बेशमी तुकाराम जानबा झिरमिरे राहणार पातुर ता० बाळापूर. यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, आम्ही तुमचे पासून ३०० रुपये कर्जाऊ घेऊन तारीख ३ मे १९०३ रोजीं तबेगहाणखताचा दस्तैवज करून ता. ११ मे ला तो रजिष्टर करून दिला. व तुम्हांत मरणा पावल्याची पावती दिली असून कबुलायतहि ५४ रुपये सालाची करून दिली आहे. वरील ३०० रुपयांपैकीं तुम्ही १५० रुपये रोख दिले. व बाकीचे १५० आमच्या मुलाचे लग्न करण्याकरितां तुमचे दुकानावर दिल्लक ठेविले. तुम्हांस ही रकम मी एक महिन्यापूर्वी मागितली असतां तुम्ही दिली नाहीं. यामुळें नाईलाज होऊन आम्ही आपल्या मालकीचा हुकुमनामा तुमचेपाशी गहाण दिलेल्याची नुकसानीनें ५०० रुपयांस विक्री केली आहे तुमचे १५० रुपये व त्याचे व्याज मिळून १७७ रुपये तुम्हांस ता० १३ एप्रिल १९०४ रोजीं देत असतां तुम्ही घेतले नाहीं सबब ते रा० रा० बापू शामराव कुळकर्णी पातुर यांजपाशीं घरवर ठेविले आहेत. आमचा दस्तैवज त्यास परत देऊन ती रक्कम घेऊन जावी. आपले रकमेचे तारीख १३ पासून व्याज बंद झालें आहे. कळावें तारीख २२।४।०४ इसवी.

सही
केवलसिंग उमरावसिंग राहणार
पातूर दस्तुर खुद्द.

REGISTERED No. N 4

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १० शके १८२६

उत्पन्न वरील कर.

या कराची आकारणी चारूं महिन्या पासून अंमलांत आली आहे. सरकारी चाकर असतात त्यांच्या पगारावर दरमहाच्या दरमहा या कराची आकारणी होत असते परंतु बाकीच्या धंद्यांतील लोकांस हा कर वरवर्षीच्या दरवर्षी द्यावा लागणार आहे. येदाचें वर्ष या कराच्या आकारणीला पहिलेंच असल्यामुळें सध्यां नांवनिशीवार याद्या तयार करण्याचें काम चालूं आहे. या याद्या पुऱ्या झाल्या नंतर हा कर वसूल करण्यांत येईल. हा कर फार जबर आहे आमच्या प्रांताला हा नवीन असल्यामुळें तो मोठा जुलुमाचा वाटतो. हा कर झेंपण्यासारखा नाहीं असे लोकांच्या तोंडून उद्गार निघतात. आमच्या प्रांताची समजूत सरकारानें इतर प्रांताचा दाखला देऊन करण्याचा प्रयत्न केला तरी देखील हा कर तिकडेच त्रासदायक व लोकांस नकोसा झाला आहे; आणि जेव्हां कर कमी करण्याची पाळी आली तेव्हां हा कर बसविण्याची यत्ता ५०० रुपयांची होती ती हजारावर आणून बसविली आहे. ह्मणजे हा कर दरसालच्या १ हजार पर्यंतच्या उत्पन्नावर आकारण्यांत येणार नाहीं. हा कर हर रुपया मागें ५ पै प्रमाणें आकारला जातो आणि हा आकार इतर सर्व करांपेक्षां फार जबरदस्त आहे. आमच्या प्रांतांतील लोकांनीं आजपर्यंत पुष्कळ तऱ्हेचे कर दिले पण त्यांना एवढा हा बादशाही जबर कर देण्याचें ठाऊकच नाहीं. धंदेवाल्या मुख्यवस्तु लोकांवर हा कर पडतो हें खरें, तथापि हा कर देण्यापूर्वी प्रत्येकजण पुष्कळ हळहळ करील. हाच कर काय पण आणखीहि दुसरा एखादा कर दर रुपया मागें १२ पै आकारण्यांत आला तरीहि तो लोकांकडून वसूल केला जाईल व लोकांनाहि तो रडत कुढत कसा तरी द्यावा लागेल.

लोकांचे आक्षेप.

या कराबद्दल आमच्या प्रांतासंबंधानें हा पहिला मोठा आक्षेप आहे कीं, हा कर बसविण्याची आवश्यकताच लोकदृष्टीनें दिसत नाहीं. राज्यव्यवस्थेच्या खर्चासाठीं हा कर बसविण्याची गरज नाहीं. पूर्वीच्या अमानी अमदानींतच राज्यकारभाराचा व लष्करी खर्च भागून त्या शिवाय निजाम सरकाराला सालीना १६ पासून २५ लक्ष रुपयांची रकम देतां येत असे. त्या वेळचा खर्च फार उघळे असून ह्मणून हा मुलुख ब्रिटिश मध्यप्रांतांत सामील करण्यांत आला. पूर्वीच्या अवाढव्य खर्चावर चोहोंकडून काटकसरीची कात्री चालविल्या नंतर आणि सर्व खर्चवेच बेताबातांत आणिल्या नंतर तर आम्हांला या नव्या कराचें प्रयोजनच दिसत नाहीं. त्या शिवाय नवीन धाऱ्या प्रमाणें सरकारी उत्पन्न लक्षावधी रुपयांनीं वाढलें आहे हीहि गोष्ट या प्रसंगीं ध्यानांत धरण्यासारखी आहे. इतर प्रांतामध्यें हा कर प्रचलित आहे ह्मणून साम्यतेच्याच तत्वावर हा कर बसवावयाचा असेल तर ही अहेतुक साम्यताच इनकमटॅक्स सारख्या कराला मोठी बाधक असें आम्ही समजतों. इंडिया देश हा एवढा मोठा प्रचंड आहे कीं, येथें सर्वत्र साम्यता ठेवण्याची गोष्टच संभवत नाहीं, तेव्हां ह्या शोभेच्या साम्यतेसाठीं वऱ्हाडच्या लोकांवर हा नवीन कराचा बोजा लादावा हें युक्तीलाहि पसंत दिसत नाहीं. शिवाय दुसरी एक राजिक गोष्ट या कराला मोठी बाधक होत आहे. या प्रांतांतील लोकसमूहाला निजाम सरकारची प्रजा असें मानतात. हा प्रांत कांहीं ब्रिटिश मुलूख नव्हे. तेव्हां ब्रिटिश मुलुखालाच लागूं असणारा उत्पन्नावरील बादशाही कर या प्रांताला लागूंच करितां येत नाहीं असा एक तात्विक विचार पुष्कळ दिवसांचा व सर्वमान्य ठरला आहे. या विचाराच्या दृष्टीनेंच इतकीं वर्षें हा कर या प्रांतांत बसविण्यांत आला नाहीं. आणि सध्यां हा मुलूख राज्यकारभाराच्या सोयी साठीं ब्रिटिश मुलुखाला सामील करण्यांत आला आहे. तथापि कौलपट्ट्याच्या आधारें पाहतां हा निजामशाहींतला मुलूख होय. इनकमटॅक्सच्या कायद्या अन्वयें निजाम सरकारच्या मुलुखावर तो कर बसवितांच येत नाहीं. हल्लीं राज्य कारभाराच्या सोयी साठीं हा कर बसविण्यांत येत आहे असें जें कारण पुढें मांडण्यांत येतें त्या कारणाची शहानिशा केली असतांना हा कर बसविण्याची सरकारची मर्जी आहे आणि ही मर्जी लोकांच्या माहिती साठीं ह्मणून प्रसिद्ध करण्यांत आली आहे असा इत्यर्थ निघतो राजिक कारणामध्यें सरकारची मर्जी हें एक मोठें जबरदस्त कारण असतें आणि त्याचे विषयीं भ्रवति नभ्रवति करण्याचा अधिकार प्रजेस नाहीं असें त्याचें धोरण असतें. असलें हें राजिक कारण ह्मणजे लोकांच्या तोंडाला एक थोरलें कुलूपच होय. अद्याप हा कर बसविण्यांत राजिक कारण आहे असें सरकारांतून बोलून दाखविण्यांत आलें नाहीं- आणि ह्मणूनच हा वादविवाद आम्ही केलेला आहे. सरकारी रीत लोक मताला फारशी भीक घालण्याची नसतेच आणि तशांत ही कराची बाब ह्मणजे गोल्या उत्पन्नाची बाब आहे तेव्हां हा प्रतिकूल वाद सरकारच्या मनाला पसंत पडेल असें आम्हांसाहि वाटत नाहीं. कर्तव्याविषयीं जागरूकता ठेवून आम्ही लोकमताच्या म्हणण्याचा सारांश वर दिलेला आहे आणि ' यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ' अशाच समाधानाच्या यष्टीचा अवलंब करावा लागेल हें आम्ही ओळखून आहों.

मागेंच आम्ही या करा संबंधानें एक दोन वेळां आक्षेप घेतले आहेत आणि ठिकठिकाणीं जाहिरसभा भरवून या करा विरुद्ध सरकाराकडे अर्ज करावा व वरिष्ट सरकारापर्यंत या बाबदींत लोकांनीं आपलें गाऱ्हाणें न्यावें असें आम्ही सुद्धां सूचविलें होतें. पण या कामाविषयीं विशेष कोठें हालचाल झाल्याचें आम्हांस ठाऊक नाहीं. अर्ज करण्याचा काल अद्यापहि गेलेला नाहीं. तेव्हां लोकांनीं नेहमींची निराशा सोडून एकवेळ प्रयत्न करून पहावा असें आमचें आग्रहाचें म्हणणें आहे.

इंडियन राष्ट्र

देशाची स्वाभाविक जी रचना तीच राष्ट्राच्या सीमा निश्चित करिते. इंडियाचें द्वीपकल्प एक महाराष्ट्र बनण्या सारखें आहे. पण ही संभवनीय गोष्ट वस्तुस्थितीच्या रूपाला येईल तो सुदिन होय. एवढें मोठें राष्ट्र पृथ्वीवर क्वचित्च आढळेल. हल्लीं इंडिया ब्रिटिश सत्ते खालीं आहे पण त्याला राष्ट्रत्व अजून आलेलें नाहीं. इंडिया हा शब्द अजून एतद्देशीय लोकांचा एकजीव करीत नाहीं ह्मणून आम्ही ह्मणतो कीं अजून राष्ट्रत्वाची स्थिती या देशाला प्राप्त झालेली नाहीं. इंडियन मनुष्य हिंदु असो, मुसलमान असो, पार्शी असो, वा ख्रिस्ती असो, त्याला या देशाचा कांहीं अनुभूत व अवर्णनीय आपलेपणा वाटला पाहिजे. राज्यकर्ते आम्हांस निराळे लेखितात. सर्व इंग्लंडवाले स्वतांस राज्यकर्ते समजतात आणि सर्व इंडियन लोकांस पादाक्रांत लोक समजतात. सध्यां इंडियांत राजा व प्रजा असा परस्पर संबंध नाहीं, किंवा राजा व प्रजा या नात्यानें सर्व लोकसमूह अलंकृत झालेला नाहीं. इंडियांतला राजा ह्मणजे सर्व गोरे लोक होत, आणि प्रजा ह्मणजे सर्व पादाक्रांत केलेला इंडियन लोकसमूह होय. स्नेहांकित करणारा व अंतरात्मा एकत्र करणारा प्रजाधर्म येथें नाहीं. प्रजाधर्म ह्मणजे दास्यत्वाचा एक प्रकार बनला आहे आणि राजा ह्मणजे दासांवर सत्ता चालविणारा एक सुखासीन राज्यकर्त्यांचा स्वतंत्र वर्गच आहे. या मनोभावाच्या विपरीतपणामुळें ब्रिटिश सत्ते खालीं इंडियाचें राष्ट्र अद्याप बनत नाहीं. राष्ट्र बनण्याला एकी वाटली पाहिजे. राज्यकर्त्यांशीं एकी करणें ह्मणजे सिंहाशीं दोस्ती करण्या सारखें आहे. हा सिंह आपल्या संनिकर्षांत येणाऱ्या भूतमात्रांचा स्वाहाकार करणारा आहे. तेव्हां राज्यकर्त्यांच्या बाजूनें इंडियाचें राष्ट्र बनण्याची आशाच नाहीं. आतां इंडियनांनीं आपसांत एकी केल्यास एक राष्ट्र बनण्याचा संभव आहे. ही एकी ह्मणजे परस्पराविषयीं प्रेमभाव पाहिजे. हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती वगैरे सर्व इंडियनांना आपापला धर्म चांगला पाळावा, परस्परांविषयीं सहानुभूती मनांत बागवावी व आदरभाव जागृत करावा, ह्मणजे एक राष्ट्र आपोआप बनूं लागेल.

मोडका बाजार

मोडका बाजार ह्मणजे मोडतोड झालेल्या वस्तूंचा बाजार होय. या बाजारांत जुना वापरलेला माल विकला जातो. एकाची जुनी वस्तु कदाचित त्याला निरुपयोगी होत चालली असेल, पण तिचा उपयोग त्या मनुष्यापेक्षां अधिक गरीब स्थितींतल्या मनुष्याला होण्याचा संभव असतो, ह्मणून जुन्या वस्तु विकत घेण्याला गिऱ्हाईकेंहि पुष्कळ जमतात. मोठमोठ्या शहरांतून असें मोडके बाजार भरत असतात आणि ते शहर गांवाशिवाय इतरत्र असण्याचा संभवहि नाहीं. मोडक्या बाजारांत वस्त्रप्रावरणादि वस्तू विकल्या जातात तेव्हां त्या सौदागरापेक्षां आम्हाला त्या त्या वस्तु घेणाऱ्या लोकांचीच मोठी कींव येते. दुसऱ्यानें वापरून जुन्या झालेल्या वस्तु आपण स्वतः वापराव्या किंवा नाहीं याचा विचार ज्याचा त्यानें स्वतंत्र करावा. पण अशा कांहीं वस्तू आहेत कीं, त्यांस दुसऱ्याचा अंगस्पर्श घडला असतांना त्या सर्वथा त्याज्य अशा समजाव्यात. दुसऱ्याचा कपडालत्ता, जेवणाखाण्याचीं भांडीं, निजावयाच्या गाद्या गिरद्या इत्यादि वर्गांतील वस्तू एकानें दुसऱ्याच्या वापरूं नयेत असा जुना रीतिरिवाज आहे. अर्थात हा नियम एकाच कुटुंबांतील माणसांना लागूं नाहीं हें निराळें सांगावयास नको. कुटुंबांतील माणसामध्यें जवळच्या आप्तांचा व जिवलग स्नेह्यांचा समावेश होत असतो आणि तेवढ्याच त्या व्यक्तींच्या समुदायामध्यें वस्त्रप्रावरणाची, कपड्यालत्यांची व चौकावरतानाच्या भांड्यांची अदलाबदल होत असते. परंतु अलीकडे एक वाईट प्रचार रूढ होत चालला आहे आणि त्या प्रचारामुळें कांहीं वाईट खोडी आपल्या लोकांस नवीन जडत चालल्या आहेत त्या खोडींतली मुख्य खोड ह्मणजे मोडक्या बाजारांतील वस्त्राप्रावरणादि त्याज्य वस्तू विकत घेणें होय. जेथें मोडक्या बाजारा साठीं ह्मणून स्वतंत्र ठराविक जागा नाहींत तेथेंहि अशा वस्तूंचा क्रयाविक्रय करण्याच्या रीती नवीन पडत चालल्या आहेत.

आमच्या समाजांतील मध्यम वर्गांतील लोकांना श्रीमान् दिसण्याची मोठी हाव लागलेली दिसते. या नादाकी श्रीमंती थाटावर राहण्याची ऐपत जवळ नसते तेव्हां ते वर निर्दिष्ट केलेल्या मोडक्या बाजारांतील जुन्या वस्तू विकत घेण्याच्या नादाला लागतात. एखादा साहेब विलायतेला जाऊं लागला ह्मणजे तो आपल्या सर्व चिजवस्तू विकून टाकतो आणि अशा वेळीं तर मोडक्या बाजारांतील व्यापार तेजीवर असतो. कित्येकदां तर असेंहि दृष्टीस पडतें कीं साहेबाच्या पाटलोणी, कॉलर्स, कोट, टोपी, शर्ट, बूट, गाद्या, ब्लँकेटें, चहाकाफीचीं बशापात्रें, तसेच शौचकार्याची कमोड आणि अशाच वर्गांतील इतर वस्तू विकावयास मांडतात; आणि आम्हांला लिहिण्याला फार वाईट वाटतें कीं, हिंदु समाजांतील श्रेष्ट वर्णाच्या ब्राम्हण ज्ञातींचेहि लोक हे त्याज्य पदार्थ मोठ्या चढाओढीनें विकत घेऊन घरीं आणितात. अशा वस्तूंबद्दल मनुष्याच्या मनाचा नैसर्गिक वीट, तिरस्कार व खंती हीं अजिबात लयास गेलेलीं पाहून आमच्या समाजाच्या वाढत चाललेल्या अधोगतीचें चित्र डोळ्यांपुढें दत्त ह्मणून उभें राहतें. जुन्या व दुसऱ्यानें वापरलेल्या वस्तूंवर चैन करण्याची ही गुलहौस आमच्यांतील लोकांस कशी खपूं लागली हें एक मोठें गूढच होय. कित्येकदां असा प्रकार घडतो कीं, एखादा

सेवक आपल्या सन्मान्य स्वामीचें जुनें वस्त्र प्रावरण मोठ्या भक्तीनें अंगावर घेतो, तसेंच एखादा स्नेही आपल्या परम प्रिय गत मित्राची आठवण ह्मणून त्याच्या एखाद्या महा वस्त्राचें परिधान करितो, किंवा कुटुंबांतील माणसें परस्पर प्रेमामुळें गत आप्तांची वस्त्र-प्रावरणें मोठ्या आदरभावानें वापरतात. हा लोभाचा व प्रेमाचा प्रकार मनुष्य स्वभावांतील उत्तम गुणांचा दर्शक होय. पण ही गोष्ट मोडक्या बाजारांतील लॉंगटेल साहेबांच्या वस्त्रांच्या क्रयविक्रयाला लागू पडत नाहीं. जेव्हां साहेबांच्या उच्छिष्ट जिनसांबद्दल सुजाण लोकांच्या उड्यावर उड्या पडतात तेव्हां कपाळाला हात लावून स्वस्थ तळमळत बसावें अशीच मनाला मोठी निराशा वाटते.

जुन्या दुसऱ्याच्या वापरलेल्या वस्तू आधीं मुळींच घेऊं नयेत हा एक सर्व साधारण नियम होय. जुनी वस्तू ह्मणजे एका दृष्टीनें तो मुका इतिहासच होय. प्रत्येक वस्तूच्या उपभोक्त्या पुरुषासंबंधानें त्या त्या वस्तूमध्यें अनेक गत गोष्टींचा इतिहास ग्रथित झालेला असतो. पण हा इतिहासाचा ग्रंथ मोडक्या बाजारांतील गिऱ्हाइकां बरोबर कांहींच बोलू शकत नाहीं आणि अर्थात त्याचें अंतर्गत हृद्गत त्या गिऱ्हाइकांत मुळींच समजत नाहीं. पूर्व गोष्टींच्या ग्रंथीमुळें प्रत्येक वस्तूंच्या अंगीं बरी वाईट अशी कांहीं विशिष्ट शक्ती उत्पन्न झालेली असते आणि ह्मणूनच प्रत्येक वस्तू आपलीशी करितेवेळीं त्या वस्तूशीं संयुक्त असलेल्या इतिहासाचें सिंहावलोकन केल्याखेरीज माणसानें राहूं नये. याच बुद्धीला अनुसरून रजकाकडून स्वच्छ होऊन आलेल्या वस्त्रांवरहि तीर्थोदकाचें सिंचन करण्याचा आपला जुना परिपाठ आहे. इतकेंच नाहींतर आपण रत्नसुवर्णादि वस्तू देखील विकत घेतांना त्यांची पूर्व पीठिका मुद्दाम पहात असतो. लग्नाच्या वेळीं जसें कुल शील पाहण्याची पद्धति आहे तशी च वस्तुमात्रांची पूर्वपीठिका ही त्या त्या वस्तूंच्या कुलशीलाची स्मरणी होय. या दृष्टीनें दुसऱ्याच्या वस्त्रप्रावरणादि वस्तूंवर पुष्कळशा गत गोष्टींचा पुष्कळसा संस्कार घडलेला असतो आणि हे संस्कार बरे असण्याचा जितका संभव आहे तितकाच किंबहुना ते संस्कार जास्त वाईट असण्याचा संभव आहे. असा वाईट संस्कार आपणांला लागून आपल्या नित्याच्या परिचर्येला नवीन विघ्न येऊं नये ह्मणून प्रत्येकानें मोठी खबरदारी घेतली पाहिजे. निर्जीव वस्तु देखील आपल्या पूर्वपीठिकेमुळें कसे मनोविकार उत्पन्न करते या संबंधानें भोज राजाची आणि विक्रम राजाच्या सिंहासनाची गोष्ट सर्व श्रुतच आहे. त्या सिंहासनावर चढूं लागल्या बरोबर भोजराजाचे विचार उदात्त, उदार व सत्व शील असे होत आणि तोच सिंहासनाची पायरी उतरतांच ते पूर्व विचार अगदीं बदलून जात. या आख्यायिके वरून बोध घ्यावयाचा तो इतकाच कीं, मोडक्या बाजारांतील वस्त्रादि वस्तूं कधींचा विकत किंवा फुकटहि घेऊं नयेत. मृत्तिका पात्र जसें विटाळलें ह्मणजे फोडावेंच लागतें तद्वत वस्त्रप्रावरणादिकांची गोष्ट होय. प्लेगाचे वेळीं वस्त्रप्रावरणादि जाळण्याची पद्धत वरील संसर्ग दोषाला धरूनच बसविलेली आहे. प्लेगाचा संसर्ग दोष दूर करण्याची जी पद्धत आहे तीच दुसऱ्याच्या कपड्यालत्यांत गुरफटलेल्या नाना निंद्य इतिहासांचा दोष दूर करण्याला लागूं केली पाहिजे. वन्हिशुद्धीच जेथें द्यावयास पाहिजे तेथें आपण संसर्ग दोषाचीं निर्जीव भूतें ह्मणजे जुने कपडे विकत घेतो ही गोष्ट अगदीं गर्हणीय होय.

बर जो तिरस्कारभाव जुन्या वस्तूं संबंधानें प्रदर्शित केला आहे त्यामध्यें जुन्या शब्दाचा अर्थ उपभोगामुळें त्याज्य होत चाललेल्या वस्तू असा आहे. परंतु कित्येक वस्तू त्यांच्या जुन्या उच्च संस्कारानेंच पुण्य व पवित्र वस्तूंच्या मालिकेंत येऊन बसलेल्या असतात. अशा प्रकारच्या वस्तु मोडक्या बाजारांत येण्याचा संभवच नाहीं, किंबहुना व्यापाराच्या प्रसिद्ध पेठांतूनहि अशा अमोलिक वस्तू विकावयास नसतात. उदाहरणार्थ, कोहिनूर हिरा, शिवाजीची भवानी तरवार, अकबराचा वेत्रदंड, कविश्रेष्ठांचा हस्तलेख, इत्यादि वस्तु पुण्यश्लोक पुरुषांची चिरस्मारकें असल्यामुळें त्या फार जपून ठेविलेल्या असतात. अशा वस्तूंच्या पायरीला साहेब लोकांचे कपडे आले नाहींत असें आम्हांस पक्कें वाटतें आणि म्हणूनच मोडक्या बाजारांतील गिऱ्हाईकांची निर्भत्सना करण्याचे धाष्ट्र्य आज आम्हीं केलें आहे. जी ही आमच्या समाजला मोडक्या बाजाराची एक कीड लागलेली आहे ती लवकर नाहींशी होईल असें आम्ही इच्छितों.

रणसंग्राम

इतके दिवस जपान व रशिया यांची सैन्यें यालू नदीवर तळ देऊन राहिलीं होती व तेथेंच एक मोठी निकराची लढाई जुंपेल असें अनुमान होतें, पण आतां यालू नदीवर लढाई न होतां ती मंचुरिआंत होईल असें दिसतें कारण रशियन लोकांनीं जपानी लोकांस मंचुरिआंत येऊं दिलें आहे व जवळ जवळ दहा हजार जपानी लोक तेथें जमले आहेत.

जपानचे ९० हेर रशियांच्या हातांत सांपडलें व त्या सर्वांस रशियानें गोळ्या घालून ठार केलें. हेराचें काम किती तरी नाजूक व जिवावरचें आहे!

चेमुल्को येथें जी चकमक झडली तींत रशियाच्या कडील ६० लोक मेले ७० जखमी झाले व शेवटीं जपानाची सरशी झाली.

जपानची तयारी जारी आहे व त्यानें नवीन तीन जहाजें खरेदी केलीं आहेत.

रशियन ॲडमिरल मॅकराफच्या मृत्यूबद्दल सर्व युरोपियन लोकांस फार वाईट वाटलें इतकेंच नव्हे तर त्याचें शत्रू जे जपानी लोक तेही फार हळहळत आहेत. शूर व गुणी योद्ध्याच्या मृत्युबद्दल शत्रूंचेही डोळे पाण्यानें भरून यावे हें मनुष्य स्वभावास अनुसरूनच होय.

जपानी ॲडमिरल टागो यानें पोर्ट आरथर जवळील रशियन जहाजावर हल्ला केला आणि 'बेआन' नांवाचें मोठें जहाज जाया करून 'बेझस्ट्राशनी' नांवाचें माऱ्याचें जहाज बुडविलें. ह्या दोन जहाजाच्या नाशामुळें रशियाची मोठीच हानी झाली आहे.

वऱ्हाडवृत्त

हवामान—दिवसा उन्हाचा ताप फारच प्रखर असतो पण रात्रीं हवेंत थंडावा लौकर येतो. यंदाचें हवामान कांहींसें विचित्र आहे पण दुष्काळच्या सालांतल्या प्रमाणें थंडगार वारा सुटत नाहीं हें शुभ लक्षण होय. कदाचित् या सालचा पर्जन्य थोडासा लांबणीवर पडेल असा रंग दिसतो. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक असून रोगराई सध्यां बिलकुल नाहीं.

रा० रा० सी. एच. प्राईस, स्मालकाज जज्ज, आकोला यांस ता० ३ मे पासून ४४ दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली.

रा० रा० बार साहेब असिस्टंट कमिशनर इलिचपूर यांस पुढील महिन्यापासून १ महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. ए. अ. क. स्पेशल ड्यूटी, उमरावती यांस दोन महिने हक्काची रजा देण्यांत आली असून जूनच्या १६ वे तारखे नंतर ते यवतमाळच्या आपल्या पूर्वीच्या कोर्टाच्या कामावर हजर होतील. मुलकी सरक्युलरें सुधारण्याचें कार्य आतां या पुढें रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर हे एकटेच करणार आहेत.

वे. शा. संपन्न रा. रा. बाळंभट बिन केशवभट घोंगें यांनीं आरंभलेला कुंडमंडप विधीयुक्त संहितेचा स्वाहाकार परवांचे दिवशीं यथाविधी संपूर्ण झाला. या समारंभाला लांब लांबची वैदिक गुणी मंडळी आली असून ह्या पुण्य कार्याची उभारणी फार उत्कृष्ट झाली. काल रोजीं गांवप्रयोजनहि करण्यांत आलें. या प्रसंगाच्या अनुरोधानें कैलासवासी वेदमूर्ती नानाजी घोंगे यांची मंडळीस मोठी उणीव वाटली आणि त्यांच्या पश्चात आकोल्यास त्यांच्या तोडीचा दुसरा श्रोत्रिय विद्यमान नाहीं ह्मणून त्यांची मोठी आठवण होत असे.

येथील कोर्ट इनस्पेक्टर रा. रा. मार्टिन यांस शेगांवास रेलवे चीफ कानस्टेबल करण्यांत आलें हे गृहस्थ चांगले मनमिळाऊ असून हुशार पोलीस अंमलदार आहेत.

पंडित चुनीलालजी साहेब, उपदेशक वैश्य महासभा, हे खामगांवीं आले आहेत व ते शेगांव, आकोला, इलिचपूर, उमरावती, घामणगांव वगैरे गांवीं जाऊन तेथील वैश्य लोकांस उपदेश करणार आहेत. त्यांच्या उपदेशाचा ते लोक चांगला विचार करितील अशी आशा आहे.

शिवजयंतीचे उत्सव वऱ्हाडांत १०—६ ठिकाणीं साजरे करण्यांत आले अशाविषयीं आमचे कडे बरींच पत्रें आलीं आहेत पण तीं विस्तारभयास्तव देतां येत नाहींत ह्मणून दिलगिरी वाटते. शिवजयंतीचा नैसर्गिक स्फुरणस्फूर्ती आमच्या वऱ्हाडवासी जनांत अद्याप उत्पन्न झाली नाहीं असें कष्टानें ह्मणावें लागतें.

येथील मेल कॉंट्राक्टर रा. रा. पेस्तमजी शेट यांस नाशीक जवळील देवळाली मुक्कामीं गेल्या गुरुवारीं देवाज्ञा झाली. यांचा अगदीं वृद्धापकाळ झाला होता व ते अलीकडे बरेंच थकले होते. मरण समयीं त्यांचें वय ८९ वर्षांचें होतें. शेवटीं त्यांस अर्धांग वायूची बिलनी होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. मरणाच्या पूर्वी चारच दिवस त्यांनीं देवळालीला नेण्याविषयीं आपल्या चिरंजिवाशीं विशेष हट्ट घेतला. मरणाच्या भूमीकडे मनुष्य कसा ओढला जातो याचें हें एक उदाहरणच होय. देवळाली हें हवा खाण्याचें ठिकाण आहे या पलीकडे राजश्री पेस्तमजी शेट यांचा त्या स्थळाशीं कांहींच पूर्व संबंध नव्हता. राजश्री पेस्तमजी साहेबांनीं सर्व संपत्ती आपल्या स्वतःच्या पराक्रमावर कमावली. अव्वल इंग्रजीच्या आरंभीं जी थोडी मंडळी वऱ्हाडांत आली त्यांपैकीं हे एक होत. यांच्या घरीं मेल तांग्याचें कॉंट्राक्ट घेतलेलें आहे. आकोला—इंगोली, उमरावती—इलिचपूर आणि मलकापूर—बुलढाणा इत्यादि रस्त्यावरील मेल टांगे यांचेच आहेत. या शिवाय यांची दुकानदारीहि मोठी आहे. रा. पेस्तमजी हे स्वभावानें फार दिलदार, निर्व्यसनी व प्रामाणिक असे असत. यांचे चिरंजीव राजश्री जमशेटजी यांनींहि आपल्या वडिलांचा लौकिक चांगला कायम ठेविला आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांती देवो.

आम्हांस कळविण्यास दुःख वाटतें कीं येथील राजमान्य राजश्री यज्ञेश्वर अनंत वैद्य यांस गेल्या शनिवारीं सायंकाळीं अर्धांगवायूमुळें व ज्वरामुळें देवाज्ञा झाली. रा० अण्णा मास्तर हे स्वभावानें फार गोड असल्यामुळें यांत सर्व मित्र मंडळी फार चहात असे. सार्वजनिक गणपतीच्या मेळ्यांत व इतर करमणूकीच्या नाना विध प्रकारांत यांचा नेहमीं पुढाकार असे. हे शाळा मास्तर होते तेव्हां मुलांना शिकविण्याची हातोटी फार चांगली असे. व मुलांचें ह्यांच्याठायीं विशेष मुलेव दिसून येई. यांच्या मरणानें यांच्या घरच्या माणसांचा आश्रय अगदींच नाहींसा झाला ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

आकोला बाजारभाव

हुंडी दर्शनी	१००
सोनें १४।=	चांदी ७१।
जवारी ९०—९२	जवस ७९
गहू काठे ८९	चनशी ९९
सरकी	९॥
मीठ	३। रु. मण
चणे	२॥। रु. मण
तूप	९॥ रु. मण
तेल	४॥ रु. मण.
रुई जीन	८२
कापूस	९७

जाहिरात

या जाहिरातीनें सर्वत्र लोकांस खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं आकोले येथील शहरातील वऱ्हाडसमाचार छापखान्याचे उत्तर [illegible] गून असलेले आ[illegible] तीन [illegible] हवेली आह्मी वि[illegible] हवेली घेण्याचा [illegible] आह्मांस येऊन भेटावें [illegible] सवदा करावा ह्मणून [illegible]

ता० २३।४।०४

विठ्ठल [illegible]

महाराजांची उदारता.

गेल्या ९ वे तारखेस भावनगरचे महाराजांच्या वाढदिवसाचा महोत्सव झाला तेव्हां सुमारे ५००० रुपयांचीं पुस्तकें मुलांस बक्षिस दिलीं. तसेंच विद्येच्या उत्कर्षासठीं त्यांनीं एकंदर निरनिराळ्या अशा १३ स्कालरशिपा दिल्या आणि संस्थानांतील अनाथ विधवांसाठीं दरमहा १४० रुपयांची देणगी देण्याचा ठराव केला. मराठी रहाशत व इंग्रजी रहाशत यांतील हाच मोठा फरक होय.

हिंदुस्थानावर उपकार.

स्वामी रामतीर्थ नांवाचे एक संन्यासी आज वर्ष दीड वर्ष अमेरिकेंत वैदिक धर्माचा फार चांगलीं व्याख्यानें देत आहेत. ते नुकतेच पोर्टलंड येथें गेले असतां तेथील लोकांना त्यांचें व्याख्यान फार आवडलें व त्यांनीं आपली स्वामीच्या ठायीं कृतज्ञता दर्शविण्यासाठीं त्यांस विचारलें कीं, "आपण तर निरिच्छ आहां पण आम्ही हिंदुस्थानासाठीं काय मदत करावी." स्वामींनीं त्यांचें प्रेमळ मन जाणून उत्तर केलें कीं, हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नती करिता, व धर्मशिक्षणाप्रीत्यर्थ कांहीं करणें असल्यास करावें. " लागलीच त्या थोर लोकांनीं एक फंड जमविला आहे आणि शिकण्यासठीं एक विद्यार्थी हिंदुस्थानच्या लोकांनीं पसंत करून पाठवावा, आम्ही त्याचा एवढा खर्च पुरवूं हणून सूचना केली आहे. हे त्यांचे हिंदुस्थानावर मोठे उपकार आहेत.

कांद्याचा उपयोग— कांदे हा पदार्थ स्वस्त असून सर्वत्र मिळण्यासारखा आहे, उन्हाळ्याच्या दिवसांत हा खाल्ला असतां ऊन लागत नाहीं व प्रकृती थंड राहते. कांदे हीं मोठी पौष्टिक औषधीच आहे त्याच्या नियमित सेवनानें थकलेली शरीरकांती फार लवकर सदृढ होते आणि शरीरकांती सतेज रहाते असें मोठ्या डाक्टरांचें सांगणें आहे. पण त्याचा दर्प अनिवार आहे त्यास काय उपाय ?

तोंडाची दुर्गंधी जाण्यास उपाय— ज्यांच्या श्वासास दुर्गंधी येते त्यानीं एक पेलाभर स्वच्छ पाणी घेऊन त्यांत लहानशा चमच्या भरून मीठ घालावें व तें दररोज प्रातःकाळीं प्यावें व त्याच मिश्रणानें तोंड धुवावें हणजे दुर्गंधी नष्ट होईल असें हणतात.

अजब पूड—चीनच्या लोकांना दंतवैद्यापासून दात उपटून घेण्याचें कांहींच दुःख होत नाहीं. कारण त्या वैद्याजवळ अशी एक प्रकारची कसलीशी पूड आहे [illegible] न दुखतां मुळांपासून [illegible] युरोपियनानीं ही [illegible] शोध केला पण [illegible] कळलें नाहीं.

[illegible]न— लहान लहान [illegible] १८ वर्षी पर्यंत [illegible] आणि राघू १०० [illegible] तर ३०० वर्षें [illegible]चें आयुष्य पुष्कळ [illegible]फारच मरतात.

विचित्र सृष्टी—ब्रह्मदेशांत ह्लिनया नजिन नांवाच्या खेड्यांत एक बाई बाळंत झाली. तिला नें मूल झालें त्याला दोन डोकीं, एक पोट, दोन हात व चार पाय होते. मूल उपजल्यावर अर्धा तासांत मेलें. पण त्याचें प्रेत दारूंत घालून मुद्दाम ठेविलें आहे. असलीं विचित्रसृष्टी दारूंत घालून राखून ठेवणें चांगलें आहे.

फारच प्रचंड शेत—अमेरिकेंत बायोमिंग संस्थानांत ज्या ठिकाणीं हल्लीं शेतीभाती जारीनें सुरू आहे अशी एक सर्वांत मोठी जमीन आहे. ह्या शेताची लांबी रुंदी फारच विस्तीर्ण आहे. त्यांचें क्षेत्रफळ काढण्यास त्यांचे आंकडे इतके काल्पनिक दिसतात कीं, त्यावर कोणाचा एकदम विश्वास बसत नाहीं. व्हाईट आल्यंडचा प्रदेश ह्या शेताच्या मध्यभागीं नेऊन सोडला, तर सर्व बाजूंनीं वीस मैल नाना रिकामी राहाते. यावरून हें शेत किती मोठें आहे याची कल्पना करितां येईल. नाना प्रकारच्या दोन लक्ष गुराचा चारा ह्या शेतांत आहे. त्यांत घोडे, गाई, बैल, बकरी, कोकड, डुकरें, ह्यशी ह्या येतात, पत्रकावरून दिसतें कीं, या शेतांत दररोज चरायाला सोडतात ह्या गुरांत ४०० घोडे, २०००० गाई, बैल, व १५०,००० एक लक्ष पन्नास हजार बकरी असतात.

वकीलपत्रानें लग्न लावणें

हालंडमध्यें मुखत्यारपत्रानें लग्न लावण्याचा संप्रदाय आहे. याला हातमोजयानें लग्न हणतात. कोणी इष्ट मनुष्य परदेशीं रहात असून आला स्वदेशीं येण्यास सवड नसली किंवा त्याची फार गरीबी असली व त्याला बायको पाहिजे असली तर तो मुखत्यारपत्रानें लग्न लावून घेतो. त्याचा प्रकार असाः— तो स्वदेशीं एकाद्या मित्रास वकीलपत्र पाठवून देतो. हा वकील आपल्या पक्षकारास जशा प्रकारची बायको पाहिजे असेल तशी शोधून काढितो. त्या गृहस्थास तो पसंत पडल्यास तो आपल्या डाव्या हातचा मळका मोजा व मुखत्यारपत्र वकिलाकडे पाठवून देतो. एखादा स्त्रीही मुखत्यार पत्रावरून तिच्याशीं लग्न लावतो, आणि तिला मग जहाजांत बसवून तिच्या नवऱ्याकडे पाठवून देतो.

गमतीचा प्लाटफार्म— अमेरिके मध्यें एका रेल्वे इंजिनियरानें आगगाड्यांच्या बरोबर जाणारा एक प्लॅटफॉर्म तयार केला असून त्यावर गाड्या थांबविल्या शिवाय उतारूंस आपल्या सामानासह उतरतां येतें.

दाढीची वाढ— प्रत्येक पुरुषाची दाढी दर आठवड्यास सुमारें एक दशांश इंच वाढते. या मानानें एकाद्या ८४ वर्षाच्या पुरुषानें जर आपल्या आयुष्यांत कधींच दाढी कापली नाहीं, तर ती २७ फूट लांबीची होईल असें एका शोधकानें अनुमान काढलें आहे.

मुलांस शिक्षण कसें पाहिजे

मुलास नुसत्या घोकंपट्टीनें लेखन व वाचन शिकविल्यानें त्याचें खरें शिक्षण होत नाहीं. त्याच्या शिक्षणास शास्त्रीय पाया पाहिजे. त्याचें शिक्षण सर्वांगसुंदर झालें पाहिजे. नुसती स्मरणशक्ति मात्र उत्तेजित करणें हें शिक्षणाचें इंगित नव्हे, तर मुलांचीं दृष्ट्यादि सर्व इंद्रियें आणि हस्तपादादि सर्व अवयव हीं सर्व शिक्षित झालीं पाहिजेत. आणि तीं शिक्षित करीत असतां मुलाची विचारशक्ति आपोआप सुशिक्षित व्हावी अशा प्रकारची शिक्षणयोजना केली पाहिजे.

बालोद्यान हणजे काय ?

फ्रांबेलच्या शिक्षणपद्धतीस 'किंडेर ग्रटेंन्' हणजे बालोद्यान शिक्षणपद्धति असें हणतात. मुलें हीं बागेंतील फुलझाडांप्रमाणें होत. आपण आपल्या बागेंत लावलेल्या झाडांस सुवासिक फुलें व मधुर फळें यावीत या इच्छेनें त्यांची उत्तम प्रकारची जोपासना करण्यास जसा माळी ठेवतो, किंवा आपण स्वतः त्यांची निगा करतों, त्याच प्रमाणें मुलांचीही स्थिति होय. त्यांच्या शारीरिक व मानसिक शिक्षणाची काळजी आपण तितक्या प्रमाणानें किंबहुना किती तरी अधिकपटीनें घेतली पाहिजे असें लोकांच्या व शिक्षकांच्या मनावर ठसविण्यासाठीं त्यानें आपल्या शिक्षणपद्धतीस वरील हणजे—किंडेर गार्टेन् बालोद्यान अथवा मुलांचा बाग हें नांव दिलें. हें नांव देण्यांत त्या गृहस्थाची रसिकता किती उत्तम प्रकारें दिसून येते हें सांगावयास नकोच. ज्ञा. प्र.

थोर थट्टा

आमचे फडणीस आ. गि. गोखले यांच्या भाषणास उत्तर देताना हणतात. " ह्या ह्या हणणाऱ्या याचकांच्या झुंडींत मिस्टर गोखलेही आहेत. हे सदा सुतक्या प्रमाणें कौन्सिलांत आले कीं रडगाणें गात बसतात. पुष्कळ दिवसाच्या संवईनें त्यांना रडण्याचा चाहणाही सुंदर करता येतो. परंतु इतर वेळीं माझे मित्र तर मोठे आनंदी व दिलदार दिसतात यावरून कौन्सिलातील त्यांचें वर्तन वरकांती आहे.

सरकारी अधिकारी वर्गानें कितीही नावें ठेविलीं, आमच्या पुढाऱ्यांची आणि कितीही थट्टा केली व त्याच्या हेतुबद्दल शंका धरली तरी आमच्या पुढाऱ्यांनीं निराश होऊन आपलें अंगीकृत कार्य सोडूं नये. देशातील समंजस लोक त्याच्या कार्याची पहाति व त्यांचा स्वार्थत्याग ओळखीत आहेत व त्यांच्या या कामगिरीबद्दल लोकांचे मनांत त्यांचे विषयीं असंख्य आदर वसत आहे. हा आदर हेंच आपल्या कामगिरीचें खरें बक्षीस आहे असें त्यांनीं समजावें. अशा प्रकारची जाणीव आमच्या पुढाऱ्यांत आहे अशी आमची खातरी आहे व या जाणिवेनें ते पुढेही दुपट्ट जोरानें काम करतील अशी आशा आहे.

अधिकाऱ्यांचें सौजन्य—वायव्यप्रांतांचे ले० गव्हरनर नुकतेच फिरत फिरत लखनौस गेले होते. तेथें त शहानजकचें थडगें पहावयास गेले असतांना एक युरोपियन मेथ, ऐटींत चिरुटाच्या धुराचे लोट सोडीत कबर पहावयास चालतेला त्याना आढळला त्यानीं ताबडतोब फाटका लवळून त्याचे चिरुट ओढणें बंद केलें व फाटकावरील पोलिस सार्जंटला असा हुकूम फर्मविला कीं यापुढें कोणालाहि चिरुट ओढित असतांना आंत सोडूं नये.

कडक ताकीद—चिनी भिंतीचे बाहेर चिनी सैन्य आणतेत हें यरा नव्हे तें तुम्ही परत न न्याल तर तुम्हांस लढणारें राष्ट्र समजून आम्हीं चिनवर चाल करूं अशी रशियन सरकारानें चिनी सरकारास धमकी दिली आहे; पण तिला चीन मुळींच भीक घालीत नाहीं !

दगडाचा पाऊस—बंगाल्यांतील गढारीपूनजीकच्या भागांत मेच्या महिन्यांत पाऊस पडला त्या वेळीं मारांच्या ऐवजीं आकाशातून लहान मोठ्या दगडांची वृष्टी झाली ती इतकी जोरानें झाली कीं, तिच्या मारानें कांहीं लोक बेशुद्ध पडले, व जमिनीवर त्यांचा ९ इंचाचा थर झाला, हणतात.

मुळींच पाणी पीत नाहींत— हवाईत बेटात शेंकडों घोडे व हजारो इतर जनावरें अशीं आढळतात कीं तीं आपल्या सबंध आयुष्यांत पाण्याचा एक थेंबही पीत नाहींत.

चमत्कारिक झाड— चिली व जपान या भागांत एक चमत्कारिक तऱ्हेचें झाड आढळतें या झाडपास हवेंतील झाड असें हणतात. कारण त्याचें मुळ कांहींच दिसत नाहीं. व तें जमिनीस चिकटून राहत नाहीं. एखादा सुकलेल्या वृक्षामध्यें तें वेढलेलें असतें. यास जीं फुलें येतात तीं दिसण्यांत स्वच्छ व सुगंधी असतात. हें ६००—७०० मैल अंतरावर नेलें जातें.

जमिनीपर्यंत न पोंचणारा पर्जन्य— कोलोरॅडो नावाच्या अरण्यांत बादल सुटून जो पाऊस पडतो त्या पैकीं एकही थेंब जमिनीपर्यंत पोंचत नाहीं. हा पाऊस पडतांना दृष्टीस पडतो. पण तो दगाच्या खालीं उतरला हणजे तेथील कोरड्या हवेंत पाणी शोषून जाऊन जमिनीपासून अर्ध्या रस्तांतच नाहींसा होतो. त्यामुळें या पावसाचा जमिनीस मुळींच उपयोग होत नाहीं.

स्त्री विरहित शहर— सर्व जगांत स्त्रीरहित असें मायबाटचिन नांवाचें एकच शहर आहे. हें शहर रशियाच्या सीमेवर असून त्यांतील वस्ती फक्त पुरुषांची आहे. या भागांत चिनी खेरीज राहण्याची परवानगी नसून त्यास कालकनचा मोठा तट ओलांडून मांगोलियामध्यें शिरण्याची देखील सक्त मनाई आहे. या शहरांतील सर्व लोक चिनी असून ते सर्व व्यापारी आहेत.

बालशिक्षण भाग १ ला

त्वरा करा ! किंमत पाऊण आणा

प्रती बेताच्याच आहेत.

इन्फंट इंडियातील मुलांस मूळाक्षरांची व दहा अंकाची माहिती लीकर व उत्तम कळून देणारें सोपें साधन, ए० शेवडे, मोडंद, महाजन, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळींचे अभिप्राय, पुस्तकें मसर्थ चित्रवंत्र. सेवे आंत एक रुपयाची घेणारांस टपाल खर्च फ.फ.

पत्ता— नारायण रामचंद्र नागलकर शेगांव जि० आकोला (वऱ्हाड)